# माणूस

८ जुलै १९६७

चाळीस पैसे



## सहर्ष घोषणा

• •

### नाझी भस्मासुराचा उदयास्त

रा. म. शास्त्री

• •

### राजा शिवछत्रपति

ब. मो. पुरंदरे

• •

## सप्रेम भेट योजना . . .

पहा : कव्हर पान तीन

समग्र साप्ताहिक

# माणूस

वर्ष : सातवे : अंक : सहावा

वार्षिक वर्गणी : वीस रुपये

परदेशची वर्गणी : चाळीस रुपये

**संपादक**

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

**अ. मा. साधू**

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

**स. न.** **जून, २७**

' माणूस 'च्या अंकातील .शिवसेनेवरचे लेख अतिशय उत्तम आहेत. त्यावर लेखकाने बराच अभ्यास केला आहे. या लेखांचे इंग्रजी भाषांतर करून विविध प्रांतांत पाठवावे म्हणजे शिवसेनेबाबत Blitz आणि इतर दाक्षिणात्य पत्रे यांनी जो भरमसाठ गैरसमज पसरविला आहे तो दूर होईल. दुर्दैवाने ही आपली व्यथा आहे की एकही इंग्रजी पत्र आपल्या बाजूने लिहीत नाही. त्यामुळे आपल्याला काय म्हणावयाचे आहे ते इतरांना कळत नाही. दाक्षिणात्यांतसुद्धा मल्याळी, तामिळी, तेलगू व कन्नडी ·या सर्वांचाच समावेश आपण करतो, पण या सर्व मंडळींत मल्याळी हा स्वतःला फार शहाणा समजतो व त्याच्या वागण्यातसुद्धा अतिशय उर्मटपणा व गुंडपणा असतो, अशी एक माझी समजूत इथे आल्यावर झाली आहे. आणि त्याला पूरक असेच येथील तामिळ मंडळी बोलतात. मुंबईतसुद्धा हीच मंडळी जास्त संख्येने असावीत व तीच जास्त गडबड करीत असावीत असा माझा तर्क आहे. शिवसेनेच्या लेखकांना अशी माझी विनंती आहे की, त्यांनी याचा अभ्यास करावा व जास्त फोड करून लिहावे.

**श्रीधर लिमये,** मद्रास

**मूल्य ४० पैसे**

**४१९ नारायण**

**पुणे २.**

**दूरध्वनी : ५७३५९**

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

स. न. जून, २६

नित्याप्रमाणे स्थानिक वृत्तपत्र विक्रेता ' माणूस ' (२४–६–६७) टाकून गेला. मुखपृष्ठ पाहून ' माणूस बदलला की काय ? ' अशी शंका आली; बाकी ह्या अंकाचे मुखपृष्ठ आवडलें; अगदी अमेरिकन टाईप वाटले.

' दिल्ली दरबारा 'ची लांबी उगीचच वाढली; आणि ' मुक्ताफळा 'चे यावेळचे दोन्ही विषय ' क्रिकेट आणि अश्लीलता ' जागाभरू वाटले. इतरत्र क्रिकेटसंबंधी इतकी माहिती व तीसुद्धा ( दररोजच्या ) दैनिकांत येते की आठवड्यातून एकदा त्याच्या परामर्षाचे ' स्वारस्य ' उरत नाही. अश्लीलतेचा विषय चार तपांपासून चालत आला आहे व तो पुढेही चालत राहणार; ह्यापेक्षा शंकर पाटलांचीच जास्त जाहिरात दिसली. आणि ग्रामीण कथा-कादंबऱ्या लिहिणारे हे ' शहरी ' लेखक ओंगळ गुन्हेगार, गुंडादिकांच्याच पाठीमागे का लागतात हे कळत नाही. त्यांना लोकसाहित्याचे अंतःप्रवाह, आप्त-मित्र, सासरमाहेर, मातामुली यांच्यांतील वात्सल्य वगैरे व त्यावरील भावनात्मक वर्णने देण्याची बुद्धी का सुचू नये, ईश्वर जाणे ! पाटलाचा पोर गावातल्या तरण्याताठ्या पोरींकडं पाहून तिची ' कुचंदी ' करीत असल्याचं वर्णन वाचलं म्हणजे साऱ्या गावच्या पाटलांची पोरं अशीच का ' गुंड '; त्यांच्यातील काही गुण, बहादुरी, अचूक नेम धरून शिकारी साधणं, बाहेरून शिकून येऊन गावात ' सुधारणा ' करणं इत्यादिकांचा क्वचितच उल्लेख असतो. ग्रामीण विषय हाताळताना या लेखकांनी हे विचारात घ्यावयास नको का ?

तसेच अरब–इस्रायल संघर्षाने ' माणूस 'सारख्या ' इवल्याशा ' साप्ताहिकाची तब्बल सोळा पाने अडविली. त्यामुळे वाचक तर ' खलास 'च झाला असावा.

शिवाय माणूसमध्ये हे ' उर्दू वार्ता ' प्रकरण कसं काय समाविष्ट करण्यात आलं ? हिंदी बंगाली-गुजराती का नको ? आणि खरंच त्याची काही आवश्यकता आहे काय ?

मध्यंतरी कुणी ' माणूस 'चा आकार बदलावा, अशी सूचना करून गेल्याचे वाचले. छेः इतका सुटसुटीत व सुंदर आकार असताना त्याला ' बेढब ' करण्यात काय स्वारस्य !

वि. वा. जोशी, चंद्रपूर

## दुबळे राज्यकर्ते! उदासीन विचारवंत! हतबल जनता!

# भारताच्या लोकशाहीचे भविष्य?

'तरुण पाहिजेत, तज्ज्ञ पाहिजेत' असा दिल्लीत नुकताच पुकारा करण्यात आला. तरुणांच्या आणि तज्ज्ञांच्या माहितीसाठी हे येथे आवर्जून सांगितले पाहिजे की, ही कोणत्याही कारखान्याची (किंवा आजच्या सरकारी भाषेत बोलावयाचे तर प्रकल्पाची) जाहिरात नव्हे. कारखान्यांना तरुण आणि तज्ज्ञ नको असतात असे नाही, परंतु ही उद्योगपती मंडळी त्यासाठी वर्तमानपत्रांत पगाराच्या तपशीलाबाबत जाहिरात देऊन आपल्या गरजा जाहीर करतात आणि त्या गरजा पुऱ्या करू शकणारी तरुण आणि तज्ज्ञ मंडळी त्या कारखान्यांच्या आवारामध्ये प्रवेश करतात. मग हा ताजा पुकारा कोणाचा होता? ही काँग्रेसनामे राजकीय पक्षाची गरज आहे. गेल्या निवडणुकीमध्ये प्रथमच मतदारांकडून सणसणीत थप्पड खाल्लेल्या या पक्षाचे पंधराएक दिवसांपूर्वी दिल्लीत अधिवेशन भरले होते. या अधिवेशनाचा गाजावाजा बराच झाला होता; कारण त्यात दोन महत्त्वाचे ठराव चर्चेस येणार होते. त्यांतील एक ठराव होता संघटनाविषयक प्रगतीचा (वा परागतीचा). पंडितजी ह्यात असताना बैलजोडीची निशाणी हातात घेऊन उभा राहिलेला एखादा दगडही विनासायास निवडून यावयाचा. त्यामुळे निवडणुकीत पराभूत होणे ही गोष्ट काँग्रेसवाल्यांना फारशी माहीत नव्हती! परंतु नेहरूंसारख्या आधारखंडाचे देहावसान झाल्यानंतर जी पहिलीच निवडणूक झाली. तीत काँग्रेसचे दगडांप्रमाणेच देवही पराभूत झाले. हा पराभव का झाला याचा म्हणे या बैठकीत विचार होणार होता आणि म्हणूनच या बैठकीकडे राजकीय निरीक्षकांचे विशेष लक्ष लागलेले होते.

या ठरावावर चर्चा सुरू झाली तेव्हा कामराजांनी एकाच वाक्यात या पराभवाचे निदान केले: ते म्हणाले, "मलाच या पराभवाला जबाबदार धरा." कामराजांचे हे वाक्य मोठे चतुराईचे होते. त्यांनी नेहरूंचे तंत्र अवलंबण्याचे ठरविले. साराच दोष आपल्यावर घेण्याची तयारी दर्शविली की, पक्षान्तर्गत विरोधकांचा

हल्ला बोथट होतो हे पंडितजींना ठाऊक होते व त्यामुळे कोणताही पेचप्रसंग निर्माण झाला की, 'मला जबाबदार धरा, मी राजीनामा देतो' असा धमकीवजा पुकारा ते करीत असत. एकदा त्यांचे हे वाक्य ऐकले की सारी मंडळी आपले विरोध मागे घेत व 'नेहरूंचा हात बळकट करण्याचा' निर्धार व्यक्त केला जाई. परंतु कामराज हे काही पं. नेहरू नव्हेत ! त्यामुळे त्यांच्या या दर्शनी त्यागाचा पक्ष-सदस्यांवर फारसा परिणाम झाला नाही व ते पराभवाच्या कारणांची चिकित्सा करू लागले. तारकेश्वरी सिन्हा म्हणाल्या की, सध्या काँग्रेसची धर्मशाळा झाली असून 'आवो आते जावो' असा या धर्मशाळेच्या प्रवेशद्वाराशी आपण फलक लावला असल्यामुळे आपला पक्ष परस्परविरोधी विचारसरणीच्या नागरिकांचा आसरा ठरला आहे. सिन्हाबाईंचा आरोप काँग्रेस श्रेष्ठांना आवडला नाही. तरी-देखील आपला पक्ष जनतेपासून दूर गेला आहे याची इंदिरा गांधी यांना कबुली द्यावी लागली. त्या म्हणाल्या की, स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेस हे जन-आंदोलन होते. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर, सत्तास्थाने हातात येतात हे कळून आल्यामुळे सर्व प्रवृत्तीचे लोक तिच्यात शिरले आणि हळूहळू आपण लोकांपासून दूर गेलो म्हणून आता काँग्रेसमध्ये नवे रक्त कसे येईल याचा आपण विचार केला पाहिजे. आपल्याला तरुण हवे आहेत. तज्ज्ञ हवे आहेत.

## तरुण रक्ताची शोकांतिका

अर्थात तरुण रक्त हवे आहे हा पुकारा काही नवा आहे. अधूनमधून काँग्रेस-श्रेष्ठांना हे वाक्य उच्चारण्याची हुक्की येते. तरुण 'या' म्हणूनही येणार नसल्या-मुळे ही वृद्ध मंडळी हे वाक्य मोठ्या निर्धास्तपणे म्हणत असतात. परंतु गेल्या निवडणुकीमध्ये दणका खाल्ल्यानंतर काँग्रेसपक्षाची ही सत्ताबाज वृद्ध मंडळी काही धडा शिकली असतील व जरा कठोरपणे आत्मनिरीक्षण करतील अशी जर कोणाची कल्पना असेल तर तो मूर्खांच्या नंदनवनातच राहत आहे असे महासमितीच्या ताज्या सर्कशीत जे काही खेळ झाले ते पाहिल्यानंतर म्हणावे लागते. आपल्या देशात तरुणांची व तज्ज्ञांची वाण आहे असे मुळीच नाही; परंतु ही तरुण आणि तज्ज्ञ मंडळी राजकारणाच्या वाटेला जाईनाशी झाली आहेत ही खरी शोकांतिका आहे ! या मंडळींना देशसेवेची आवड नाही असा सोयीस्कर गैरसमज करून घेण्यातही स्वारस्य नाही. परंतु आपल्या येथील राजकरणाची व विशेषतः सत्ताधारी काँग्रेस पक्षाचे अंतर्बाह्य स्वरूप इतके कुजले–सडलेले आहे की तरुणांना आणि तज्ज्ञांना ती दुर्गंधी सहन होणे शक्य नाही.

एखादा स. गो. बर्वे उठतो व देशसेवेच्या चळवळीत ऐषआरामी सनदी नोकरी-वर लाथ मारून राजकारणाच्या धकाधकीत प्रवेश करण्याचे धाडस करतो परंतु अशा या निरलस वृत्तीच्या तज्ज्ञांचे हे पाऊल खरोखरच वेडे धाडस ठरते हा अनुभव ताजा नाही काय ? रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नरपद स्वीकारून साऱ्या देशाच्या

अर्थकारणाला दिशा लावण्याचे सामर्थ्य असलेला हा बुद्धिमान गृहस्थ १९६२ मध्ये निवडणुकीच्या रिंगणात उतरला तो किती उत्साहाने! निवडणुकीत ते विजयी झाले आणि लागलीच महाराष्ट्राचे अर्थमंत्रीही झाले. येथपर्यंत ठीक होते. महाराष्ट्र कॉंग्रेसमधील दादा आणि भाऊ मंडळी बर्वेसाहेब किती मोठे आहेत ही स्वतःला न कळलेली गोष्ट इतरांना समजावून सांगू लागले. येथपर्यंतही सारे ठीक होते. परंतु येथपर्यंतच! एकदा बर्वेसाहेब अर्थमंत्रिपदावर विराजमान झाल्यानंतर मात्र ही ब्याद इथं कशाली आणलीत? असा प्रत्येक दादा, साहेबांना विचारू लागला. साहेब म्हणाले, "ए गणा, ए गणा, हे माझं खास टेक्निक आहे. तुम्ही जरा सबुरीनं घ्या." मंडळींनी स्वतःस जरा सावरून घेतले. परंतु मध्येच चीनने आपल्या देशावर आक्रमण केले आणि हिमालयाला वाचविण्यासाठी साहेब दिल्लीला गेले. मग मात्र या दादा मंडळींना एवढा जोर चढला की प्रथम त्यांनी बर्व्यांकडील अर्थखाते काढून घेऊन उद्योगखाते दिले. परंतु तरीही बर्व्यांची ब्याद मिटेना. एखाद्या नव्या कारखान्या-संबंधीचा अर्ज त्यांच्या टेबलावर गेला की मुकाट्याने सही करण्याऐवजी बर्वेसाहेब 'या कारखान्याची गरज आहे का, याच्यासाठी पुरेसा पैसा उभारला गेला आहे का, वीजपुरवठा कोठून होणार,' असले काहीतरी प्रश्न विचारू लागले. मग आमच्या या मंत्र्यांनी काय केले माहीत आहे? बर्व्यांच्या खात्याच्या फायलीदेखील त्यांच्या-कडे धाडण्याचे थांबवून स्वतःच बर्व्यांचे काम त्यांना न सांगता बघू लागले. सुदैवाने बर्वे विद्वान होते. अर्थविषयाचे तज्ज्ञ होते. निस्पृह होते. त्यामुळे हा असला अपमान सहन करीत बसण्याचे नाकारून ते थेट दिल्लीला गेले व नियोजन मंडळाचे काम-काज पाहू लागले.

बर्व्यांच्या जीवनाची पूर्वी सांगितलेली शोकांतिका येथे पुन्हा अशासाठी सांगितली की, 'तरुण पाहिजेत, तज्ज्ञ पाहिजेत' हा कॉंग्रेसवाल्यांचा ताजा पुकारा त्यांच्या आत्मवंचनेचाच आणखी एक भाग आहे हे ध्यानात यावे. गेल्या दोन वर्षांत सर-कारने आर्थिक विकासाच्या रोखाने एकही पाऊल पुढे टाकलेले नाही. याचे कारण हेच आहे की, देशातील बुद्धिमान मंडळी राजकीय पक्षांपासून व विशेषतः कॉंग्रेस-पासून दूर गेलेली आहेत. त्यांतील सर्वजणांना देशसेवेची इच्छा आहे असे म्हणता येणार नाही. परंतु त्याबरोबरच सर्वजण सुखासीन जीवनाच्या मागे लागले आहेत, असाही आरोप करता येणार नाही. या बुद्धिमान मंडळींनी कॉंग्रेसमध्ये यावे, असे कॉंग्रेसचे स्वरूपच राहिलेले नाही.

कॉंग्रेस पक्षाची आणि पर्यायाने देशाची सूत्रे पंडितजींकडे असेपर्यंत विचारवंतांना काहीतरी आकर्षण होते. स्वतः पंडितजी आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या शास्त्रज्ञांपासून अभिजात लेखक-कलावंतांपर्यंत सर्व ठिकाणी लीलया संचार करू शकत असत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वामागे ध्येयवादाचे, वैचारिक प्रगल्भतेचे अन् कलासक्त रसिकतेचे वलय असे. शंकर पिलाईसारख्या बोचक व्यंगचित्रकाराने आपले एखादे अचूक व्यंग-

चित्र काढले तर पंडितजी फोन करून त्यांच्या कुशाग्र बुद्धीचे कौतुक करीत असत. इतक्या लहानसहान गोष्टींतही पंडितजी रस घेत असत. त्यानंतर देशाची सूत्रे शास्त्रीजींकडे आली. त्यांच्या नेतृत्वात पंडितजींची स्वप्नाळू झेप नसली तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला निस्पृह देशसेवेची सोनकिनार होती. ज्या काळात जिल्हा परिषदेचा मामुली अध्यक्ष आपले इमले उभारत असतो, त्या काळात भारताचा हा प्रधानमंत्री सर्व्हंट्स ऑफ पीपल्स सोसायटीचे कर्ज फेडत बसला होता. शास्त्रीजींचे नेतृत्व दीर्घकाल लाभले असते तर गुणीजनांची कदर होण्याची काही तरी शक्यता होती.

## मालवीयांचा हल्ला

परंतु आता उरली आहे ती केवळ सत्तापिपासू वृत्ती. आपले आणि आपल्या आप्तेष्टांचे भले कसे करता येईल या एकाच चिंतेने झपाटलेल्यांच्या हाती प्रशासनाची सूत्रे गेल्यानंतर व धर्मातीत राज्यव्यवस्थेचा वारंवार उद्घोष होत असताना प्रच्छन्न जातीयवादास खतपाणी घालण्याचे तंत्र स्वीकारल्यावर तज्ज्ञांनी व तरुणांनी काँग्रेसकडे आकर्षित व्हावे हा पुकारा म्हणजे केवळ दांभिकपणाच नव्हे तर काय ?

काँग्रेस महासमितीच्या बैठकीत आर्थिक कार्यक्रमाच्या ठरावावर बोलताना श्री. केशवदेव मालवीय यांनी याच दांभिकपणावर मर्मभेदी प्रहार केला. ते म्हणाले की, "आपण समाजवादाचा वेळीअवेळी घोष करीत असतो. परंतु सर्वसामान्य जनतेला दिलासा वाटेल अशी एक गोष्ट तरी आपल्या हातून झाली आहे काय ? एकीकडे धनवंतांच्या तिजोऱ्या भूमितिश्रेणीने फुगत चालल्या आहेत व दुसरीकडे उपासमार, दारिद्र्य आणि रोगराई यांनी थैमान मांडले आहे. एक मला तरी काँग्रेसमध्ये राहिले पाहिजे किंवा स. का. पाटलांना तरी ! दोघे या एकाच घरात राहू शकत नाहीत इतका आमच्या मूलभूत धोरणात फरक आहे." केशवदेव मालवीयांचा हा हल्ला जोराचा असला तरी त्यामुळे काँग्रेसश्रेष्ठांची झोप उडाली आहे, असे कोणीही मानू नये. कारण आता सर्व काही बोलण्यासाठी असते, प्रत्यक्ष काहीच करावयाचे नसते हे प्रशासनाची सूत्रे हाती बाळगणाऱ्यांना पक्के ठाऊक असते. उच्चार आणि आचार यांचा ताळमेळ सांधावयाचा असतो ही खूणगाठ सुटल्यानंतर झोप उडण्याचा प्रश्नच संभवत नाही. केंद्रीय अन्नमंत्री श्री. जगजीवनराम बिहारमधल्या हरीजन समाजातील कार्यकर्ते. गेल्या वर्षभरात या बिहारी हरीजनांची अन्नाअभावी केवढी कुचंबणा झाली ! परंतु दिल्लीतले आलिशान आणि वातानुकूलित निवासस्थान सोडून बिहारमधील एखाद्या हरीजनाच्या झोपडीत जाऊन त्याची भूक दूर करण्याचा जगजीवनराम यांच्याकडून काही प्रयत्न झाला ? प्रसिद्धी—अधिकाऱ्यांचे आणि वर्तमानपत्रांच्या वार्ताहरांचे तांडे बरोबर घेऊन चार मदतकेंद्रांना भेट दिली की, आपले कर्तव्य संपले असे मानणारे राज्यकर्ते लाभल्यानंतर समाजातील बुद्धिमंतांना त्यांच्यासंबंधी आदर वाटावा तरी कसा ?

चार महिन्यांपूर्वी हातातून सत्ता गेली म्हणून तळमळणाऱ्या काँग्रेस पक्षाकडून

देशसेवेचा वा जनसेवेचा काही फेरविचार होत आहे असे दृश्य दिसत नाही. गेलेली सत्ता परत कशी मिळेल, या एकाच चिंतेने या पक्षाला ग्रासून टाकले आहे. आणि पुन्हा हाच प्रश्न विचारावासा वाटतो की, ही सत्ता कशासाठी हवी आहे? अर्थात् ही वृत्ती केवळ कांग्रेसपुरतीच मर्यादित आहे असे नव्हे. इतर राजकीय पक्षांनीही गेल्या चार महिन्यांत सत्तेची मदिरा चाखलेली आहे आणि त्यांची चटक वाढलेली आहे. हरियाना आणि पंजाब या राज्यांतील मंत्रिमंडळे दर महिन्याला वाढत चालली आहेत ती कशासाठी? हरियाना विधानसभेत संयुक्त दलाचे ४८ सभासद असून त्यांपैकी बावीस जणांना मंत्रिपदाच्या खुर्च्या बहाल करण्यात आल्या आहेत. एकीकडे सरकारी नोकरांचे पगार कसे वाढवावयाचे या विचारात व्यग्र असलेल्या बीरेंद्रसिंगांनी हरियानासारख्या छोटया राज्याकरिता बावीस मंत्र्यांच्या पगारांचा, तनख्याचा आणि प्रवासभत्त्याचा भुर्दंड नागरिकांच्या माथी का मारला आहे! पूर्वीचे भागवत दयाल शर्मा आणि आजचे बीरेंद्रसिंग काय लोकांच्या दृष्टीने 'उडदामाजी काळे गोरे' असाच प्रकार आहे! पश्चिम बंगालमधल्या अजय मुकर्जी यांना आपण स्वतःच नेमके कोठें आहोत, हे उमगत नाही अशी परिस्थिती आहे. त्यामानाने केरळ, मद्रास, बिहार व ओरिसा येथील परिस्थिती फारशी बिघडलेली नाही.

या सर्व परिस्थितींचा परिणाम असा झालेला की एकीकडे सत्तापिपासू राज्यकर्ते व उदासीन विचारवंत आणि दुसरीकडे दैनंदिन गरजांनाही महाग झालेला व हतबल वृत्तीचा समाज् अशा या भुसभुशीत खांबावर आजची आपली लोकशाही यंत्रणा उभी आहे. कशाचा आणि कोणाचा भरंवसा बाळगावा आणि तोही कोणत्या गोष्टींच्या आधारावर अशा भकास दृष्टीने अगतिक झालेला हा समाज केवळ अशाच दिशाशून्य आणि आकारहीन पोकळीत दीर्घकाळ वावरत राहील असा कोणीच गैरसमज करून घेण्याचे कारण नाही. राजकारणी व्यक्तींच्या सत्तापिपासू वृत्तीमुळे सर्वसामान्य नागरिकांत आज जे कमालीचे वैफल्य निर्माण झाले आहे, त्या वैफल्यावर असंतोषाचे रसायन टाकून त्याचा भडका उडावा या दृष्टीने काही संघटित गटांचे प्रयत्न चालूच आहेत. हे सर्व जर टाळावयाचे असेल तर संख्येने गुणांचा भागाकार जात नाही. चारित्र्यहीनता निस्पृहतेवर मात करू शकत नाही व झुंडशाही म्हणजे लोकशाही नव्हे हे आजचे राज्यकर्ते आणि त्यांचे छुपे व उघड हस्तक जितक्या लवकर ओळखतील तितके बरे. माणुसकीचा मुडदा केवळ हुकूमशाहीतच पडतो असे नाही. लोकशाहीच्या आवरणाखाली वावरत असलेली झुंडशाहीदेखील तेच कार्य करीत असते!

सदाशिव पेठकर

# मुक्ताफळे



## □ पहिली मंगळागौर !

“ शस्त्रास्त्राचा उपयोग करून बळाने घडवून आणलेला प्रादेशिक बदल भारत मान्य करू शकत नाही. ”

अखिल भारतीय काँग्रेस अधिवेशनात अशी क्षुद्र कोटी कोणीतरी केल्याचे आमच्या वाचनात आले आहे. भानगडीशिवाय पुरुष नाही अशी परिस्थिती झाल्यानेच काँग्रेसने इंदिराबाईंना प्रधानमंत्री केले असे या कुत्सित टीकाकारांना आमचे उत्तर आहे, असो. तर अ. भा. काँग्रेस अधिवेशनात बाईंनी हे तेजस्वी उद्‌गार काढले. अरब–इस्रायल युद्धात छाग–ला हे ठाणे पडले, तेव्हापासून भारताच्या उमद्या अरबी धोरणावर जी प्रच्छन्न टीका विरोधकांनी सुरू केली, त्यांचे दात इंदिराबाईंनी या घोषणेने पाडले आहेत.

याचा अर्थ असा की लोंगजू, अक्साई चीन व तिबेटमधून चिन्यांना व काश्मिरातून पाकिस्तानला गचांडी देण्याचा बाईंचा निर्धार आहे ! कारण हा प्रदेश चीन–पाकिस्तानने हिंसेने मिळवला आहे. आज ना उद्या जातीय दंगली करून सुरामारीच्या बळावर निर्माण केलेले पाकिस्तानही बाई मोडून टाकल्याशिवाय राहणार नाहीत ! स्वयंभू गणपतीप्रमाणे जे राज्य आपसुक जन्मले नाही व हिंसाचार करून जे प्रदेश हिसकले गेले, ते सर्व परत मिळवण्याचा इंदिराजींचा हा निर्धार जाहीर होताच, अ. भा. अधिवेशनात टाळ्यांचा कडकडाट झाला. माजी संरक्षणमंत्री यशवंतरावजी व आजी संरक्षणमंत्री स्वर्णसिंगजी यांच्या टाळ्या तर अखेरपर्यंत वाजत होत्या !

अ. भा. अधिवेशनातील सांगण्यासारखा दुसरा प्रसंग म्हणजे महासमितीच्या ठरावावर बोलताना तारकेश्वरी सिन्हा ह्या जेव्हा म्हणाल्या—

**कैसे कैसे ऐसे वैसे हो गये ।**
**ऐसे वैसे कैसे कैसे हो गये ।**

(भल्या भल्यांची वाट लागली व फालतू माणके उच्चपदी विराजमान झाली आहेत.)—

—तेव्हा व्यासपीठावरील सर्व कॉंग्रेस मंत्र्यांचे याबाबतीत एकमत झाले, की हे वर्णन कॉंग्रेस मंत्र्यांचे नसून ज्या प्रांतांत विरोधी पक्षांची मंत्रिमंडळे आहेत त्या प्रांतांतील मंत्र्यांचे आहे. आमचेही हेच मत आहे !

हरियानाच्या कॉंग्रेस कार्यकर्त्या शन्नोदेवी म्हणाल्या—

"कॉंग्रेस संघटनेत आता फक्त बूटपॉलिशवाले व मालिशवाले यांची गर्दी झाली आहे !" संघटनेत ही मंडळी असल्याशिवाय का दिल्लीचे कॉंग्रेस सरकार इतके सतेज आहे ! मालिशशिवाय सतत तेजस्वी उद्गार काढणे अशक्य होय. बूटपॉलिशवाला हा नम्रतेचे प्रतीक आहे. तो नेहमी पायाशी बसतो. दुसऱ्याचे पाय शोभिवंत व्हावे म्हणून आपले फडके मारतो ! दिल्ली सरकारमधील सर्व मंत्र्यांचे पाय बुटपॉलिशवाल्याच्या ताब्यात गेल्यामुळे सतेज उद्गार काढूनही लाथ हाणणे त्यांना अशक्य होते, नाहीतर त्यांनी चीन–पाकिस्तानला किमान केवळ लाथ हाणली असती. बुटांना पॉलिश सुरू आहे, वेळ आली की लाथ हाणण्याचे प्रात्यक्षिक करण्यात येईल. कॉंग्रेस संघटनेतील बूटपॉलिशवाल्यांची कीर्ती आता दिगंत झाल्याने कोसिजिन, जॉन्सन, विल्सन या सगळ्यांचे बूट पॉलिशसाठी भारतात येतात. या कामासाठी युनायटेड नेशन्समध्येही एखादे पथक अधूनमधून पाठवण्यात येते. नासरच्या बुटांना पॉलिश करण्याचे काम तूर्त सुरू आहे. या लोकांची हेटाळणी करण्यात काय बरे हशील ?

१९६७ च्या निवडणुकीनंतरची दिल्लीत झालेली ही पहिली मंगळागौर छानच पार पडली. नॉन अलाईन्ड फुगड्या झाल्या. अणुबॉंबचे उखाणे झाले. 'कसं बाई नाव तिकडचं घेऊ ?' अशी व्हिएटनामवर छानदार गाणी झाली. शेवटी आरती झाली—

**जयदेवी इंदिरागौरी । ओवाळीन नासर ताटी ।**
**कोसिजिनचे दिवे । पोसिजिनच्या वाती ।**
**अयूब मोती ।**
**जॉन्सनमूर्ती, उपजली काया । प्रसन्न झाली गहू अन्न द्याया ।**
**तिष्ठली राज्यबाळी । वस्त्रमुद्धा द्यावया ।**
**।। जयदेवी ।।**

## □ खिडकीतले हे सरकार !

चीनने भारतीय दूतांपैकी काहींची हकालपट्टी केली.
आपणही चीनच्या दूतांपैकी काहींची केली.
चीनमधील भारतीय वकिलातीला माओच्या मवाल्यांनी वेढा घातला.
आपणही चीनच्या भारतातील वकिलातीला पोलिसी विळखा घातला.
चीनने भारतीय विमानाला पेकिंगमध्ये येण्यास बंदी केली.
आपणही चीनच्या विमानाला दिल्लीला येण्यास बंदी केली.

टिट फॉर टॅट। जशास तसे। घटाशी आणला घट। उद्धटाशी उद्धट। पाया झाला नारू, तेथे लावावा कापरू ।।

भारताचे परराष्ट्रीय धोरण बावळट आहे, असे ज्यांना वाटते, त्यांनी हे दृश्य आता पाहिले आहे. आपले सरकार इतके दिवस राजघाटावर उभे होते ते आता हळदीघाटावर गेले आहे, याची ही दुंदुभी आहे! विरोधकांची तोंडे बंद झाली आहेत!! परंतु काहीतरी खुसपट काढले नाही, तर ते विरोधी पक्ष कसले? विरोधी पक्षांचे म्हणणे, पायाला नारू झाल्यावर कापरू लावण्यापेक्षा आपण ते पाणीच प्यायचे बंद करू. मिळमिळीत सौभाग्यापेक्षा ढळढळीत वैधव्य पत्करू! चीनशी राजकीय संबंध तोडून टाकू!!

भारताचे परराष्ट्रमंत्री छागला यांनी विरोधकांना चपखल उत्तर दिले आहे. त्यांनी जाहीर केले—

"चीनशी असलेले राजकीय संबंध ही चीनमधील परिस्थितीचे ज्ञान करून देणारी आपली खिडकी आहे."

आपले सरकार चीनच्या खिडकीत बसून काय करीत आहे, असा प्रश्न आपल्याला पडेल. हा प्रश्न पडला तरी दुसरा एक प्रश्न यापुढे सुटेल—नव्हे, सुटलेलाच आहे. दारावर चीन धडका मारीत आहे. वाकडा डोळा करून दारावरून फिरत आहे. परंतु तिकडे आपले का लक्ष नाही, याचे उत्तर सापडले आहे. सरकार खिडकीत बसल्यामुळे दारावर कुणी नाही आहे! एकाच वेळी खिडकीत आणि दारात कसे बसणार? या खिडकीतूनच अणुबाँबचा स्फोट आपण पाहिला. तिबेट संपलेले पाहिले. या खिडकीतूनच लोंग–जू गेलेले आपण पाहिले...इतक्या गंमती इथून दिसत असताना सरकारने खिडकीतून खाली उतरावे असा आग्रह लोकांना धरवतो तरी कसा?

## □ पुण्याची ग्रामपंचायत !

"लातूर, ता. २१–श्री. शंकरराव गणपतराव जाधव, सरपंच ग्रामपंचायत होळी, ता. औसा यांनी १९६२–६३ सालात सरपंच असताना वाचनालय, बालवाडी, महिला मंडळ व भजनी मंडळासाठी अनुदान मिळावे म्हणून विकासगट अधिकारी, औसा यांच्या कार्यालयात अर्ज केले होते व नियमाप्रमाणे लोकवर्गणी जमा न करता जमा केली असे भासवून व फसवून रुपये १३०० अनुदान मिळविले. ही रक्कम कीर्दीला जमा न करता सदर रकमेचा अपहार केला. उस्मानाबाद जिल्हा लाच-लुचपत प्रतिबंधक अधिकारी श्री. जी. एन्. मुकीम यांनी संबंधित अर्जाची चौकशी केली व होळी येथील सरपंच श्री. शंकरराव जाधव यांच्याविरुद्ध औसा येथील पोलीस स्टेशनात आय. पी. सी. ४० व ४२० कलमान्वये गुन्हा दाखल केला. मॅजिस्ट्रेट श्री. खोत यांनी आरोपी जाधव यांना १ वर्ष सक्तमजुरी व ६०० रु. दंड व दंड न दिल्यास ५ महिने साधी कैद अशी शिक्षा दिली."

शंकरराव जाधव यांच्यावर, खटला भरल्यामुळे ही शिक्षा झाली हे उघड आहे सरपंचांना शिक्षा होणे हा ' होळी ' गावचा अपमान होय. गावाचे नाव होळी असले. आणि गावकऱ्यांच्या नावाने सरपंचांनी शिमगा केला, तरी सरपंचांना शिक्षा झाल्याने गावकऱ्यांची बदनामी होऊन, शिवाय महाराष्ट्रात सर्वत्र ही बातमी छापून आली. लातूरजवळच्या या होळकरांना, पुणे हे गाव ऐकून माहीत असेल. शहर पुण्याची ग्रामपंचायत–पुणे कॉर्पोरेशन आहे. तेथील एक म्युनिसिपल अधिकारी दादा देसाई यांचेवरही लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडून रिपोर्ट आलेला असताना, पुणे कॉर्पोरेशनने त्यांच्यावर खटला भरण्यास परवानगी नाकारली व खटलाच होऊ दिला नाही, ही गोष्ट या होळकरांनी ऐकली नाही काय ? कॉंग्रेस सभासदांनी बहुमताने खटला होणारच नाही, अशी व्यवस्था केली व पुण्याची होणारी बदनामी टाळली.

खेडोपाडीच्या समस्त ग्रामपंचायतींनी हे आदर्श उदाहरण ध्यानात राहावे म्हणून पुणे कॉर्पोरेशनचा हा ठराव फ्रेम करून ग्रामपंचायतीच्या ऑफिसात कायमचा लावावा व यापुढे सरपंचांची वा कुणाही ग्रामपंचायत अधिकाऱ्याची अशी शोभा कोर्टदरबारी होणार नाही, याची काळजी घ्यावी.

— ग्यानबा

## याला काय म्हणावे

आकडेशास्त्रानुसार सगळ्या जगात स्वैपाकघर ही अत्यंत धोक्याची जागा आहे. परंतु स्वतःच्या बायकोचे गुणगान करणारे व तिच्या संरक्षणासाठी सापविंचवापासून वाघसिंहापर्यंत कोणाचीही शिकार करणारे जवान आपल्या बायकोला स्वैपाकघरात जाण्याबद्दल व तेथे जास्तीत जास्त वेळ खर्च करण्याबद्दल मात्र रोज उत्तेजन देत असतात.

## अशक्य !

बरीच प्यायलेला तो गृहस्थ मोटारीत शिरल्याचे पाहताच, जवळच उभ्या असलेल्या रस्त्यावरील पोलिसाने त्याला हटकत विचारले, " अशा स्थितीत गाडी चालविणार काय तुम्ही ? " " अर्थात् ! " उत्तर देत तो गृहस्थ म्हणाला. " त्याशिवाय गत्यंतरच नाही. कारण चालणे मला आता शक्य नाही. "

— रमेश के. सहस्रबुद्धे.

## विचार वारे

### ☐ इस्रायलची बाजू

अरब–इस्रायल युद्धात जणू भारतावरच आक्रमण झाले आहे अशा अभिनिवेशाने भारत सरकार इस्रायलवर तुटून पडले असताना या प्रश्नाला दुसरी–म्हणजे इस्रायलची–बाजूही आहे हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. या दृष्टीने इस्रायलचे नव्या दिल्लीतील कॉन्सल जनरल श्री. रीवन दाफनी यांनी एका पत्रकाराला नकत्याच दिलेल्या मुलाखतीत अरब–इस्रायल संघर्षावर प्रकट केलेले विचार मननीय आहेत.

दाफ्नी म्हणाले, मुसलमानी हेकटपणा ही एक भयंकर चीज आहे. पण तिला जेव्हा राष्ट्रवादाची जोड मिळते तेव्हा तर ती अमानुष होते. अरबांचा पराभव इतक्या चट्कन कसा झाला ? याचे उत्तर सोपे आहे. अरबांच्या जवळ जगातील अत्युत्कृष्ट शस्त्रास्त्रे होती. रशियन रणगाडे व विमाने उत्कृष्ट आहेत. पण ती बरोबर हाताळणे अरबांच्या आवाक्याबाहेरचे होते. भारत–पाकिस्तान संघर्षात पाकिस्तान्यांना पॅटन रणगाडे नीट वापरता आले नाहीत तसेच हे झाले ! पॅटन रणगाडा हा आज जगातला सर्वोत्कृष्ट रणगाडा आहे. तो एक कॉम्प्यूटर आहे. त्याला आवश्यक ती माहिती पुरविली की तो बिनचूक नेम मारू शकतो. पण तो चालवायला अमेरिकन पाहिजे. त्याचप्रमाणे रशियन शस्त्रसंभार अरबांना नीट वापरता आला नाही. तो त्यांच्या मानाने फारच आधुनिक होता. अवघ्या चार दिवसांच्या लढाईत इस्रायलने इतके अरब युद्धबंदी पकडले की तेवढयांना जेवायला घालणे कठीण आहे; त्यामुळे खूप युद्धबंद्यांना सोडून देण्यात येत आहे.

इस्रायलला अरब प्रदेशाचा लोभ नाही. परंतु नुसत्या युद्धबंदी करारावर सही करायची नाही, असा इस्रायलचा निश्चय आहे. इस्रायल राष्ट्राला मान्यता देणाऱ्या शांतता–करारावर जेव्हा अरब देश सही करतील तेव्हाच इस्रायल आपल्या ताब्यातील अरब प्रदेश सोडून देईल.

### ☐ भारत व रशियातील प्राचीन साम्य

मध्य आशिया आणि भारत या दोन भूभागांतील मानवसमाजांत साम्य असून हे साम्य ब्रॉन्झ युगाइतके प्राचीन आहे, अशी आपली खात्री असल्याचे एक सोव्हिएट उत्खननशास्त्रज्ञ प्रा. युरी झाड्नेप्रॉव्हस्की यांनी नुकत्याच दिलेल्या भारत-भेटीत सांगितले. उझ्बेकिस्तानात त्यांनी बाबरच्या जन्मस्थानी उत्खनन केले तेव्हा

त्यांना बरीचशी ब्रॉन्झची भांडी व उपकरणे सापडली तशीच राजस्थानात निर निराळ्या प्राचीन ठिकाणी सापडली आहेत. शक–कुशाण काळात मध्य आशियाई-विशेषत: आता उझ्बेकिस्तान म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशातील–टोळ्या भारतात येऊ लागल्या. त्या वेळी त्यांनी आपल्याबरोबर आपली शेतीची अवजारे व इतर गृहोपयोगी वस्तू आणल्या हे उघड आहे. काही वर्षांपूर्वी उझ्बेकिस्तानातील फरगाना दरीत उत्खनन करीत असताना काही ब्राँझचे आरसे सापडले, अगदी तसेच आरसे प्रा. झाड्नेप्रॉव्हूस्की यांना कोल्हापूरला पाहावयास मिळाले. उझ्बेकिस्तानात सापडलेले आरसे कित्येक शतकांपूर्वीचे आहेत व त्यांच्यामुळे मध्य आशियाई लोक व भारतीय लोक यांच्यामधील साम्याला अधिकच पुष्टी मिळते. वांशिक दृष्टयाही फरगाना खोरे आणि मध्य भारतात कित्येक शतकांपूर्वी राहणाऱ्या मानव–समाजात कमालीचे साम्य होते असे आढळते. प्रमुख भारतीय मानवशास्त्रज्ञांनाही हे साम्य आढळले आहे. दोन संस्कृतीत इतके साम्य असणे ही खरोखरीच अभूतपूर्व गोष्ट आहे !

## □ संगीत आणि आरोग्य

नव्या दिल्लीच्या पोलिश वकिलातीतली एका अधिकाऱ्याची पत्नी डॉ. हलीना जॅन्कोव्स्का या मानसशास्त्रज्ञाच्या मते संगीताचा व वैद्यकशास्त्राचा संबंध आहे. एका पत्रकाराशी बोलताना त्यांनी अशी माहिती दिली की विशिष्ट प्रकारच्या वेडावर उपचार म्हणून संगीताचा उपयोग करणे शक्य आहे, व पोलंडमध्ये तसा तो होतही आहे. उदाहरणार्थ, खळबळ माजलेल्या मनाला शांतता प्राप्त करून देण्यासाठी शांत संगीतासारखा दुसरा उपाय नाही. उलट उदासीततेने घेरलेल्या रोग्यासाठी मोठ्याने संगीत वाजवावे.

डॉ. जॅन्कोव्स्का या हौस म्हणून दिल्लीतील एका 'युनानी' दवाखान्यात काम करतात. त्यांच्या मते काही दुर्धर रोगांच्या उपचारासाठी काही युनानी औषधे पाश्चिमात्य पद्धतीच्या औषधांइतकीच प्रभावी असतात. शिवाय ती स्वस्त असल्याने येथील रुग्णांना अधिकच योग्य आहेत. शिवाय त्यांचे अनुचित परिणाम होत नाहीत. रोग जास्त बळावला असेल तर मात्र आधुनिक औषधे वापरणे उत्तम.

### आफ्रिकन माणूस

आफ्रिकेत बरीच वर्षे राहिलेली एक अमेरिकन पत्रकार तरुणी सौ. माया अ‍ॅलिसन हिने परवा नव्या दिल्लीच्या मुक्कामात प्रकट केलेले मत :

आफ्रिकन लोक इतके साधे व प्रामाणिक असतात की त्यांच्यावर प्रेम न करणे कठीण आहे.

## नगाधिराज हिमालयाला पहिला मुजरा करण्यासाठी
## स. प. कॉलेजचे प्रा. गोळे
## यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या
## सहा जणांच्या तुकडीने
## शुक्रवार दि. १२ मे रोजी पुणे सोडले,

## आणि रविवार दि. ४ जून रोजी
## २० हजार फूट उंचीवरील ' सुदर्शन ' शिखर
## त्यांनी काबीज केले.

## या ' सुदर्शन ' मोहिमेची ही कथा

मुलाखत
शं. गो. साठे

प्रश्न : नमस्कार गोळेसाहेब, तुमच्या ' सुदर्शन ' मोहिमेबद्दल काही प्रश्न विचारायचं मनात आहे, अर्थात तुमची हरकत नसेल तर !

**प्रा. गोळे :** छे, छे, हरकत कसली ? खुशाल हवं ते विचारा.

**प्रश्न :** कायहो, शिखरावर प्रथम पाऊल ठेवतो तो खरा विजेता, त्याच्या मागून शिखर चढणारे ते दुय्यम महत्त्वाचे, असा एक समज आहे तो कितपत बरोबर आहे ? ' एव्हरेस्ट ' शिखर प्रथम काबीज केलं त्या तुकडीतला खरा एव्हरेस्ट विजेता कोण, हिलेरी का तेनसिंग, असा एक वाद निर्माण झाला होता म्हणून विचारतो.

**प्रा. गोळे :** त्या तुकडीच्या नेत्यानं जे उत्तर दिलं तेच बरोबर आहे. शिखर जिंकते ते पथक—त्यातली एखादी व्यक्ती नव्हे ! पथकाचा नायक सोयीप्रमाणे कामाची वाटणी करतो; शिखरावर पोचण्याचा क्रम पूर्व योजनेनुसार ठरलेला असतो. एखादी व्यक्ती शिखरावर प्रथम पाऊल ठेवते हे खरे; पण इतरांचे सहकार्य सतत मिळाल्यामुळेच हे शक्य झालेले असते. यश, अपयश हे सर्वांचे, ही संघभावना बाळगून नेमून दिलेले काम करणे हे अशा प्रकारच्या मोहिमांत अत्यंत महत्त्वाचे असते. सुदैवाने माझ्या सर्व सहकाऱ्यांत प्रथमपासूनच ही भावना पूर्णपणे बिंबलेली होती.

**प्रश्न :** या शिखराला ' सुदर्शन ' हे नाव तुम्हीच दिलत का ?

**प्रा. गोळे :** नाही. हिमालयातील निरनिराळ्या टापूंचे जे नकाशे मिळतात त्यांत

सर्व शिखरे, हिमनद्या यांना नावे आधीच दिलेली आहेत. आम्ही त्यातून आमच्या मोहिमेला सोयिस्कर असे हे ' सुदर्शन ' शिखर निवडले

**प्रश्न** : गिर्यारोहकाचे पथक घेऊन हिमालयात मोहीम काढावी ही कल्पना तुमच्या मनात कशी व केव्हा आली ?

**प्रा. गोळे** : आमच्या संस्थेने प्रथमपासून गिर्यारोहणाकडे विशेष लक्ष पुरविले होते; त्यामुळे आपल्या सगळ्या शिक्षणाची परिणती अखेर हिमालयावरील मोहिमेत होणे अपरिहार्य आहे ही खूणगाठ आम्ही सुरुवातीसच बांधली होती. त्यासंबंधीची माहिती जमविणे, साधनसामग्रीची चौकशी करणे वगैरे प्राथमिक तयारीच्या गोष्टीं-कडे आम्ही गेली दोन-तीन वर्षे लक्ष पुरवीतच होतो. मोहीम निघणारच होती, फक्त ती केव्हा एवढाच प्रश्न होता.

**प्रश्न** : ती यंदाच निघाली याला काही नैमित्तिक कारण घडले का ?

**प्रा. गोळे** : त्याचे असे झाले, गेल्या वर्षी आमचे काही सभासद बद्रीकेदारला जाऊन आले; पण ते इतर यात्रेकरूंप्रमाणे नेहमीच्या वाटेने न जाता वेगळयाच, न रुळलेल्या वाटेने गेले. या अनुभवामुळे सर्वांचा आत्मविश्वास वाढला व आता स्वतंत्र मोहीम हाती घ्यायला हरकत नाही, असे वाटून या योजनेस जोराने चालना मिळाली.

**प्रश्न** : ' सुदर्शन 'शिखरावरच जायचे हा निर्णय तुम्ही कसा घेतलात ?

# मो ही म सु द र्श न

**प्रा. गोळे** : या शिखराबद्दलची थोडी माहिती आमच्या कानांवर आली होती. हिमालयाच्या त्या विशिष्ट टापूत अद्याप कोणी गेलेले नाही, असे आम्हांस समजले. त्यातले ' सुदर्शन ' शिखर अजून कुणीच चढून गेले नाही हे कळल्यावर तर त्याच शिखरावर मोहीम काढावयाची हा बेत आम्ही पक्का केला. पण ' सुदर्शन ' मोहीम निश्चित झाल्यावर आमच्यापुढची मुख्य अडचण म्हणजे पैशाची.

**प्रश्न** : सगळ्याच मोहिमांपुढे ती अडचण असणार, नाही का ?

**प्रा. गोळे** : आतापर्यंतच्या हिमालयातल्या मोहिमा या अधिकृत संस्थांच्या मदतीनेच बहुतेक झालेल्या आहेत. आम्हीही प्रथम दिल्ली, उत्तरकाशी, वगैरे ठिकाणच्या संस्थाधिकाऱ्यांना पत्रे लिहून सहकार्याची विनंती केली. त्यांचे उत्तर आले की, गिर्यारोहणाचा सरकारमान्य प्राथमिक किंवा उच्च शिक्षणक्रम घेतलेल्यांनाच फक्त आमची संस्था द्रव्याची किंवा साधनांची मदत करते; शिवाय पथकाचे नेतृत्व जो करील त्याने पूर्वीच्या एखाद्या मोहिमेत प्रत्यक्ष भाग घेऊन अनुभव घेतला असला पाहिजे अशीही मदतीची एक अट होती.

**प्रश्न** : मग तुमच्यापैकी किती जणांनी तो सरकारमान्य अभ्यासक्रम पुरा केला आहे?

**प्रा. गोळे :** कोणीच नाही. नेत्यासकट पथकातले सर्वजण स्वतंत्रपणे शिक्षण घेतलेले होते. त्यामुळे आम्हांला इतरांना मिळते तसले द्रव्य, शिक्षक, साधनसामग्री यांपैकी कसल्याही प्रकारचे साहाय्य मिळाले नाही; इतकेच नव्हे तर आम्ही साधनसामग्री भाड्याने मागितली तीही आमची विनंती नाकारण्यात आली. दुसऱ्या कुणावरही न विसंबता केवळ स्वतःच्या हिंमतीवर आमची भिस्त होती..

**प्रश्न :** पण पूर्वानुभव नसताना अशी मोहीम तुम्ही अंगावर घेतलीत हे थोडे धाडसाचेच नाही का ?


**प्रा. गोळे :** आम्ही गिर्यारोहणाचे शास्त्र व तंत्र इथेच आमच्या पद्धतीने शिकून घेतले होते, शिक्षणाच्या दृष्टीने आम्ही कुठेही उणे नाहीत असा आम्हांला विश्वास होता. पण त्याला सरकारी संस्थेच्या मान्यतेचे शिक्कामोर्तब नव्हते. आम्हांला ठाऊक नव्हत्या फक्त Ice-Craft म्हणजे बर्फातून वावरताना काय काय गोष्टी करावयाच्या असतात त्या ! त्यासाठी आम्ही स्वतंत्र व्यवस्था केली. दार्जिलिंगला शेरपांची एक खाजगी संस्था आहे. त्यातला एक शेरपा शिक्षक व इतर दोन शेरपा यांच्याशी करार करून त्यांना आम्ही या मोहिमेत बरोबर घेतले; आणि बर्फमय प्रदेश लागला तेव्हा तिथल्या तिथच त्यांच्याकडून Ice Craft चे तंत्र शिकून घेतले.

**प्रश्न :** या सगळ्या अडचणींनी सुरुवातीला थोडे खचून गेला असाल ?

**प्रा. गोळे :** उलट अडचणी वाढल्या तशा आम्ही जास्तच कसून कंबरा बांधल्या. पैसा जमवायचा हा मुख्य प्रश्न. त्यासाठी एक ' फनफेअर ' भरवली. त्याची स्मरणिका (सोव्हेनीर) काढली. त्यातल्या जाहिरातीचे उत्पन्न झाले. पुण्यातले काही उद्योगपती आमच्या साहाय्याला धावून आले. इतर काही कंपन्यांनी चॉकोलेट, बिस्किटे, औषधे, अन्न वगैरे सामग्रीच्या तयार पेट्या वगैरे साहित्य पुरविले. अशा तऱ्हेने अनेकांचे हात लागून ही मोहीम अखेर वाट चालू लागली. दार्जिलिंगच्या शेरपांच्या संस्थेने शिक्षक व इतर शेरपा पुरविण्याचे मान्य केले. ते पत्र १२ एप्रिल ६७ ला आमचे हाती आले. त्याबरोबर १२ मे १९६७ ही आमची मोहिमेस निघण्याची तारीख आम्ही निश्चित केली.

**प्रश्न :** हिमालयातली मोहीम काढायची म्हणजे पूर्वतयारी बरीच करावी लागत असेल ?

**प्रा. गोळे :** होय तर. आधी ज्या शिखरावर आम्हांला जायचे त्या प्रदेशाचा निदान स्केचमॅप तरी जवळ असणे जरूर होते. एका मासिकात तो मिळाला. थंड हवेसाठी विशिष्ट तंबू लागतात–तसे दोनच तंबू भाड्याने मिळाले; पण काही गोष्टी मिळवायला मात्र बराच त्रास पडला ! उदा. बर्फात चालताना पकड घ्यावी म्हणून बुटांना खाली ' क्रॅम्पॉन्स ' म्हणजे पोलादी खिळ्यांचे खूर बांधावे लागतात. ते कुठे मिळेनात. दार्जिलिंगचे शेरपा येताना दोन जोड्या घेऊन येणार होते; पण आम्ही एकंदर होतो पाचजण; शेवटी पुण्यातल्या लोहारांना नमुना दाखवून हे क्रॅम्पॉन्स




→ → → मोहिमेचा मार्ग
△ शिखर सुदर्शन
B. C. बेस कँप

इथेच करून घेतले आणि विलायती क्रॅम्पॉन्सच्या पोलादाची सर तुमच्या गावठी कामाला येणार नाही, असे आम्हांला अनेकांनी सांगितले; आम्ही हे सर्व लक्षात घेऊन दुप्पट जाडीचे क्रॅम्पॉन्स' करून घेतले आणि समाधानाची गोष्ट अशी की, तेच आम्हांला जास्त उपयोगी पडले. कारण शेरपांनी आणलेले क्रॅम्पॉन्स आमच्या बुटांना बसेनात !

**प्रश्न :** तुमच्या मोहिमेची आम्हांला थोडक्यात कल्पना देता का ?

**प्रा. गोळे :** हृषिकेशहून ९२ मैलांवर उत्तरकाशी आहे. तेथून पुढे ४२ मैलांवर 'झाला' हे ठिकाण आहे. तेथपर्यंत मोटारींचा रस्ता आहे. 'झाला'पासून पायी रस्ता आहे. १८ मैलांवर गंगोत्री हे यात्रेचे ठिकाण आहे, तेथे बरेच यात्रेकरू

जातात. वस्तीचे असे हे शेवटचे ठिकाण. आम्ही उत्तरकाशीला पोर्टर ठरवले; झालाला खेचरे घेतली. गंगोत्रीला सामान आणून टाकल्यावर खेचरांचे काम संपले. गंगोत्रीहून १२ मैलांवर ' गोमुख ' आहे. ही वाट फार बिकट आहे. आम्ही गोमुखला मुख्य तळ Base-camp ठोकला. गोमुखाची उंची सुमारे साडेबारा हजार फूट आहे. तिथून पुढे मोहिमेचे ठराविक तंत्र सुरू झाले.

**प्रश्न :** ठराविक तंत्र म्हणजे काय ?

**प्रा. गोळे :** म्हणजे असे, की जिथे तळ पडला असेल तिथून नकाशात दाखविल्याप्रमाणे पुढली वाट प्रत्यक्ष पाहून यायची व त्या पाहणीत पुढल्या मुक्कामाची (बेस कॅम्प) जागा मुक्रर करावयाची. मग मागच्या मुक्कामास परत यायचे, दोघा-दोघांच्या जोड्या करून काही सामान बरोबर घेऊन पुढल्या मुक्कामावर ते टाकून परत मागच्या मुक्कामाला यायचे व पुन्हा सामान घेऊन पुढे जायचे. नव्या मुक्कामावर सर्व सामान पोचले की तिथे तंबू ठोकून कॅम्प ठोकावयाचा. मग त्या पुढच्या मुक्कामासाठी हीच क्रिया पुन्हा पुढे चालू करावयाची.

**प्रश्न :** साधारणत: किती अंतरावर हे तळ ठोकावे लागतात ?

**प्रा. गोळे :** ते सोयीस्कर जागा पाहून त्याप्रमाणे ते ठरवावे लागते. साधारणपणे २॥ ते ३ मैलांवर आम्ही तळ ठोकले; पण तेवढ्यात उंची मात्र खूपच वाढते. गोमुखांहून आमचा पहिला कॅम्प ३॥ मैलांवर पडला तो 'रक्तवर्ण' कॅम्प. इथल्या हिमनदीत लालसर माती मिसळल्यामुळे बर्फ लालसर दिसतो म्हणून हे नाव पडले आहे. याची उंची १५,००० फूट आहे. नंतरचा कॅम्प २ मैलांवरच्या ' थेलू ' ग्लेशरवरच ठोकला–पण तेवढ्यात उंची १८,००० फुटांवर गेली. सामानाची ने-आण चालू असताना एकीकडे Ice–craft चे शिक्षण आम्ही इथेच घेतले. यानंतरच्या कॅम्पसाठी मात्र आम्हांला थोडे खाली उतरून नंतर पुन्हा वर चढावे लागले. त्याला 'श्वेतवर्ण' कॅम्प असे नाव दिले. कारण इथे आता बर्फ शुभ्र होते. उंची साधारण तेवढीच म्हणजे १७,५०० फूट होती. तिथून मात्र आम्ही थेट शिखराची वाट धरली. ३ जून १९६७ ला श्वेतवर्ण कँपवर होतो. ४ जूनला पहाटे ५ वाजता आमच्यापैकी तिघेजण शिखराकडे निघाले; यापुढची वाट फारशी बिकट नव्हती. पण हवा एकदम खराब होऊ लागली. तिघेजण ११॥ च्या सुमारास शिखरावर पोचले पण तेवढ्यात हवा फारच बिघडली; बाकीच्या दोघांनी वर जाऊ नये असे शेरपाही म्हणू लागले; परंतु शिखर इतके जवळ आल्यावर इतरांनाही राहवेना; तेही जाऊन आले. तेवढ्यात पुढचे दिसेनासे झाले एवढी हवा बिघडली; पण एव्हाना ' ज्यासाठी केला होता अट्टाहास ' ' तो ' दिस ' गोड ' झाला होता. ' सुदर्शन 'ची उंची २०,१२५ फूट आहे.

**प्रश्न :** वा: फारच छान ! आता थोडीशी इतर माहिती विचारतो. इतर म्हणजे हवामान, वनस्पती, प्राणी वगैरे–

**प्रा. गोळे :** पंधरा हजार फुटांपर्यंत झाडे झुडपे, पक्षी, हरणं वगैरे भेटायची. जळणासाठी लाकूडही मिळत होते; त्यानंतर साधारण १७,००० फुटांवर मात्र बर्फाखेरीज काहीही दिसत नव्हते. बरोबरच्या घनइंधनाचा (solid fuel) तंबूत उपयोग करावा लागे.

**प्रश्न :** तुम्हांला वाटेत यती किंवा तत्सम प्राणी भेटला का ?

**प्रा. गोळे :** यती काही भेटला नाही. पण एका रात्री तंबूत झोपलो असताना कुणीतरी मोठ्याने किंचाळण्याचा आवाज जवळजवळ तासभर ऐकू येत होता. आम्ही बाहेर डोकावून पाहिले; आवाज पुष्कळच लांब होता. त्यामुळे तो वाऱ्याचाच आवाज होता का एखाद्या प्राण्याचा हे काही कळलं नाही; पण तो वाटत होता मात्र प्राण्यासारखा.

**प्रश्न :** इतक्या उंचीवर हिंडायला भीती वाटते का हो ?

**प्रा. गोळे :** प्राणी नाही, वनस्पती नाही, बर्फ–केवळ बर्फ–उंच शिखरे, कडे, खोल घळचा. निसर्गाच्या या रुद्रावतारामुळे एकट्याने बाहेर जाणे नको असे वाटे. नेहमी जोडीने हिंडायचे हा गिर्यारोहण शास्त्रातला एक अलिखित नियमच आहे. आमच्यातले एकजण एकदा 'सहज तिथपर्यंत जाऊन येतो' असे म्हणून दुपारी ३ च्या सुमारास बाहेर पडले. ५॥ च्या आत परत या, असे त्यांना निक्षून सांगितले तरी त्यांचा ६-६॥ पर्यंत पत्ता नाही. आम्ही घाबरलो. कारण एकदा अंधार पडला आणि चुकामूक झाली की, माणसाचे काय होईल न् काय नाही याचा नेम नाही ! अखेर एकदाचे ते गृहस्थ ६॥ वाजता परत आले. आपण फार लांब गेलो होतो हे त्यांच्या लक्षातच आले नाही. अंतराचे नेहमीचे ठोकताळे हिमालयात फसवे ठरतात–म्हणून तिथले अंतर हे मैलांत मोजत नाहीत. तासांत मोजतात. अमूक अमूक ठिकाण दोन मैल दूर आहे असे न म्हणता चार तास दूर आहे असे म्हणायचे !

**प्रश्न :** तुमच्यापैकी कोणाला मोहिमेचा त्रास झाला का ?

**प्रा. गोळे :** सुदैवाने कोणालाही काही झाले नाही. इतक्या उंचीवर डोके दुखते, सकाळी उठल्याबरोबर मरगळ वाटते, रात्री शांत झोप लागत नाही, वरचेवर जाग येते–भूक कमी लागते-पण या तक्रारी नेहमीच्याच आहेत, आम्ही जुजबी औषधे, व्हिटॅमिन्सच्या गोळ्या बरोबर घेतल्याच होत्या–त्यांचाही उपयोग झाला.

**प्रश्न :** जे 'सुदर्शन' शिखर आपण ठरवले होते तेच हे अशी तुमची खात्री कशी पटली हो ?

**प्रा. गोळे :** परदेशांत तयार झालेले नकाशे पुष्कळसे बरोबर असतात. 'सुदर्शन'चे दर्शन होत होतेच. खरे म्हणजे ही एक शिखर–मालिका आहे. ओळीने साधारण उंचीची चार शिखरे आहेत. त्यांतले एक आम्ही चढण्याचे ठरविले. कारण ते खऱ्या अर्थाने 'शिखर' म्हणजे निमुळते व टोकदार होते. वरचा माथा फक्त १०×१२

फूट आणि तोही थोडा उतरता होता. बाकीची तीन शिखरे थोडी वर्तुळाकार होती. म्हणून ती सोडून आम्ही हे पसंत केले.

**प्रश्न :** या मोहिमेत काही विशेष सांगण्यासारख्या घटना घडल्या काय ?

**प्रा. गोळे :** सतत तासभर किंकाळणारा आवाज मघाशी सांगितला. दुसरे म्हणजे शिखराचा शेवटचा चढ चढण्याचे थोडे आधी, एक प्रचंड आवाज झाला. बर्फ कोसळतो तेव्हा असा आवाज होतो. आणि आमच्या पलीकडेच साधारण १०–१५ फूट अंतरावर एक मोठी भेग पडून तिथला भाग फूट-दीड फूट एकदम खचला. त्याचा अर्थ असा की, आम्ही कड्यावरून चाललो होतो आणि पंधरा फुटां-पलीकडचा भाग–कड्याबाहेर लोंबत असलेले नुसते बर्फ होते. ते अचानक कोसळले म्हणून चालताना फार कडेने चालण्याची काळजी हिमालयात नेहमीच घ्यावी लागते.

**प्रश्न :** शेरपा, आणि पोर्टर्स यांच्याबद्दलचा तुमचा अनुभव काय आहे ?

**प्रा. गोळे :** हे सर्वजण आपल्याला कामात वाकबगार असतात यात शंकाच नाही. शेरपा लोकांनी आजवर बहुधा परकीय तुकड्यांबरोबर कामे केली असल्यामुळे त्यांना सर्व बाबतीत समृद्धीची सवय असते; त्यामुळे आमची तुटपुंजी जमवाजमव पाहून त्यांना आमच्या यशाबद्दल शेवटपर्यंत थोडी शंकाच होती. पोर्टर ही एक अत्यंत इमानी आणि प्रामाणिक जमात आहे. हे बहुतेक नेपाळी होते. आमच्या एका सुतळीच्या तोड्यालाही त्यांनी हात लावला नाही. इतकेच नाही पण रेशनसुद्धा पुष्कळदा सर्वस्वी त्यांच्याच ताब्यात होते. पण त्यांनी त्या संधीचा कधीही गैर-फायदा घेतला नाही.

**प्रश्न :** आता शेवटी एक प्रश्न. अलीकडे हिमालयात गिर्यारोहकांच्या पुष्कळ तुकड्या मोहिमा नेतात आणि तुमच्या 'सुदर्शन'पेक्षाही जास्त उंचीची शिखरे गाठतात. रागावू नका पण बाकीच्या मोहिमा आणि तुमची ही मोहीम यांत फरक काय ? तुमच्या तुकडीचं काही वैशिष्टच आहे का ?

**प्रा. गोळे :** याचं उत्तर देताना थोडा संकोच वाटतो. कारण आपण काय केलं ते आपणच आपल्या तोंडानं सांगणं बरं नाही, पण विचारताच म्हणून सांगतो. एकतर या शिखरावर अद्याप कोणाचे पाय लागले नव्हते. एकंदर या भागाकडे त्या मानानं गिर्यारोहकांचं लक्ष कमीच गेलंय. तेव्हा अशा आजवर अनुल्लंघित शिखरावर आम्ही जायचं ठरवलं आणि जाऊन आलो यात वेगळेपण नाही का ? पुन्हा, तिथे जायचा मार्ग आमचा आम्ही शोधला, ठरवला. सुरुवातीला सांगितलंच की इत-रांना जी सर्व प्रकारची मदत मिळते ती आम्हांला अजिबात मिळाली नाही. उलट 'तुम्ही शास्त्रशुद्ध अभ्यासक्रम न करता भलत्या गोष्टीला हात घालताय. पाहा बुवा!' अशा तऱ्हेची धोक्याची सूचना देऊन तज्ज्ञ मंडळींनी आम्हांला नाउमेदचं केलं. अशा तऱ्हेच्या मोहिमेला कशी साधनसामग्री हवी त्याचेसुद्धा शास्त्रसंमत नियम ठरलेले

आहेत. त्या मानाने आमची सामग्री अगदीच अपुरी होती. बर्फात घालण्यासाठी जे खास बूट लागतात तेही नव्हते. आम्ही चक्क साधे एन. सी. सी. चे सैनिकी बूट वापरले. त्यातून बर्फ आत जाऊ नये म्हणून पॉलिश थापून मोके बंद केली. कपड्यांच्या बाबतीतही तोच प्रकार. पिसाचा कोट त्या हवेत अवश्य लागतो असे शास्त्र सांगते. आमच्याजवळ तो एकच होता. पण मिळेल त्या साहित्यावर आम्ही भागवायचं ठरवलं आणि जिद्द असेल तर या बाह्य गोष्टींचा फाजील बाऊ करण्याची जरुरी नाही हा धडा अनुभवाने शिकलो. काही सामग्री तर पुण्यासच करून घेतली. ती जवळ जवळ निम्म्याने स्वस्त पडली ते वेगळेच.

**प्रश्न** : शिखरावरून फोटो घेतले असतीलच तुम्ही; कारण पुढे ते फार उपयोगी पडतात.

**प्रा. गोळे** : पुष्कळ. जवळजवळ सव्वाशे-दीडशे घेतले आहेत. पण हिमालयाची हद्द लष्करी दृष्टचा सध्या ' संरक्षित प्रदेश ' असल्यामुळे, परत येताना ते फोटो सरकारी अधिकाऱ्यांकडे तपासणीसाठी ठेवावे लागले. त्यात आक्षेपार्ह काही नाही, असे ठरल्यावर ते परत आमचे हाती येतील तेव्हा तुम्हांला जरूर दाखवू. ' मॅजिक लॅंटर्नच्या स्लाईडस्‌सुद्धा दाखवायची सोय केलीय. जमलं तर सर्वांनाच त्या एकदा दाखवण्याचा कार्यक्रम आखावा, असा बेत आहे आमचा.

**प्रश्न** : हे ' सुदर्शन ' आता तुमच्या हाती आल्यानंतर याहूनही उंच आणि अवघड अशी आणखी अनुल्लंघित शिखरे काबीज करण्याची साहजिकच तुमची महत्त्वाकांक्षा असेल ?

**प्रा. गोळे** : गिर्यारोहण हा साहसाचा एक प्रकार; त्यात आम्ही आमच्या कुवतीप्रमाणे थोडी कामगिरी केली. आता याहून वेगळ्या प्रकारचा उपक्रम हाती घ्यावा असा विचार आहे. पण ती तूर्त तरी एक कल्पनाच आहे. डोळ्यासमोर नाचणारे केवळ एक स्वप्न आहे.

**प्रश्न** : एक स्वप्न साकार झाले तसे हे दुसरेही होईल की ! त्याची थोडी कल्पना तर द्याल ?

**प्रा. गोळे** : पाण्याखाली बुडी मारून थोडेफार संशोधन करावे, पाहणी करावी या दृष्टीने काय करता येईल याचा आम्ही विचार करणार आहोत. पाश्चात्त्य देशांत याला Skin Diving म्हणतात; भारतात छंद म्हणून या उपक्रमाकडे अजून कोणाचेही लक्ष गेलेले नाही. त्यासाठी पाण्यात बुडी मारून संचार करण्याचा आधी सराव करावयास हवा. साधने आणि सोयी अगदी वेगळ्या तऱ्हेच्या लागणार; हे सर्व बरेच अवघड काम आहे. परंतु अद्याप कुणी हाती घेतले नाही म्हणूनच या उपक्रमाची ओढ आम्हांला वाटते आहे; बघूया नजीकच्या भविष्यकालात काय जमते ते !

●

## वसा

उजाडल्या मनी
टोचणारे क्षण
जीवनाचे वण
जागोजाग
सोसायला हवा
दु:खाचा तडाखा
नसणाऱ्या सुखा
ओलांडीन
नको मनावर
काळाचाच ठसा
घेतलेला वसा
सांभाळीन

*—वासंती इनामदार*

## पाप

बुचकळले हे मन
अभंगाच्या अमृतात
लावणीच्या चंद्रिकेची
नाही भोगली गा रात
भिंगे वेदान्त-चष्म्याची
डोळ्यांवर जाडजूड
प्रिय वासनेच्या उरी
तत्त्वज्ञानाचा दगड !
तथाकथित पुण्याची
आता बोचते कमाई
गात्रागात्रांतून आज
पाप घुमवी सनई ! !

*—उ. रा. गिरी*

## मनाचाच माझ्या पट

असे झाकोळते कधी
निळे निरभ्र आकाश,
आणि गिळता चांदण्या
वीज ओकते प्रकाश.
असा सुसाटतो वारा
कधी होऊनि मोकाट,
आणि शहारे भिऊन
धीट सागराचा काठ
असा नाचतो नागडा
कधी धुंदीत पाऊस,
आणि झोडतो साऱ्यांना
मनी . ेऊन बेहोष.
पुन्हा आकाश निरभ्र
चांदण्यात श्रांत वारे,
मनाचाच माझ्या पट
असे दाखवितो दोरे !

*—सूर्यकांत पुराणिक*

## दारे सारी लागलेली....

दारे सारी लागलेली रस्ते कसे सुने सुने
पिंपळाच्या झाडावर झोपलेली मुकी पाने
ओळ अंधुक दिव्यांची दूर पुलाशी गेलेली
किती भयाण वाटते माझी मलाच सावली
गाढ झोपलेले चर्च उभा माथ्यावर क्रॉस
एका प्रेताच्या सोबत मंद चाललेला गॅस
धर्मशाळेत पडक्या धुनीपाशी कुणी जोगी
अन् भिंतीच्या कडेला दु:ख गाळे महारोगी
जरा पुढे रेल्वे पूल आता सारा ओकाओका
हात पसरून उभा अजूनही एक मुका...
दारे सारी लागलेली रस्ते कसे सुने सुने
पिंपळाच्या झाडावर झोपलेली मुकी पाने

*—कुसुमानंद*

# आस्वाद :

अखेर हर्षामर्षाचे कारण मनच असते ! मनच आनंदाची चित्रे रेखाटते आणि दु:खाची स्वप्ने पाहते. सूर्यकान्त पुराणिक यांनी एका निसर्गचमत्काराचे चित्रण करून हेच सुंदर रीतीने व्यक्त केले आहे. सागराचा धीट काठ शहारतो ही कल्पना रम्य वाटते. कवितेला आवेश आहे. पण शेवटी एक साधे विधान करून त्या आवेशाला थोडी मरगळ आणली आहे. तात्पर्य जोडल्याने कवितेतल्या काव्याचा विरस होतो हेच थोडे वेगळया काव्यमय पद्धतीने सांगता आले असते. पण आहे त्या स्थितीतही कविता मनाची पकड घेते.

जग हे दु:खमय कुणाला ? भावनेने पाहील त्याला ! करुणेच्या डोळयांनी पाहिल्यास दु:खीकष्टी दुनिया चटकन् डोळयांत भरते. असेच दुनियेचे रूप कुसुमानंदांनी एका रात्री पाहिले. 'क्रॉस्' आणि 'गॅस्' ही यमकाची ख्रिस्ती जोडी 'मराठीचिये नगरीं' थोडी अपरिचित वाटली तरी वातावरण-निर्मितीला तिने फार मदत केली आहे. कारुण्य हे क्रॉसचे वैशिष्टय. मुके, महारोगी यांची चित्रे कारुण्य वाढवितात त्या मानाने शेवटच्या ओळीतले चित्र सपक वाटते ! कारण कवीने जे एकंदर करुणरम्य चित्र उभे केले आहे त्याला 'पाने नुसती झोपली आहेत' एवढेच सांगणे रसोत्कर्षाला फारसे पोषक होत नाही.

'पाप' हे कृत्रिमतेने दबविले तर दबत नाही. ते भूमिगत होऊन अधिकच प्रबळ होते. उ. रा. गिरी यांनी साधनेतले एक मोठे सूत्र मोठया कुशलतेने सांगितले आहे. वेदान्ताचा जाडजूड चष्मा लावला. अभंग संकीर्तन केले. लावणीचा मोह आवरला. पण अशाने वासना दबत नाहीत. वरवरचे इलाज सगळे फुकट जातात. हठाक्लिष्ट मार्गाने आध्यात्मिक उन्नती साधण्यातले वैफल्य गिरींनी थोडक्या शब्दांत सूचित केले आहे.

याच्या उलट वासंती इनामदार व्रताची पताका खांद्यावर घेतात. परिस्थितीचे तडाखे कसेही खावे लागले तरी आपला ध्येयमार्ग न सोडण्यात समाधानच नव्हे, तर आनंद असतो ! पण या चित्रणात अंतरीचे दु:ख फार सूक्ष्मपणे रंगविले आहे. जीवनात पदोपदी काटे टोचत आहेत आणि सुखाने तर हजेरी लावलेलीच नाही. हे सारे फार आक्रोश न करता दाखविले, यात संयम फार वाखाणण्यासारखा आहे.

*—गोपिनाथ तळवलकर*

## शेखर शिवराम पाटील



# बुगडी

कमरेची घागर डचमळली. पायात सलणाऱ्या कर्दीच्या काट्यासारखी दत्तूची हाक काळजाला रुतली. पण ऐकून न ऐकल्यासारखं करून ती चालाया लागली... जणू दत्तू तिचा कुणीच नव्हता ... जणू दत्तूशी तिचं कसलं नातच नव्हतं ... मध्ये गेलेल्या एका वर्षातच जणू दत्तूच्या साऱ्या आठवणींनी ती भुलून गेली होती... दत्तू दुमंगून गेला. त्याचं काळीज विदीर्ण झालं ... "नर्मदे...नर्मदे, अशी कशी ग तू ? मी तुझा कुणीच नाही का ... ? खरंच कुणीच नाही का ? ... तुला आठवतं नर्मदे, एकेकाळी आपण एकमेकांवर जिवापाड प्रेम केलं होतं. रातीदिशी एकमेकांचा ध्यास घेतला होता. त्या वेळी तू नेहमी म्हणायचीस... दत्तू, दत्तू, तुला एकट्याला शोधण्यासाठीच परमेश्वराने माझे डोळे निर्माण केलेत ... ! आणि

" नर्मदे, कसं सांगू तुला....आगोठीला तयार केलेल्या मुंग्यांचं वारुळ मारक्या बैलानं ढुशी देऊन उद्ध्वस्त करावं, तसं माझं आयुष्य उद्ध्वस्त झालं आहे. तुझी बुगडी मी जपून ठेवली होती. कधीतरी....."

खरंच होतं तुझं ते म्हणणं. त्या वेळी एक दिवस जरी मी तुझ्या नजरेस पडलो नाही, तरी तू वेडीपिशी व्हायचीस... रडून रडून डोळे सुजवायचीस आणि अखेर हजार खटपटी-लटपटी करून माझी भेट घ्यायचीस ...ते का मला माहीत नाही ! मग आजच हा दुरावा का...? अजूनपर्यंत तू मला परकी नाहीस नर्मदे ! तू माझीच आहेस ! शरीरानं नसलीस तरी मनानं तू माझीच आहेस...

" थांब नर्मदे."

फिरून दत्तू उद्गारला. तिचा इलाज हरला. कुणीतरी बांधून ठेवल्यासारखी तिची पाऊले जागच्या जागी रुतून बसली आणि सावलीसारखा दत्तू पुढे सरसावला. वाट अडवून बोलला,

"कंदी आलीस नर्मदे ?"

" गेले सनवारी ! "

" बरा हाय नं ? "

" हूं ! "

" कती दिस मुक्काम ? "

" हाय दोन रोज."

"जावाचा कंदी ? "

" येते सनवारी."

" मंग जाता जाता एक दिस तरी मला भेटून जा; जाशील नं ? "

ती चरकली. सुटू पाहणारी कमरेची घागर तिने कशीबशी सावरली.

" काय उत्तर द्यावं याच्या प्रश्नाला... अरे, ज्या दिवशी माझं लग्न झालं त्याच दिवशी माझ्यावरला तुझा अधिकार नाहीसा झाला...कधी काळी तू माझा होतास...तेव्हा तुझ्या वाट्टेल त्या गोष्टीला मी मान हालवली, पण आता मी तुझी राहिले नाही, हे कसं कळत नाही तुला ?...वेडाच आहेस ! कुणी पाहिलं तर...?

ती बुचकळयात पडली. आणि तिच्या होकाराची वाट पाहत खुळयासारखा तो उभा राहिला. मिरभिरत्या नजरेत तिने त्याला डोळयांत लपवलं, आणि तिला गहिवरून आलं. खरच गेल्या वर्षभरात दत्तू साफ उतरला होता. पूर्वीच्या त्याच्या बलदंड शरीराचा नुसता सापळा झाला होता. केसाचं रान माजलं होतं. दाढीचे खुंट बोट बोट वाढलेले दिसत होते ... "दत्तू ..दत्तू, अरे पुरुषासारखा पुरुष तू ... दोन देणारा दोन घेणारा. पण एका क्षुल्लक स्त्रीसाठी का म्हणून तू असा वनवासी बनलास ! ... का म्हणून तू असं जिवाचं ओसाड रान बनवलंस...माझ्या-पायी एवढा जर तू आपला जीव ठेवला होतास...इतका जर तू माझा ध्यास घेतला होतास...मग त्या वेळी कुठे गेला होता तुझा पुरुषार्थ ! कुठे गेलं होतं तुझं सळसळत रक्त...! एका संध्याकाळी हिरवा चुडा ल्यालेली मी तुझ्या दारी आले. रडून तुला सांगायला लागले ...

"दत्तू...दत्तू माझं लग्न ठरलंय ... बघ बघ, हा लग्नाचा हिरवा चुडा बघ." तेव्हा उठवणीच्या बैलासारखा निर्बुद्धपणे तू माझ्याकडे पाहत राहिलास. नुसताच पाहत राहिलास ... आणि येथेच काय समजायचे ते मी समजले नि माझ्या साऱ्या आशा ..साऱ्या आकांक्षा दग्ध झाल्या. जळून गेल्या. तुझ्या नजरेच्या एका निर्बुद्ध कटाक्षाने. मला वाटलं होतं दत्तू परक्या घरचा हा हिरवा चुडा तू खचितच फोडून टाकशील. मला मिठीत घेऊन म्हणशील, ' नर्मदे ..नर्मदे, तू माझी आहेस. नर्मदे, माझी आहेस, माझीच राहणार आहेस. वेडे, हा दत्तू जोपर्यंत जिवंत आहे, तोपर्यंत नर्मदा दत्तूच्याच नावानं चुडा भरील.' पण...पण...! आणि आता, माझ्या पायी तू का म्हणून असा वनवासी बनलास ?...का...अखेर का ?" खालच्या मानेनं नर्मदा रडायला लागली ...

"येशील ना नर्मदे ?"

डोळयांतले अश्रू बोटाच्या चिमटीनं बाजूला करून तिने नुसतंच त्याच्याकडे पाहिलं. आधाशी नजरेने तो तिच्याकडेच पाहत होता.

"येशील ना ? "

"कंदी येवं ? "

"कंदीपन. तुला येळ मिळंल तवा."

"आज येवं ? "

"चालल् चालल्. आजच ये. मी वाट बघीत ऱ्हाईन."

"कुटं ! "

"गावाबाहेरचं देवलात !

"बरा ..."

दत्तू वाटेतून दूर आला. आणि एका हाताने डोळे पुसतच नर्मदा घराकडे वळली ...

करकरीत तिन्ही सांजेला एखाद्या रातांधळ्या पाकोळीसारखी नर्मदा देवळा-भोवती घुटमळू लागली. तो अजून आला नव्हता. आणि तिचा जीव उडाला होता...अजून कसा येत नाही दत्तू...? तिचा ऊर धपापला नि इतक्यातच तो तिच्यासमोर उभा राहिला.

"कंदीशी आलीस नर्मदे ?"

"मंगाशीच."

"आररं मला येळ झाला वाटतं ?"

"नायतं काय ? उभं राहून पायांना रत आलं माज्या."

ओठाच्या फुंकरीने तिने देवळाच्या पायरीवरली धूळ उडवली. आणि ती तेथेच उकीडवी बसून राहिली. तो अजून उभाच होता. वेड्यासारखा टकमक टकमक तिच्याकडे पाहत. चोरट्या नजरेने तिने हळूच त्याच्याकडे पाहिले. आणि ती घाबरली. बसल्या जागीच तिने पदर सावरला. नि—काहीतरी बोलायचं म्हणून ती बोलून गेली,

"आरं आरं, उभा का दत्तू, बस तरी."

झोपेतून उठल्यासारखा तो खडखडून जागा झाला......"अं...अं...नको नको, मना येल नाय."

"येळ नाय ?" ती अचंब्यात पडली. काय म्हणावं या वेड्या माणसाला! नको नको म्हणत असताना यानेच इथे येण्याची आपल्याला गळ घातली, आणि आता हाच सांगतोय मला वेळ नाय म्हणून !...अरे, मग मला बोलावलंय तरी कशाला, हेच सांगायला मला वेळ नाही म्हणून ...?"

"आरं येळ नाय. मंग कशाला बोलावलीस मना ? उगेच ?"

"उगेच कशी. कामाबिगर का बोलावली तुला ?"

"काम" ? ... तिच्या अंगावर शहारेच उभे राहिले......ह्याच्या मनात तरी काय आहे. "बाबारे मी ही परक्याची बाईल. किती विश्वासाने आलेय तुझ्याकडे.... माझा असा घात करू नको..."

"नर्मदे-"

ती जागीच गडबडली.

"अं!"

"घे. ही घे."

त्याने खमिसाच्या खिशात हात घातला नि सुरक्षित बांधून ठेवलेली कागदाची पुरचुंडी तिच्या हातावर ठेवली.

"काय घ्या..."

"ह्याचेसाठीच तुला बोलावली, बघ सोबत बघ, काय हायत्या."

धपापत्या काळजानं तिनं अलगद पुरचुंडी सोडली. आत सूर्याच्या तेजाची एक

बुगडी झळकताना दिसत होती.

" दत्तू...दत्तू बुगडी ?" तिने डोळे विस्फारले.

" ह्या बुगडीसाठीच तू कधीतरी घरच्या माणसांचा मार खाल्ला व्हतास ! "

" हुं. हुं, चांगलाच ! "

आणि खरंच होतं त्याचं म्हणणं. एकदा संध्याकाळी दत्तूला भेटून आपण कधीतरी घरी आलो. आणि पहाटे कुंकू लावायला म्हणून आरशी उचलली तेव्हा आपल्या कानातली बुगडी रात्रीच कुठेतरी हरवल्याची आपल्याला जाण झाली... त्या वेळी किती शोधाशोध केली आपण. अंथरूण पाहिले, कोपऱ्यातला केर चाचपडला. बैलाची दावण पाहिली; पण बुगडी गेली ती गेलीच. एवढी मोठी मी पोरगी. बुगडी सांडावयाला लहान का होते ? आयेनं शिव्यांची लाखोली वाहिली, वडिलांनी तर कळकीच्या काठीचा मार दिला. पण बुगडी......

" दत्तू दत्तू, कोठं घावली ही तुला ? तुहीकडं कशी आली !"...

" त्याचं सांगतंय नर्मदे... आठवतं तुला. एकदा सांजची ह्याच जागी मी तुला मिठीत घेतली, तवा ढळलेल्या पदराची बी तुला सुद नथी, इतकी तू बेमान झाली व्हतीस ... पन् आगायेळी पांदीत जुतं वुरारलं. तू मानावर आलीस. माझे मिठीतून दूर सरलीस नि बघता बघता गायब झालीस. पन बुगडी बाकी मात्र ठेवून गेलीस, तीच ही तुझी बुगडी बिगडी कोठंच परली नयी, तर माझे शेलेला आडकली व्हती. पन मी असा तुला कंदीच सांगला नाय, तुझे नकळत ती बुगडी जपून ठेवली... कारन् कधीतरी माझे शेल्याला अडकलेली ही बुगडी माझेच हातानी मना तुझे कानातच रव्हायची व्हती, पन्...पन्..."

त्याच्या पोटातला उमाळा घशात अडकला. आणि घशातले शब्द ओठांवाटे बाहेर पडेनासे झाले. त्याला खूप सांगायचं होतं, खूप खूप काहीतरी, " पन...पन नर्मदे कसं सांगू मी तुला... आगोठीला तयार केलेल्या मुंग्यांचं वारुळ मारक्या बैलानं ढुशी देऊन उद्ध्वस्त करावं, तसं अगदी...तसंच माझं आयुष्य उद्ध्वस्त झालं... तुझी बुगडी मी जपून ठेवली होती. ती येवढ्यासाठीच... कधीतरी आपलं दोघांचं लग्न झालं असतं. लग्नाच्या पहिल्या रात्री...तू माझ्या मिठीत आली असतीस...मग मी तुला म्हणालो असतो, नर्मदे, एक गंमत दाखवू तुला...? तू म्हणाली असतीस ' कसली गंमत ? ' मग मी म्हणालो असतो. ' आधी डोळे झाक– मगच सांगतो ...' ' चल, काहीतरीच तुझं...मी नाही जा... अहं...उहू मी नाही ...छट्... दाखव दाखव बघू...'

' तसं नाही आदी डोळे झाक'...'बरं बाबा तुझी इच्छा. हं झाकले डोळे'...होना होना करता तू डोळे झाकले असतेस. मग माझ्या शेल्याला अडकलेली ही बुगडी हळूच मी तुझ्या लालबुंद कानाच्या पाळीत चढवली असती...आणि आरशी समोर धरून म्हणालो असतो,

" द्वारके हं, उघड डोळे..." मग तुझ्या नाजुकशा डोळ्यांच्या पापण्या तू हळूच उघडल्या असल्यास..आणि...आणि...कवीतरी माझ्या शेल्याला अडकलेली ही बुगडी अकल्पितपणे तुझ्या कानाच्या पाळीत पाहून तू म्हणाली असतीस...

" दत्तू...दत्तू, कोठं घावली ही तुला ?" मग मी हसत हसत तुझ्या कानी कुजबुजलो असतो...तुझं आवडतं गाणं...ते गाणं...तू नेहमी म्हणतेस...नेहमी म्हणायचीस...नेहमी गुणगुणायचीस ते गाणं...ते गाणं...

" चांदुने रातीचा बाय तुझा खेळू मांडीला
खेळता खेळता बाय तुझी बुगडी सांडीली "
आनि...
" कलीयाचे पुना तुझे शेले गुतली
दियाचे जोतीनी बाय तुझी बुगडी चरव्हली "

पण...पण ते गाणं अधुरं राहिलं..आणि ते स्वप्नही...लहान पोरासारखा तो हमसाहमशी रडायला लागला. आणि आपल्या पदराच्या शेल्याने त्याचे डोळे पुशीत ती बोलू लागली...

" दत्तू, दत्तू ही बुगडी तुझ्याकडंच व्हावदे. माझी याद म्हणून आठव म्हंगून..."

" नको नको नर्मदे !"

" का, नको का... ? "

" काय सांगू तुला नर्मदे, ही बुगडी माझीकडं आसली का—राती दिशी मना तुझी आठव पडत. नि रातचा कंदीतरी डावा माझा डोला लागतं. तवा तुझा मना सपान पडतं...सपनात तू माझी बायको व्हतस. मी तुझा नवरा. आन ती बुगडी... नको नको—नर्मदे, तू आता माझी कोनबी व्हालीस नाय. कोनबी व्हालीस...एके भले माणसाची तू बाईल हाईस. आता तुझे इषई वाईट—चितानदेखील पाप हाय... पाप ! ह्या पापाला मी भितं नर्मदे...ह्या पापाला मी भितं..."

" मग दत्तू माझी एक विच्छा पुरी कर. "

" कसली विच्छा ? "

" पुरी करशील तू ?"

" आगं सांग तं खरी ! "

" आधी वचन दे मना. "

" हं; दिला. सांग. "

" दत्तू तुझ्येसाठी नको निदान माझे साठीतरी तू लगन कर. आन लग्नाचे पहले राती तुझे हातानी ही बुगडी तुझे बायकोचे कानात घाल...आर मग बघ...बघतरी तुझी—बायको जीत सारकीच दिसल...ती पराई बाई म्हंगून तू समजू नको...ती मीच हाय...बुगडी घातलेली आसाच समज...आसाच...

●

# व्हो ल्गा जे व्हा ला ल हो ते

**वि. स. वाळिंबे**

लेनिनचे सैबेरियातील जीवन मुळीच त्रासदायक नव्हते. त्यातही शुशेनस्कोए खेडेगाव तर अतिशय शांत होते. पीटर्सबर्गमधील धांदलीचा तेथे मागमूसही नव्हता. त्यामुळे लेनिनचा दिनक्रमही निवांत असावयाचा. सकाळच्या वेळी वाचावे–लिहावे, लिहिण्यावाचण्याचा कंटाळा आला की, नदीच्या पात्रात डुंबत बसावे किंवा मासे पकडावेत. फारच उत्साह असेल तर खांद्यावर बंदुक टाकून लगतच्या जंगलातील पाखरे टिपावीत असे तेथील संथ जीवन होते. लेनिन कधीकधी शेजारच्या शेतकऱ्याच्या झोपडीवर जाऊन गिटार वाजवीत बसावयाचा. पीटर्सबर्गमधील वृत्तपत्रेही या गावात येत होती. त्यामुळे आपण जगापासून दूर पडलो आहोत, असेही वाटत नव्हते. लेनिनला सरकारकडून दरमहा किरकोळ खर्चासाठी सात रूबल्स चाळीस कोपेक्स मिळत होते. एकंदरीत या हद्दपारीबद्दल तक्रार करावी असे काही नव्हते. शुशेनस्कोएमधील वास्तव्यात लेनिनची प्रकृतीही सुधारली. या सुखासीन जीवनाचे उल्लेख लेनिनच्या तत्कालीन पत्रातही पाहावयास सापडतात.

आपल्या आईस लिहिलेल्या पत्रात तो म्हणतो, 'शुशेनस्कोए हे एक शांत खेडेगाव आहे. गावाजवळूनच येनिसे नदी वाहते. तिचे पात्र बरेच रुंद असल्यामुळे पोहण्याची आयतीच सोय झाली आहे. गावाच्या एका बाजूला घनदाट जंगल आहे. दुसऱ्या बाजूला सायन्स्क पर्वतराजी सुरू होते. या पर्वताची बरीचशी शिखरे बाराही



# ६

महिने हिमाच्छादित असतात. हा साराच परिसर इतका सुंदर आहे, की, माझ्या-सारख्या अरसिकालाही कविता करण्याची स्फूर्ती व्हावी. नव्हे मी प्रत्यक्ष कविता लिहावयाला बसलोच. 'त्या प्रोत्तुंग पर्वताच्या पायथ्यास, थवकते शुशेन्स्कची वेस' हा पहिला चरण झटक्यात लिहून टाकला. मग मात्र कविता करणे हे काम काही सोपे नव्हे हे कळून चुकले. त्यामुळ पहिल्या चरणावरच आमचे कवित्व थांबले. येथील शिकारीतही मजा आहे. काल तर मी जंगलात चांगला दहा-बारा मैल आत गेलो होतो. ॲना माझ्या नेमबाजीची किती चेष्टा करते हे तुला माहीत आहेच. तरीदेखील माझा कालचा पराक्रम काही साधासुधा नव्हता.'

ॲनाला लिहिलेल्या दुसऱ्या एका पत्रात लेनिन कळवितो, 'माझ्या येथील दिनक्रमात फारसा बदल होत नाही. कालचा दिवस जसा घालविला तसाच आजचाही घालवायचा असतो. त्यात बदल एवढाच की काल एक पुस्तक वाचलेले असते तर आज दुसरे! एके दिवशी तुम्ही गावाच्या डाव्या बाजूला फिरावयास जाता तर दुसऱ्या दिवशी नेमक्या उलट दिशेला. लेखनाचा कालचा विषय निराळा. आजचा निराळा. एवढा बदल झाला तरीदेखील मनाला बरे वाटते. परंतु यावरून मी येथे उदास मन:-स्थितीत कालक्रमणा करीत आहे असे मात्र समजू नकोस हं! मी मजेत आहे. सध्या थंडीचा कडाका असल्यामुळे जवळजवळ दिवसभर मी घरातच असतो.

त्याचा एक फायदा असा झाला की ग्रंथलेखन झपाट्याने होत आहे.'

शुशेनस्कोए येथे लहान असताना लेनिन बुद्धिबळाच्या खेळात रंगून जायचा. तो प्रथम येथे आला तेव्हा या खेड्यात बुद्धिबळे जाणणारा कोणीच नव्हता. प्रथम त्याने स्ट्रोगॅनोव्ह या आपल्या नव्या शेतकरी मित्राला हा खेळ शिकविला. स्ट्रोगॅनोव्ह या खेळात बराच प्रवीण झाला, तरीपण प्रत्येक वेळी लेनिनचीच जीत होई. शुशेनस्कोएपासून काही मैल अंतरावरच्या गावात लेपेशिन्स्की नावाचा आणखी एक राजबंदी राहत होता. त्यालाही बुद्धिबळाचा नाद होता. लेनिन आणि तो परस्परांना पत्रे धाडून हा खेळ खेळत असत. शुशेनस्कोए येथील वास्तव्यात लेनिन बुद्धिबळाच्या खेळात इतका मग्न झाला होता की, तो झोपेतही 'तू घोडा इथं हलविलास तर मी माझा हत्ती तिथं नेईन,' असली काहीतरी बडबड करीत असे. सैबेरियातून परतल्यानंतर मात्र त्याने बुद्धिबळे कधीही खेळावयाची नाहीत, असे ठरविले. पुढे त्याने पश्चिम युरोपमध्ये निर्वासित अवस्थेमध्ये कितीतरी वर्षे काढली. परंतु कोणी बुद्धिबळाचे नाव काढले की लेनिन तेथून उठून जात असे. कोणी कारण विचारले तर तो सांगायचा, "हा खेळ असा आहे की तुम्ही त्यात नादावून जाता आणि मग कामाकडे दुर्लक्ष होते."

शुशेनस्कोएमधील गावकऱ्यांचे लेनिनवर प्रेम होते. एक विद्वान माणूस आपल्या गावात राहावयास आला आहे याबद्दल त्यांना अभिमान वाटे. एर्माकोव्ह या शेतकऱ्याने असे लिहून ठेवले आहे की, संध्याकाळच्या वेळी लेनिन फिरावयास निघे तेव्हा त्याचे दोन्ही हात पाठीमागे जुळलेले असत. ही त्याची अगदी ठरीव पद्धत होती. फेरफटका मारावयास निघाला की तो विचारांच्या तंद्रीत एवढा बुडून गेलेला असे की शेजारून कोण जात-येत आहे, याचे त्याला भानही नसे.

दुसऱ्यावर चटकन छाप पाडण्याच्या लेनिनच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाबद्दलच्या झार्वेटकिन या दुसऱ्या एका शेतकऱ्याने सांगितलेला प्रसंग गंमतीचा आहे. एके दिवशी झार्वेटकिन लेनिनच्या घरी बसला असताना तीन पोलिस धाडकन दार उघडून तेथे आले व मग्रूरपणाने लेनिनला म्हणाले, "आम्हांला तुमच्या घराची झडती घ्यायची आहे." लेनिनच्या होकाराची वाट न पाहता पोलिसांनी खोली तपासण्यास प्रारंभ केला. लेनिनही आपल्या जागेवरून हलला नाही. झडतीनंतर लेनिनचा जबाब घेण्यात आला. परंतु त्या वेळच्या लेनिनच्या बोलण्याने ते पोलिस इतके प्रभावित झाले की जाताना त्यांनी लेनिनला सलाम ठोकला. इतकेच नव्हे तर ते म्हणाले, "साहेब, तुमचे म्हणणे बरोबर आहे. आम्हांला पटलंय ते. पण आम्ही पडलो सरकारी नोकर! यापुढे तुम्हांला असा त्रास होणार नाही याची मात्र आम्ही नक्की काळजी घेऊ."

नादेझ्दा क्रुपस्काया १८९८ च्या मेमध्ये शुशेनस्कोए येथे येऊन पोचली. चार वर्षांपूर्वी पीटर्सबर्गमध्ये लेनिनची आणि तिची पहिल्यांदा भेट झाली होती.

कृपस्काया पीटर्सबर्गमध्ये प्रौढांसाठी चालविलेल्या रात्रीच्या शाळेत शिक्षिकेची नोकरी करीत होती. तिचे बरेचसे विद्यार्थी लेनिनच्या मार्क्सवादी गटाचे सदस्य होते. या विद्यार्थ्यांकडून कृपस्कायाला लेनिनसंबंधी वारंवार ऐकावयास मिळे. कालान्तराने तीही लेनिनच्या बैठकींना हजर राहू लागली. अशाच एका बैठकीच्या वेळी त्या दोघांचा परिचय झाला. लेनिन न्युमोनियाने आजारी पडलेला असताना कृपस्काया त्याला भेटावयास येत असे. नकळत ते दोघेजण परस्परांकडे आकर्षित झाले आणि प्रेमाच्या गोष्टी बोलू लागले.

लेनिनला अटक झाल्यानंतर त्याला भेटण्याची परवानगी असलेल्या आप्तेष्टां-बरोबर कृपस्काया पत्रे धाडीत असे. आपल्यानंतर तिलाही अटक झाली आहे काय याची लेनिनही सारखी चौकशी करीत होता. पोलिसांना सुगावा लागू नये म्हणून मार्क्सवादी गटाच्या कार्यकर्त्यांना निराळी नावे दिलेली असत. पक्ष बैठकीत कृपस्काया 'मिनोगा' या नावाने संबोधिली जात असे. कृपस्कायाची चौकशी करण्यासाठी लेनिन भेटीस आलेल्यांना प्रश्न विचारी, 'ग्रंथालयात 'मिनोगा'वर एखादं पुस्तक आहे का ?' या प्रश्नाला 'नाही' असे उत्तर मिळाले की तो आनंदित होई. पाहिजे असलेले पुस्तक मिळत नाही असे कळल्यानंतरही हा कैदी का आनंदित होतो हे पहाऱ्यावरच्या पोलिसाला समजेना.

व्यायामासाठी सर्व कैद्यांना ठराविक वेळी कोठड्यांबाहेर काढण्यात येई. त्या वेळी स्पालेर्नाया रस्त्याचा काही भाग लेनिनच्या नजरेस पडे. म्हणून कृपस्कायाने त्या वेळी तेथे येऊन उभे राहावे असे त्याने कळविले. त्याप्रमाणे कृपस्काया लागो-पाठ तीन दिवस ठरल्या वेळी तेथे येऊन उभी राहत असे. परंतु त्या दोघांची दृष्टभेट होऊ शकली नाही.

शुशेनस्कोए येथे पोचल्यानंतर लेनिनने तिला लिहिले, 'तू इथे यावेस आणि माझ्याशी विवाहबद्ध व्हावेस अशी माझी इच्छा आहे.' तिने या पत्राला एका ओळीचेच उत्तर लिहिले–'तुझी जर तशीच इच्छा असेल तर तसेच घडेल.' लेनिनला कृपस्कायाचे हे वाक्य इतके आवडले होते की, पुढल्या आयुष्यात त्याने तिच्याशी बोलताना तिच्या या वाक्याचा कितीतरी वेळा पुनरुच्चार केला.

बऱ्याच वर्षांनंतर कोणीतरी कृपस्कायाला लेनिनच्या जीवनावर लिहिलेले नाटक वाचावयास दिले. त्या नाटकात असे दाखविले होते की-कृपस्काया शुशेनस्कोए येथे पोचताच लेनिनने व तिने वेस पतिपत्नीच्या ग्रंथाच्या अनुवादाचे कार्य हाती घेतले. त्या नाटकातील हा प्रसंग वाचून कृपस्कायाला हसू आले. ती म्हणाली, "काय मूर्ख लेखक आहे हा! आम्ही दोघे त्या वेळी तरुण होतो, नुकतेच विवाहबद्ध झालो होतो. आमचे दोघांचे परस्परांवर उत्कट प्रेम होते. अशा वेळी वर्षभराच्या विरहानंतर भेट होताच, आम्ही काय ग्रंथांचे अनुवाद करीत बसू ? आम्हा दोघां-शिवाय बाहेर काहीजण आहेत याचे त्या प्रारंभीच्या कालात आम्हांला भानही

राहिलेले नव्हते."

लेनिनच्या एका पुस्तकावर क्रप्स्कायाने जो अभिप्राय लिहिलेला आहे. त्यातही त्या दोघांच्या सैबेरियातील जीवनासंबंधी असाच उल्लेख आहे. ती लिहिते, 'शुशेनस्कोए येथील आमच्या वास्तव्यासंबंधी मी फारसे लिहिले नाही याचा अर्थ असा नव्हे की आमच्या त्या वेळच्या जीवनात काव्य नव्हते किंवा तारुण्याला साजेशी उत्कटता नव्हती.'

क्रप्स्काया आदर्श पत्नी होती. लेनिनची मदतनीस ही भूमिका शेवटपर्यंत तिने निष्ठेने पार पाडली. त्यामुळेच त्या दोघांचे वैवाहिक जीवन समाधानी होते.

लेनिनचे पत्र आल्यानंतर क्रप्स्काया आपल्या आईबरोबर शुशेनस्कोए येथे येऊन पोचली. शुशेनस्कोएमधील पहिल्या दिवसाचे वर्णन करताना ती लिहिते, 'आम्ही दोघी शुशेनस्कोए येथे पोचलो तेव्हा संध्याकाळ झाली होती. लेनिन शिकारीला गेला असल्यामुळे घरी नव्हता. तो ज्या झोपडीत राहत असे ती स्वच्छ होती. जमिनीवर घरगुती विणीच्या सतरंज्या अंथरल्या होत्या. भिंतींना पांढरा रंग दिलेला होता. फर वृक्षाच्या पानांनी सारी झोपडी सजविली होती. लेनिनची स्वत:ची खोली मोठी नसली तरी ती नीटनेटकी होती. आम्ही आलेल्या आहोत हे कळताच आजूबाजूचे लोक झोपडीत आले व आमच्याकडे कुतूहलाने पाहू लागले थोड्या वेळाने लेनिन परतला. आपल्या खोलीत दिवा असल्याचे पाहून त्याला आश्चर्य वाटले. नंतर तो आणि मी बराच वेळ बोलत बसलो होतो. गेल्या वर्षभरात त्याची प्रकृती सुधारली असल्याचे पाहून मला बरे वाटले.'

मधुचंद्राचा काल आटोपल्यानंतर लेनिन व क्रप्स्काया यांनी सिडने आणि सिऑट्रिस वेस यांनी लिहिलेल्या 'थिअरी अँड प्रॅक्टिस ऑफ ट्रेड युनियॅनिझम' या ग्रंथाच्या अनुवादाचे कार्य हाती घेतले. सकाळच्या वेळी हे अनुवादाचे काम सुरू असे तर दुपारी 'डेव्हलपमेंट ऑफ कॅपिटालिझम इन रशिया' या लेनिनच्या पुस्तकाची मुद्रण प्रत तयार करण्यात त्या दोघांचा वेळ जात असे. हे पुस्तक लेनिनने 'व्लादिमिर इलिन' या टोपण नावाने १८९९ मध्ये प्रसिद्ध केले. या पुस्तकानेच रशियातील मार्क्सवादी विचारवंतांत लेनिनची गणना होऊ लागली. या पुस्तकात रशियातील भांडवलशाहीच्या विकासाची व सद्य:स्थितीची रूपरेषा सांगितल्यानंतर लेनिन लिहितो, 'आता रशियातील कामगारवर्ग विचार करू लागला आहे. आतापर्यंत केवळ तो आपल्या परिस्थितीविरुद्ध कुरकुर करीत असे. आता तो लढ्याची भाषा बोलू लागला आहे. आतापर्यंत कामगारांचे केवळ छोटेमोठे उठाव वा दंगे होत असत. आता हा कामगारवर्ग साऱ्या श्रमिक जनतेची भांडवलशाहीच्या जोखडातून मुक्तता करण्यासाठी संघटित करण्याचे शस्त्र परजू लागला आहे.'

शुशेनस्कोए येथे राहत असताना क्रप्स्काया लेनिनबरोबर शिकारीला जाऊ लागली. शुशेनस्कोए येथे पोलंडमधला एक व फिनलंडमधला एक असे आणखी दोन

राजबंदी राहत असत. त्या दोघांची लेनिनकडे ये-जा असे. तेथील एक शिक्षकाशी मैत्री करण्याचा लेनिनने प्रयत्न करून पाहिला. परंतु शिक्षकाने त्याला झिडकारले. कारण गावातल्या व्यापारीवर्गात त्या शिक्षकाची ऊठबस असे. संध्याकाळी शाळा सुटली की हे पंतोजी व्यापाऱ्यांच्या अड्ड्यावर जाऊन पत्ते खेळण्यात आणि व्होडका पिण्यात दंग होऊन जात असत. तो शिक्षक लेनिनला म्हणायचा, "तुमच्यासारख्यांची मैत्री आमच्या काय कामाची ?" क्रुपस्काया शुशेनस्कोए येथे राहावयास आल्यानंतर लेनिनच्या घरातील वर्दळ वाढली. पूर्व सैबेरियातील अनेक राजबंदी अधूनमधून तेथे येत व पोलिसांचा डोळा चुकवून आठवडेच्या आठवडे लेनिनच्य सहवासात राहत. शुशेनस्कोएला येणे जमले नाही तर ते पत्र पाठवून लेनिनचे मत जाणवून घेत. या काळात देशी-परदेशी वृत्तपत्रे व पुस्तके यांची आवक-जावकही वाढली. उघड सभांना बंदी असली तरी हे ना ते कारण सांगून लोक एकत्र येत व लेनिनचे विचार ऐकत. गावकऱ्यांच्या भेटीगाठी पोलिसांच्या नजरेला खुपू नयेत म्हणून लेनिनने दर रविवारी कायद्याचा मोफत सल्ला देणारे केंद्र सुरू केले. एका खाणकामगाराच्या खटल्यात तर लेनिनने त्याला भाषण लिहून देण्यापर्यंत मदत केली. त्या खटल्यात खाण कामगार विजयी होताच शुशेनस्कोएच्या परिसरातील लेनिनच्या कीर्तीत व लोकप्रियेत अधिक भर पडली.

शुशेनस्कोए येथे आठवड्यातून दोन वेळा टपाल येत असे. त्या टपालातून मार्तोव्ह, पेट्रोसॉव्ह आदी मित्रांची नियमित पत्रे येत असत. पीटर्सबर्गमधील इतर सहकारीही पत्रे पाठवून लेनिनला रशियातील घडामोडींविषयीची माहिती कळवीत व त्याच्या मार्गदर्शनाची अपेक्षा करीत.

क्रिझॅनोव्हस्काया हिने लिहिले आहे–' सैबेरियामध्ये हद्दपारीची शिक्षा भोगत असलेल्या सोशल डेमोक्रॅटिक पक्षाच्या कार्यकर्त्यांना लेनिनचा आधार वाटत असे. तो नेहमी कोणत्या ना कोणत्या तरी कामात व्यग्र असायचा. असे असले तरी भेटावयास आलेल्या कार्यकर्त्यांच्या अडीअडचणींकडे तो आस्थेने लक्ष पुरवी. लेनिनच्या आंतरिक सामर्थ्यामुळे आम्हा साऱ्या कार्यकर्त्यांना केवढा तरी हुरूप यावयाचा. त्याच्या सहवासात थोडासा वेळ तरी मनावरचे मळभ दूर होऊन पुन्हा आमच्या कार्याला नवीन गती प्राप्त होई. आपापसातील कुरबुरी, चिडाचिडी, सारे काही क्षणार्धात वितळून जायचे आणि नवी प्रेरणा घेऊन आम्ही बाहेर पडत असू. लेनिनच्या भेटीमुळे आम्हांला किती समाधान लाभे ते शब्दांनी सांगता यायचे नाही!'

भर थंडीतही लेनिनच्या घरी कार्यकर्त्यांची ये-जा चालू असे, अशाच एका थंडीच्या दिवशी क्रिझॅनोव्हस्काया आणि तिचे यजमान मिनसिन्स्कहून लेनिनला भेटण्यासाठी शुशेन्स्कोए येथे आले. लेनिनच्या घरी पोचेपर्यंत त्यांना संध्याकाळ होऊन गेली होती. त्या वेळी लेनिन पुस्तके, वृत्तपत्रे आणि जाडेजुडे अहवाल यांच्या ढिगाऱ्यात बसून टिपणे काढीत होता. त्या दोघांना पाहताच पुन्हा त्या ' वृद्ध ' तरु-

णाच्या अंगात उत्साह संचारला आणि कितीतरी वेळ तो त्यांच्याशी बोलत बसला होता. इतकेच नव्हेतर दुसऱ्या दिवशी सकाळी नदीच्या गोठलेल्या पृष्ठभागावर स्केटिंगला जायचा कार्यक्रम मुक्रर करण्यात आला. जो कोणी चांगले स्केटिंग करील त्याला व या शर्यतीत पहिला येईल त्याला बक्षीस दिले जाईल, असेही लेनिनने जाहीर केले. क्रिझॅनोव्हस्काया हिने लिहिले आहे, 'सफाईदार स्केटिंगबद्दल लेनिनची ख्याती नव्हती. त्यामुळे ते बक्षीस त्याला मिळण्याचा संभव नव्हता. परंतु 'वेगवान स्केटिंगमध्ये तुमच्यापैकी कोणीही मला पराभूत करणार नाही,' असे त्याने आदल्या रात्री मोठ्या आत्मविश्वासाने सांगितले आणि दुसऱ्या दिवशी त्याने सिद्ध करून दाखविले. तो आम्हा सर्वांपेक्षा कितीतरी पुढे गेला होता.'

लेनिनचा उत्साह केवळ स्केटिंगपुरताच मर्यादित नसे. कधीकधी त्याला कुस्ती खेळण्याचीही लहर येई. पण हे सारे ठराविक वेळेपर्यंत. ती वेळ होऊन गेली की लेनिन आपल्या नित्याच्या कामास लागे. सकाळी वाचन आणि लेखन झाल्याशिवाय तो जेवावयास उठत नसे. तत्त्वज्ञान, अर्थशास्त्र आणि सद्य:स्थितीबद्दलचे अहवाल हे त्याच्या वाचनाचे आवडते विषय होते. त्याच्या किरकोळ वाचनालाही शिस्त असे. शुशेनस्कोएमध्ये वर्तमानपत्रांचे दहा-बारा अंक एकदम येऊन पडत अन तेही बरेच उशीरा. त्या गठ्ठ्यातील सर्वांत जुन्या अंकापासून लेनिनचे वाचन सुरू होई आणि तारखेनुसार एक एक अंक वाचला जाई. त्यामुळे त्या गठ्ठ्यातील सर्वांत ताजा अंक त्याच्या वाचनात सर्वांत शेवटी यायचा; परंतु एकदा ही पद्धत स्वीकारल्यानंतर तीत बदल करणे त्याला नामंजूर होते. एकदा त्याची गंमत करण्यासाठी क्रिझॅनोव्हस्कायाने वर्तमानपत्राचा गठ्ठा येताच ताज्या अंकातील मजकूर मोठ्याने वाचण्यास प्रारंभ केला. परंतु लेनिनला ते सहन झाले नाही. त्याने कानात बोटे घालून ताज्या अंकातील मजकूर ऐकावयास नकार दिला. विरंगुळा म्हणून तो कधीकधी कथाकादंबऱ्याही वाचत असे. परंतु मूलत: त्याला ललित वाङ्‌मयाची गोडी नव्हती.

हद्दपारीचे तिसरे आणि शेवटचे वर्ष सुरू झाले तेव्हा ही शिक्षा आटोपल्यानंतर रशियाबाहेर आपल्या पक्षाचे वृत्तपत्र सुरू करण्याचा विचार लेनिनच्या मनात सारखा घोळू लागला. या वृत्तपत्राचे स्वरूप कसे असावे, ते रशियात कोणत्या चोरट्या मार्गांनी धाडता येईल या विचारांत तो इतका बुडून गेला की त्याला जेवणाचे व झोपेचे भानही राहत नव्हते. मार्तोव्ह व पोट्रेसॉव्ह यांना धाडलेल्या प्रत्येक पत्रात या नव्या वृत्तपत्रासंबंधीचीच चर्चा असे. पोट्रेसॉव्हकडून आलेल्या मार्क्सवादी विचारसरणीबाबत पीटर्सबर्गमध्ये वैचारिक वादळ सुरू झाल्याची बातमी होती. ती बातमी वाचून लेनिन अस्वस्थ झाला. पीटर्सबर्गमधील लीगल मार्क्सवाद्यांचा गट एक मासिक प्रसिद्ध करीत असे. त्या मासिकात प्रसिद्ध होणाऱ्या पीटर स्ट्रूव्ह व प्रोफेसर तुगन-बरॅनोव्हस्की यांच्या लेखात मार्क्सवादाच्या क्रांति-

कारक स्वरूपासंबंधी संशय व्यक्त करण्यात आला होता. संपूर्ण मार्क्सवादी विचारसरणीचाच फेरविचार झाला पाहिजे, असे स्ट्रूव्हचे म्हणणे होते. शास्त्रीय समाजवाद हे निव्वळ मनोराज्य आहे, असे त्याने त्या लेखात म्हटले होते. स्ट्रूव्ह पुढे म्हणतो, 'समाजवादाची उभारणी कशी होते यासंबंधीची मार्क्सची मीमांसा वस्तुस्थितीस सोडून आहे. बुर्झ्वा संस्कृतीने जी सांस्कृतिक व भौतिक प्रगती केली आहे ती समाजवाद पचवून टाकील असा मार्क्सचा विश्वास होता. त्याबरोबरच आर्थिक दुरवस्था आणि दारिद्र्य यांचे अक्राळविक्राळ स्वरूप जागे झाले की तेथे समाजवादाला पायारोवा करता येतो असेही मार्क्सने प्रतिपादन केले आहे. त्याची ही दोन्ही विधाने खरी मानली तर त्याला अखेरीस विध्वंसक समाजवादच अभिप्रेत आहे, असा निष्कर्ष निघतो.

श्रीमंतांची नीती वेगळी व गरिबांची नीती वेगळी, असे मार्क्सने म्हटले आहे. स्ट्रूव्हला ही कल्पना मुळीच मान्य नव्हती. तो म्हणतो की, चांगल्या वाईटाचा आणि वर्गीय लढ्याचा काहीही संबंध नाही. त्याचप्रमाणे स्ट्रूव्हच्या मताने मार्क्सच्या ऐतिहासिक भौतिकवादाचा आणि वैचारिक भौतिकवादाचा संबंधही अत्यल्प आहे.

स्ट्रूव्हची ही विचारसरणी लेनिनला साफ नामंजूर होती. प्रथम त्याने स्ट्रूव्हच्या लिखाणाची उपेक्षा केली. परंतु नुसती उपेक्षा करूनही भागण्यासारखे नव्हते. २२ एप्रिल १८९९ रोजी पोट्रेसॉव्हला लिहिलेल्या पत्रांत लेनिनने स्ट्रूव्हच्या विचारसरणीविरुद्ध युद्धच पुकारल्याचे दिसते. तो म्हणतो, "मैत्री आणि कर्तव्य यांचा संघर्ष सुरू झाला तर आपण मैत्रीचा बळी देऊन कर्तव्य करीत राहिले पाहिजे. स्ट्रूव्हची विचारसरणी आपल्याला मोडून काढलीच पाहिजे. आणि त्यासाठीच पहिली गरज आहे ती आपल्या स्वतंत्र अन् निर्भयी मतपत्राची !

पोट्रेसॉव्ह आणि मार्तोव्ह यांची हद्दपारीची मुदतही संपत आली होती. ही मुदत संपताच त्या तिघांत असे ठरले की प्रथम लेनिन व पोट्रेसॉव्ह यांनी स्कोव्ह येथे जाऊन मार्क्सवादी कार्यकर्त्यांची संघटना उभारण्याच्या कार्यास लागावे व नंतर वत्तपत्र सुरू करण्यासाठी पश्चिम युरोपात जावे. संघटना उभारल्याशिवाय सर्व काही व्यर्थ आहे असे लेनिनचे ठाम मत होते. त्याने पोट्रेसॉव्हला लिहिले– 'मार्क्सवादी कार्यकर्त्यांमध्ये क्रांतिकारी वृत्ती व शिस्त बाणवली पाहिजे. ठिकठिकाणी गुप्त मंडळ्या स्थापन केल्याशिवाय आपले उद्दिष्ट साध्य होणार नाही. गुप्तमंडळ्यांच्या बाबतीत रशियातील जुन्या क्रांतिकारक संघटना आपल्यापेक्षा पुढे गेल्या होत्या ही वस्तुस्थिती मान्य केलीच पाहिजे. आता आपण त्या जुन्या क्रांतिकारक पक्षांपेक्षा एक पाऊल तरी पुढे गेलेच पाहिजे.'

लेनिनच्या हद्दपारीची मुदत आता संपत आली होती. तत्पूर्वी त्याचा 'दि एम्स ऑफ रशियन सोशल डेमोक्रॅट्स' हा ग्रंथ स्वित्झर्लंडमध्ये प्रकाशित करण्यात आला.

यापूर्वी लेनिनने निरनिराळ्या नावांनी लिहिले होते. परंतु 'एन. लेनिन' या नावाचा उपयोग प्रथमच या ग्रंथाच्या वेळी करण्यात आला. तेव्हापासून मात्र तो लेनिन या नावानेच सर्वत्र ओळखला जाऊ लागला.

१९०० च्या मार्चमध्ये सैबेरियाच्या कडाक्याच्या थंडीमधून लेनिनचा युरोपीय रशियाच्या रोखाने प्रदीर्घ प्रवास सुरू झाला. पहिल्या तीनशे मैलांचा प्रवास तर घोड्यावरूनच करावा लागला. क्रुप्स्काया लिहिते, 'दिवसरात्र आमचा हा प्रवास सुरू होता. सुदैवाची गोष्ट एवढीच की, चांदणी रात्र असल्यामुळे प्रवास निर्विघ्नपणे पार पडला. रशिया अजून खूप दूर होता. तरीही आपण त्या दिशेने प्रवास करीत आहोत, या जाणिवेने लेनिन कमालीचा आनंदित झाला होता. आता आपण लवकरच एक महान कार्य हाती घेणार आहोत या कल्पनेने त्याला पुरे भारून टाकले होते.

उफा येथे पोचल्यानंतर लेनिनने आपल्या पत्नीला व सासूला तेथेच काही काल राहण्यास सांगितले व तो स्वतः एकटाच स्कोव्ह येथे गेला. आपल्या पत्नीलाही स्कोव्ह येथे आणण्याची परवानगी मिळावी, असा त्याने सरकारकडे अर्ज केला. परंतु तो नाकारण्यात आला. मॉस्कोस जाऊन आईला भेटण्याची परवानगी मागण्यासाठी त्याने तसा अर्ज केला. तो मात्र मंजूर करण्यात आला. त्यामुळे लेनिनला मॉस्कोत एक आठवडा राहता आले.

बऱ्याच दिवसांनी मुलाची भेट झाल्यामुळे मारिआ अॅलेक्झांड्रोव्हना हिच्या डोळ्यांत पाणी तरारले. ती म्हणाली, " तू तर पत्रातून लिहीत होतास की आपली प्रकृती सुधारली आहे म्हणून ! पण कितीरे वाळला आहेस तू ? " परंतु तिच्या या प्रश्नाकडे लक्ष न देताच लेनिनने विचारले, " आई, मार्तोव्हकडून तार आली आहे काय ? " मार्तोव्हची तार आली नसल्याचे कळताच तो हिरमुसला. लेनिन घरी परत आल्यामुळे आई व बहीणभाऊ खुष होते. परंतु लेनिनचे लक्ष लागलेले होते ते मार्तोव्हच्या तारेकडे. आठवड्याची मुदत संपताच तो पुन्हा स्कोव्ह येथे आला. दोन-चार दिवसांतच पोट्रेसॉव्ह तेथे येऊन दाखल झाला.

लेनिनच्या तीन वर्षांच्या गैरहजेरीत सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे कार्य बरेच वाढले होते. मात्र त्याबरोबरच पक्षात बरेच वैचारिक मतभेद होऊन अनेक गट स्थापन झाले होते. पीटर्सबर्गमधील संपानंतर 'इकॉनॉमिस्ट' नावाने ओळखला जाणारा गट काहीसा प्रभावी झाला होता. कामगारांनी क्रांतीची भाषा बोलण्याऐवजी संप पुकारून आपल्या आर्थिक मागण्या मान्य करून घ्याव्यात, अशी या गटाची भूमिका होती. त्यामुळे पगारवाढ, कामाचे कमी तास, कारखान्यातील इतर सुखसोयी यांपुरतीच कामगार चळवळ मर्यादित असावी असे 'इकॉनॉमिस्ट'

गटाचे कार्यकर्ते प्रचार करीत होते. त्यांच्या मताने राजकीय नेतृत्व करणे हे कामगारांचे कामच नव्हे. समाजातील विचारवंतांनी राजकीय मांडणे मांडावीत. कामगारांनी स्वतःच निराळा पक्ष स्थापन करण्याऐवजी झारशाहीविरुद्ध पांढरपेशा समाज जो लढा पुकारील त्यास पाठिंबा देत राहावे.

परंतु एकीकडे 'इकॉनॉमिस्ट' गट केवळ आर्थिक लढ्याची भाषा बोलत असताना सोशल डेमोक्रॅटिक पक्षातील इतर गट कामगारांची चळवळ सर्वव्यापी कशी करता येईल त्या दिशेने प्रयत्न करीत होते. १८९८ च्या मार्चमध्ये मिन्स्क येथे पहिल्या ऑल रशियन कांग्रेस ऑफ सोशल डेमोक्रॅट्सची बैठक भरली. या बैठकीत नव्या रशियन सोशल डेमोक्रॅटिक मजूर पक्षाची घोषणा करण्यात आली. या बैठकीत नव्या पक्षाचा जाहीरनामाही तयार करण्यात आला. हा जाहीरनामा तयार करण्यात स्ट्रूव्ह प्रभृतींचाच पुढाकार होता. या जाहीरनाम्यात असे म्हटले होते की राजकीय स्वातंत्र्य मिळविणे हे या नव्या पक्षाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. 'जनतेच्छा' या जुन्या क्रांतिकारक संघटनेने जी जी उद्दिष्टे आपल्या डोळ्यांसमोर ठेवली होती ती ती आम्हांसही मान्य आहेत. फक्त आमचे मार्ग भिन्न राहतील. रशियातील श्रमिक जनतेची लढाऊ संघटना उभारून तिच्याद्वारा जनआंदोलन सुरू करण्याचा आमच्या पक्षाचा निर्धार आहे.

मिन्स्क येथील बैठकीत एक मोठा फायदा असा झाला की कामगारांचा एकसंघ राजकीय पक्ष असे सोशल डेमोक्रॅटिक पक्षाचे स्वरूप झालें व सर्व अंतर्गत गट विसर्जित करण्यात आले. सहा महिन्यांनंतर नव्या पक्षाची पुन्हा बैठक भरणार होती. परंतु या बैठकीपूर्वीच पक्षाच्या प्रमुख नेत्यांची धडपकड झाल्यामुळे ही बैठक भरू शकली नाही. तरीही सोशल डेमोक्रॅटिक मजूर पक्षाचे कार्य सर्व प्रमुख शहरांत सुरू झालेले होते. लेनिनच्या मताने हा पक्ष अद्यापही क्रांतिकारक मनोवृत्तीचा झाला नव्हता. या कामगार आंदोलनाला क्रांतीची दीक्षा द्यावयाची असेल तर कामगारवर्गात क्रांतिविषयक तत्त्वज्ञानाचा पुरेसा प्रसार होणे आवश्यक होते. सैबेरियातून परतण्यापूर्वी वृत्तपत्र काढण्याचा त्याने निर्धार केला होता तो यासाठीच !

सन १९०० च्या मेमध्ये लेनिन मार्तोव्ह, पोट्रेसॉव्ह प्रभृति कट्टर मार्क्सवाद्यांची स्कोव्ह येथे बैठक भरून तीत परदेशांत वृत्तपत्र सुरू करण्याची तपशीलवार योजना आखण्यात आली. पत्राचे नाव ठरले 'इस्क्रा' (ठिणगी). स्ट्रूव्ह व तुगन-बॅरनोव्हस्की हेही स्कोव्ह येथे आले होते. 'इस्क्रा'च्या योजनेत सहभागी होण्याची त्यांनी तयारी दर्शविली. याच चर्चेत असे ठरले की लेनिन व पोट्रेसॉव्ह यांनी परदेशी जाऊन प्लेखानोव्हचा पाठिंबा मिळवावा. इतकेच नव्हे तर त्यालाही संपादक मंडळात घ्यावे.

थोड्याच दिवसांत लेनिनने रशिया सोडण्याची तयारी केली. त्याची हद्दपारीची शिक्षा संपली असली तरी त्याला पीटर्सबर्गमध्ये प्रवेश करण्याची परवानगी नव्हती. म्हणून तो पीटर्सबर्गच्या अलीकडच्या स्टेशनावर उतरला. रात्रभर स्टेशनजवळच्या

एका दुकानात मुक्काम केल्यानंतर सकाळच्या वेळी पीटर्सबर्गमध्ये जाऊन येण्याचा त्याचा विचार होता. परंतु लेनिन पीटर्सबर्गजवळ येऊन पोचल्याचे पोलिसांना कळले होते. त्यामुळे सकाळीच त्याला दुकानातून बाहेर पडताना पकडण्यात आले. पोलिस चौकीवर त्याची झडती घेण्यात आली. पण आक्षेपार्ह असे काहीही सापडले नाही. मग पोलिसांनी त्याचा जबाब घेण्यास सुरुवात केली. एकामागाहून एक प्रश्न विचारले जात होते. " तू येथे कशासाठी आलास ? तुला पीटर्सबर्गमध्ये प्रवेश करण्याची बंदी आहे हे तुला माहीत आहे ना ? आणि त्यातही इतर सर्व ठिकाणे सोडून तू नेमका झारच्या राजवाड्याजवळच का उतरलास ? आमचा तिथे सक्त पहारा असतो हे तुला माहीत आहे ना ? " लेनिनने सुचतील ती उत्तरे दिली. पण पोलिसांनी त्याचे न ऐकता त्याला तीन आठवडे स्थानबद्धतेत राहण्याची शिक्षा सुनावली. या तीन आठवड्यांच्या कालावधीत लेनिनला एकच भीती वाटत होती, हे लोक आपला पासपोर्ट तर काढून घेणार नाहीत ना ? कारण तसे झाले तर आपले सारे बेत इथल्या इथेच विरले म्हणायचे !

तीन आठवड्यांनंतर स्थानबद्धतेतून सुटका झाल्यानंतर लेनिनला पोलिस पहाऱ्यात पोडोल्स्क येथे नेण्यात आले. तेथे पुन्हा एकदा जबानी झाली. त्याची झडतीही घेण्यात आली. लेनिनचा पासपोर्ट हातांत घेत पोलिस अधिकारी म्हणाला, " हा पासपोर्ट इथे राहूदे. तुला जायला हरकत नाही. " लेनिनची भीती खरी ठरली होती. युरोपचे आणि आपल्या भावी आयुष्याचे दारच जणू बंद होत आहे असे त्याला वाटले. येथे गप्प बसून चालणार नाही याची जाणीव होताच लेनिन जोराने म्हणाला, " मला माझा पासपोर्ट परत हवा आहे. तुम्ही तो मला परत करा. "

" हा पासपोर्ट मी माझ्याजवळ ठेवून घेणार आहे हे माझे वाक्य तुला ऐकू आले नाही का ? " पोलिस अधिकाऱ्याने उलट त्यालाच प्रश्न विचारला.

पासपोर्ट मिळाल्याशिवाय आपण येथून बाहेर पडणार नाही, असे लेनिनने सांगितले तेव्हा तो अधिकारीही हट्टास पेटला. लेनिनने आता निराळीच युक्ती योजण्याचे ठरविले. खोलीतून बाहेर पडण्याचा आविर्भाव करीत तो म्हणाला, " ठीक आहे. तुमच्या या बेकायदेशीर कृत्याबद्दल मी पीटर्सबर्गमधल्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडेच तक्रार करतो. " एवढे बोलून तो दाराबाहेर जाऊ लागला. पोलिस अधिकारी ओरडला, " ए लेनिन, परत ये आणि हा तुझा पासपोर्ट घेऊन जा. "

---

थोड्याच दिवसांनी लेनिनने रशियाची सीमा ओलांडून जर्मनीत प्रवेश केला. तेथे 'इस्क्रा' छापण्याची काही सोय होत आहे काय, याची चौकशी करून तो स्वित्झर्लंडला पोचला. त्याने प्लेखानोव्ह व ॲक्सेलरॉड यांना 'इस्क्रा'ची योजना समजावून सांगितली. इस्क्रा जर्मनीत छापावे की स्वित्झर्लंडमध्ये छापावे या संबंधी बरीच चर्चा झाली. प्लेखानोव्हचे म्हणणे होते की ते स्वित्झर्लंडमध्ये छापणे सोईचे

जाईल तर ते जर्मनीत छापावे असा लेनिन व पोट्रेसॉव्ह यांचा आग्रह होता. अखेरीस 'इस्क्रा' जर्मनीत छापणेच सोयीचे ठरेल; असे एक मताने ठरले. 'इस्क्रा'च्या प्रती चोरट्या मार्गांनी रशियात कशा धाडावयाच्या व रशियातही त्यांची गुप्त वाटपव्यवस्था कशी करावयाची याची सर्व व्यवस्था करण्यात आल्यानंतर 'इस्क्रा'च्या ध्येयधोरणाची घोषणा करण्यात आली–'रशियन कामगारांचा सर्व शक्तिमान क्रांतिकारक पक्ष उभा राहावा यासाठी या 'ठिणगी'चा जन्म आहे.'


२४ डिसेंबर १९०० रोजी लायप्झिग येथील छापखान्यातून 'इस्क्रा'चा पहिला अंक बाहेर पडला. 'इस्क्रा'चे संपादकीय कार्यालय म्युनिक येथे होते. प्लेखानोव्ह, ॲक्सेलरॉड, व्हेरा झासुलीच, लेनिन, मार्तोव्ह व पोट्रेसॉव्ह या सहाजणांचे संपादकीय मंडळ मोठ्या उत्साहाने कामाला लागले. लेनिनने 'इस्क्रा'च्या पहिल्याच अंकात लिहिले, 'आम्हांला निर्माण करावयाचा आहे तो शक्तिशाली, संघटित पक्ष. असा संघटित पक्षच साध्यासुध्या प्रक्षोभाचा फायदा घेऊन प्रचलित राज्ययंत्रणा उलथून पाडू शकतो. एका व्यक्तीच्या दहशतवादाने दुसऱ्या एका व्यक्तीचा नाश करता येईल. परंतु संपूर्ण राज्ययंत्रणा कोलमडून टाकावयाची असेल तर कोणतीही एक व्यक्ती कार्य करू शकणार नाही. या कार्यासाठी गरज असते शक्तिशाली संघटित पक्षाची.'

'इस्क्रा' सुरू झाल्याच्या सुमारासच सैबेरियातून पळालेला एक तरुण कार्यकर्ता लेनिनला भेटावयाला आला. 'पेरो' या नावाने तो लिखाण करीत असे. या तरुण लेखकालाही 'इस्क्रा'च्या संपादक मंडळात समाविष्ट करावे असे लेनिनने प्लेखानोव्हला सुचविले. परंतु प्लेखानोव्हने विरोध केला. कारण आज ना उद्या सध्याच्या संपादक मंडळात मतभेद होणार हे प्रत्येकालाच माहीत होते. तसे झाले की प्लेखानोव्ह ॲक्सेलरॉड व व्हेरा झासुलीच एका बाजूस व लेनिन, मार्तोव्ह व पोट्रेसॉव्ह दुसऱ्या बाजूस असे गट पडणार होते. आपल्या गटाचे मताधिक्य व्हावे यासाठीच लेनिन 'पेरो'ला संपादक मंडळात घेत आहे असा संशय आल्यामुळे प्लेखानोव्ह म्हणाला, "या तरुणाची लेखणी मला तितकीशी पसंत नाही."

लेनिन उत्तरला, "लेखणी काय सरावाने तयार होईल. पण तरुण उमदा आहे आणि आपल्याला बराच उपयोगी पडेल."

थोड्याच दिवसांत त्या तरुणाने आपले 'पेरो' हे नाव टाकून दिले. त्याचे नवे नाव लवकरच साऱ्या जगभर गाजणार होते–लिऑं ट्रॉटस्की.

(क्रमशः)




# साधना कुमार अंक

छोटया कलाकारांच्या

विविध पैलूंचे दर्शन

**सरिता पदकी**

साने गुरुजींच्या पुण्यस्मृतीला अर्घ्य वाहण्यासाठी काढलेला हा अंक. या अंकातले सगळे काही मुलांसाठी ! कारण 'करी मनोरंजन जो मुलांचें, जडेल नाते प्रभुशी तयाचे ' अशी साने गुरुजींची श्रद्धा होती. आपल्या राजकीय धकाधकीच्या जीवनातूनही त्यांनी मुलांसाठी लेखन करायला, मुलांची आई व्हायला वेळ काढून ठेवलेला होता. अशा या बालप्रेमी आत्म्याला श्रद्धांजली वाहायची ती मुलांसाठी काही-तरी करूनच! या दृष्टीने ' साधना ' साप्ताहिकाने हा दरवर्षी 'कुमार' अंक काढायचा प्रघात ठेवला आहे.


यंदाच्या अंकाचे संपादक आहेत श्री. भा. रा. भागवत. श्री. भागवतांनी मुलांसाठी सातत्याने लेखन केलेले आहे. 'बालमित्रा'चे संपादन केलेले आहे. तेव्हा त्यांच्या हाती या अंकाचे संपादन सोपवले हे उचितच झाले.

या अंकासाठी मुलांकडून चित्रे व कथाकविता इत्यादी साहित्य मागवले होते. त्याला फार चांगला प्रतिसाद मिळाल्याचे, इच्छा नसताही कितीतरी साहित्य व चित्रे वगळून ठेवावी लागल्याचे संपादकांनी नमूद केले आहे. म्हणजे मुलांनासुद्धा आपले लेखन छापायला, चित्रांना प्रसिद्धी मिळायला असे एखादे माध्यम असणे किती निकडीचे वाटते, ते दिसून येईल.

कुमार अंकासाठी पाठवायच्या चित्रांच्या अगर साहित्याच्या विषयाबद्दल कुठलेही निर्बन्ध नसतात. त्यामुळे मुलांनी स्वच्छन्दपणे आपल्या आयुष्यातल्या अनुभवांचे कुंचल्याने अगर शब्दांनी रेखाटण केलेले यात आढळून येईल. गारुडी, आगगाडी थांबून राहिल्यामुळे खोळंबलेली माणसे, मडकी विकणारी कुंभारीण, रेशनच्या रांगेत येणारे चमत्कारिक अनुभव, पालीला भिऊन घरभर लाड सांडून टाकणारी विनोदी इंदू आत्ते, पँटला बक्कल नसल्यान फत्कल मारणारी दुक्कल, धारातीर्थी पतन पावून एकल्याच पडलेल्या सैनिकांचे स्मारक – अशा अनेकानेक विषयांवर मुलांनी आपला कुंचला व लेखणी चालवली आहे. त्यांचे हे आविष्कार बघणाऱ्या-वाचणाऱ्याला त्यांच्या मनाच्या त्या त्या पैलूंचे दर्शन होऊन आल्हाद वाटेल. मुलांनी काढलेली चित्रे काही रंगीत छापली आहेत, तर काही मुळात रंगीत असूनही काटकसरीसाठी साधीच छापावी लागली आहेत.

मुलांसाठी मोठ्यांनी केलेल्या लेखनात बालगीते आहेत, भा. रा. भागवतांचा फास्टर फेण आहे, लहान वयात मोठाली साहसे करून संकटात सापडलेल्यांचे प्राण वाचवणाऱ्या अखिल भारतभरच्या मुलांचे परिचय आहेत, नागालँड, स्वित्झर्लंड, तामीळनाड इथल्या मुलांबद्दलचे लेख आहेत. श्री. ना. ग. गोरे यांची एकांकिका आहे. अंकाच्या सुरुवातीला साने गुरुजी यांचे 'स्वातन्त्र्याचा अर्थ' हे स्फुट आहे.

असा हा 'साधना कुमार अंक' मुलांसाठी काहीतरी करायला निष्ठेने धडपडणारा. मुलांच्या विकासाला आवाहन करणारा. मुलांच्या कलात्मक अभिव्यक्तीला एक क्षेत्र पुरवणारा. भारतीय भाषांतले त्याचे असे अनोखे स्वरूप जाणून यापुढे तरी त्याच्यामागच्या आर्थिक विवंचना दूर होवोत, अशी इच्छा करू या ! ●



# गुडबाय नबाब

## मनोहर रेगे

२६ जूनच्या सोमवारी लॉर्ड्स क्रीडांगणावर उपाहाराच्या वेळी पावसाची एक जोरदार सर येऊन गेली आणि खेळपट्टीत तिने एकदम जिवंतपणा आणला. आणि त्यानंतर इंग्लंडचे ऑफ ब्रेक गोलंदाज रे इलिंग्वर्थ यांनी पहिल्या पाच षट-कांत केवळ ३ धावा देऊन ३ बळी घेतले आणि पुढचे २ खेळाडू ९ धावा देऊन तंबूत पाठविले. भारताच्या अपेक्षित पराभवावर असे अधिकृत पण दुर्दैवी शिक्का-मोर्तब झाले ! ३ बाद ७५ धावसंख्येत अवघ्या ३५ धावांची भर घालून भारताचे ७ गडी उपाहारानंतर ५५ मिनिटांत माघारी परततात काय आणि भारताचा १ डाव १२४ धावांनी आकस्मिक पराजय होतो काय !—क्रिकेटमधील अनिश्चितताच त्या निमिताने पुन्हा एकदा प्रत्ययाला आली. लॉर्ड्सच्या पहिल्या कसोटी सामन्यात दुसऱ्या डावात ५१० धावांची विक्रमी मजल मारणारे ते झुंझार वीर खरोखरीच हेच होते काय, असा जाणकाराला प्रश्न पडावा. दरवर्षी लॉर्ड्सच्या कसोटी सामन्या-तील सोमवारी राणी एलिझाबेथ चहापानाच्या वेळी लॉर्ड्सला भेट देण्यास येतात आणि खेळाडूंची ओळख करून घेतात. परंतु राणीसाहेबांना त्वरित फोन करून कळवावे लागले आणि नेहमीच्या वेळेपेक्षा पाऊण तास लवकरच त्या मैदानावर उपस्थित झाल्या. परंतु खेळ संपून अर्धा तास होऊन गेला होता !

निदान लीड्सवरच्या कसोटी सामन्यात आम्ही प्रतिष्ठा तरी मिळवून बसलो होतो. भारतीयांबद्दल पुष्कळशी सहानुभूती तरी टीकाकारांनी व्यक्त केली होती; पण लॉर्ड्सवरचा पराभव नामुष्कीचा आणि म्हणूनच चीड आणणारा होता.

इंग्लंडला निघताना प्रत्येक भारतीय क्रिकेटपटूच्या हातात भारतीय क्रिकेट कंट्रोल बोर्डाने एक पत्रक ठेवले होते. ती एक प्रतिज्ञा होती. बोर्ड म्हणते, " इंग्लंडच्या दौऱ्यात आपण स्वाभाविकच क्रिकेटचे सर्वांगीण शिक्षण घेणार आहात. पण भार-ताचा क्रिकेटपटू म्हणूनच केवळ त्याला महत्त्व आहे, असे नाही. अंगावर जी प्रति-ष्ठेची बिरुदे आपण रुळविणार आहात ती भवितव्यातील यशोदायी कर्तृत्वाची वाटचाल आहे हे लक्षात ठेवा. " ही प्रेरणा आणि हे प्रतीक जरी प्रत्येक भारतीय

क्रिकेटपटूने अंत:करणात कोरून ठेवले असते तरी यापेक्षाही अधिक सन्मानपूर्वक पराक्रम आम्ही नक्कीच पहिल्या दोन कसोटी सामन्यांत गाजवू शकलो असतो. आणि सुप्रसिद्ध समीक्षक बेरी सर्वाधिकारी म्हणतात त्याप्रमाणे चांगल्या खेळपट्टीवर इंग्लंडला जिकू शकलो असतो.

## अदूरदर्शी निवडसमिती

भारतीय संघाच्या पराभवाची मूलभूत कारणमीमांसासा करावयाची म्हटल्यास प्रथम भारतीय निवडसमितीवर प्रहार करावे लागतील. निवडसमितीतील चारांपैकी तीन सदस्य १९५२ च्या इंग्लंड दौऱ्याचा अनुभव घेतलेले कसोटी क्रिकेटपटू आहेत; तेव्हा या दौऱ्यात नव्या उदयोन्मुख खेळाडूंवर अवलंबून न राहता जुन्या अनुभवी क्रिकेटपटूंवर त्यांनी विश्वास ठेवला असता तर एक वेगळेच चित्र लीड्स आणि लॉर्ड्सवर दिसले असते ! चंद्रशेखर जगातील सर्वश्रेष्ठ लेगब्रेक आणि गुगली गोलंदाज; पण त्याच्या जोडीला रमाकांत देसाई किंवा रांजणे यांच्यासारखा वेगवान प्रभावी गोलंदाज नव्हता. दुराणी, नाडकर्णी असे अष्टपैलू उपलब्ध क्रिकेटपटू तेथे नव्हते. जयसिंहा, बेग अशा आघाडीच्या वेगवान गोलंदाजांना तोंड देणारे ५९ च्या दौऱ्यातील सुरुवातीचे फलंदाजही तेथे नव्हते. वेळ पडली तर निवृत्त खेळाडूंनाही खुद्द इंग्लंडने पाचारण केलेले आहे. कॉम्प्टन, वॉश्ब्रुक अशी उदाहरणे देता येतील. विजय मांजरेकर यांच्यासारखा शास्त्रशुद्ध फलंदाज नेला असता तर मधली फळी भरभक्कम झाली असती म्हणूनच भारतीय संघाची निवड ही निवडसमितीच्या अदूरदर्शी आणि अनभ्यासू वृत्तीची शोकांतिका आहे, असे म्हटले तर अतिशयोक्ती होऊ नये !

लॉर्डसवरचा पराभव ही काही आजची एखादी क्षुल्लक घटना नाही तर १९३२ सालापासून परंपरेने चालत आलेला तो सहावा पराभव आहे. या पस्तीस वर्षांच्या लॉर्डसवरील पाच कसोटी सामन्यांचा त्यांनी बारकाईने अभ्यास केला असता तर त्यांना समजले असते की, लॉर्डसवर वेगवान गोलंदाज किंवा अस्तनीत युक्त्याप्रयुक्त्या असलेले मध्यमगती गोलंदाज काही वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी करू शकतात. १९३२ ते १९५९ पर्यंत लॉर्डसवर भारताने इंग्लंडचे ६३ बळी घेतले. त्यांत अशा गोलंदाजांनी ३९ घेतले होते. इंग्लंडनेही आपल्या १०० विकेट्समध्ये द्रुतगती गोलंदाजांकरवी ६४ बळी मिळविले होते. म्हणूनच लॉर्ड्सवर रमाकांत देसाई आणि वसंत रांजणे यांची अतिशय गरज होती. लॉर्ड्सवर वरच्या श्रेणीचे मंदगती फिरकी गोलंदाज उपयुक्त ठरतात. त्यांच्या व्हेरिटी, लेकर, ग्रीनहौ यांनी ते सिद्ध केले आहे. आपल्या मनकड, गुलाम अहंमद व सुभाष गुप्ते यांनीही तसा पराक्रम करून दाखविलेला आहे. परवा तरी लॉर्ड्सवर चंद्रशेखर आणि इलिंगवर्थ गाजलेच ना ? आणि ब्राऊन आणि स्नो यांनी पहिल्या डावात ६ विकेट्स घेऊन आपली तिरपिट उडविलीच की नाही ?

भारतीय गोलंदाज जे कमवितात ते क्षेत्ररक्षक आणि फलंदाज गमवितात असा आजपर्यंतचा अनुभव आहे. लॉर्ड्सवर दुसऱ्या दिवशी प्रसन्नच्या गोलंदाजीवर वाडेकर यांनी शॉर्ट–फाईन लेगला टॉम ग्रेव्हनींचा झेल सोडला. ग्रेव्हनींच्या त्या वेळी ३६ व इंग्लंडची धावसंख्या १८८ होती. पुढे ग्रेव्हनी यांनी १५१ धावा टोलविल्या. चंद्र-शेखर यांनी १२७ धावांत इंग्लंडचे ५ बळी घेतले. आतापर्यंत बॉयकॉट, बॅरिंग्टन, ग्रेव्हनी व काही प्रमाणात डॉलिव्हियरा यांचेखेरीज त्यांच्या गोलंदाजीतील विशिष्ट लेगब्रेक कुणाला समजत नाही. बाकीचे खेळाडू चाचपडतच खेळतात. पण त्यांच्या जोडीला दुसरा उत्कृष्ट गोलंदाज नसल्यामुळे आणि त्यांना अधूनमधून विश्रांती देण्यासाठी चांगला बदली गोलंदाज संघात समाविष्ट नसल्याने इंग्लंड चारशेपर्यंत धावांची मजल नेऊ शकला. गोलंदाजी कितीही उत्कृष्ट पडत असली तरी गचाळ क्षेत्ररक्षणामुळे भारताने दोन्ही कसोटी सामन्यांत काही चांगला पराक्रम गाजविण्याची संधी घालविली.

दुसऱ्या दिवशी ग्रेव्हनी यांनी दोन तासांत फक्त ४० धावा केल्या. बॅरिंग्टन यांनी ९७ धावा काढण्यास ४ तासांवर वेळ घेतला. ग्रेव्हनींना १५१ धावा टोलविण्यास पाच तास लागले ही गोष्ट चंद्रशेखर–प्रसन्न आणि बेदींच्या अचूक आणि प्रयत्नशील गोलंदाजीची साक्ष पटविते. प्रसंगानुरूप कसे खेळावे हे बॅरिंग्टन, ग्रेव्हनी यांनी दाखविले. ४० वर्षांचे ग्रेव्हनी यंदा चांगले फॉर्ममध्ये आहेत. मैदानावरील सर्व फटक्यांचे ज्ञान त्यांना आहे. पण खेळपट्टीवर चेंडू वेडावाकडा उडतो असे पाहिल्या-वर त्यांनी सावधानता बाळगली. फटकेबाजीचा विनाकारण धोका पत्करला नाही आणि चंद्रशेखर यांची गोलंदाजी स्वतःच खेळून काढली. इतरांना मुद्दाम संधी दिली नाही. संघासाठी कसे खेळावे याचा ग्रेव्हनी यांनी नमुनेदार प्रत्यय आणून दिला.

## अवसानघाताची सवय !

या उलट भारताकडे इंजिनियर, वाडेकर, सरदेसाई, बोर्डे, पतौडी, कुंदरन्, सुरती, सुब्रह्मण्यम् असे नेहमीचे फलंदाज असताना स्नो आणि ब्राऊन यांच्या द्रुतगती गोलंदाजीवर बाहेर जाणारे चेंडू वेड्यावाकड्या बॅटी टाकून मारण्याचा बेफिकीर आणि निष्काळजी प्रयत्न त्यांनी केला व त्याचे प्रायश्चित्त त्यांना ताबडतोब मिळाले. यष्टिरक्षक मरे यांनी सहा झेल घेऊन वॉली ग्राऊट आणि डेनिस लिंडसे यांच्या विक्रमाची बरोबरी केली. भारताच्या पहिल्या डावात १५२ धावा झाल्या तेव्हाच पराभव निश्चित झाला.

फलंदाजांनी ऐनवेळी नांगी टाकावयाची ही परंपरा फार जुनी आहे. १९३६ च्या लॉर्डस्‌वरच्या कसोटी सामन्यात भारताने पहिल्या डावांत इंग्लंडवर १३ धावांची आघाडी मिळविली होती; (भारत १४७, इंग्लंड १३४) तरी पण दुसऱ्या डावात ९३ धावांत आपले फलंदाज बाद झाले आणि ९ विकेट्सनी आपण तो सामना

गमाविला. मर्चंट, मुश्ताक, नायडू, वझीर अल्ली, अमरसिंग असे फलंदाज त्या वेळी होते.

दुसरी गोष्ट आपल्या फलंदाजांनी ऑफ्‌ब्रेक गोलंदाजी खेळताना अशुद्ध तंत्र वापरले. म्हणूनच इलिंग्वर्थ (७/२९), क्लोज (२/२८) आणि डॉलिव्हियरा (२/३८) या ऑफ्‌ब्रेक व कटर्स टाकणाऱ्या गोलंदाजांनी भारताचे एकूण अकरा बळी घेतले. पहिल्या कसोटी सामन्यापूर्वी सरे परगण्याविरुद्ध जो सामना झाला त्यात पोकॉक व स्टोरी या ऑफ्‌ब्रेक गोलंदाजांनी भारताचा धुव्वा उडविला होता. आपला त्या सामन्यात ८ विकेट्‌सनी पराभव झाला. लंडन टाईम्सने याच वेळी भारतीय फलंदाजीतला हा दोष निदर्शनाला आणला होता. 'इंग्लंडचा दौरा शिकण्यासाठी असतो' याचे कारण हेच! परंतु भारतीयांनी त्याकडे दुर्लक्ष केले आणि त्याचे फळ लगेच मिळाले.

## सदोष नेतृत्व

कर्णधार पतौडी यांनी पहिल्या कसोटी सामन्यात जी नेत्रदीपक फलंदाजी दोन्ही डावांत केली, त्यापासून निश्चितच भारतीय खेळाडूंनी काही प्रेरणा घेणे आवश्यक होते. परंतु पतौडींच्या फलंदाजीतील गुण त्यांच्या नेतृत्वाला विनाकारण चिकटविले जातात. मैदानावर ते बेफिकीर आणि अलिप्त वृत्तीने वागतात. गोलंदाजीतील बदल करताना त्यात कल्पकता किंवा अचूकता नसते. फलंदाजांवर दडपण आणण्यासाठी कोणत्याही युक्त्या ते वापरीत नाहीत. नबाबी वागणुकीमुळे संघातील खेडाळूंना आपलेसे करण्यात ते अयशस्वी ठरले आहेत. जेव्हा वैयक्तिक कर्तृत्व लुळे पडते तेव्हा काही संघटित प्रयत्नांचे धोरण पुढे रेटावे लागते. पतौडींच्या व्यक्तिमत्त्वात असे असाधारण गुण आढळत नाहीत. त्यातून हाताशी असलेला संघ कमकुवत असल्याने ते काही भव्य आणि दिव्य असे तिसऱ्या एजबास्टनच्या कसोटी सामन्यात करून दाखवितील असे वाटत नाही. उलट क्लोज यांचे नेतृत्व आक्रमक आणि निर्दयी हल्ला चढविणारे आहे. 'भारत–पाकिस्तानचा काटा काढीन, वेस्ट इंडिजच्या बॉट्‌लसना बॉक्सिंग ग्लोव्हनी प्रत्युत्तर देईन आणि मग ऑस्ट्रेलियाचा पराभव करून इंग्लंडचा प्रतिष्ठेचा झेंडा उंच करीन,' अशी त्यांची जिद्द आहे. आपल्या नेतृत्वात असे काही ध्येय नसल्यामुळे साहजिकच कर्तृत्वाला मर्यादा आहेत.

भारतीय संघ म्हणजे कर्तृत्वात कमतरता असलेल्या आणि कर्तव्यात कसूर करणारा अकरा खेळाडूंचा संच आहे. त्यातून दुर्दैव असे की मोहोळ, गुहा, सरदेसाई आणि हनुमंतसिंग यांना दुखापतीमुळे या कसोटी सामन्यात काही करता आले नाही. तरीपण लीड्‌स आणि लॉर्ड्‌सवरच्या पराभवाने भारताच्या मर्यादांचे स्वरूप स्पष्ट झाले आहे. पुढील दौऱ्यात त्यातून काही शहाणपणा आमची निवडसमिती शिकली तर काही चांगले निष्पन्न निघू शकेल.

●

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## पाच-तीन-दोनचे पातक

पाप काय अन् पुण्य काय, याचे उत्तर शोधून काढण्याचा प्रयत्न आपल्याकडे प्राचीन काळच्या ऋषिमुनींपासून अर्वाचीन काळीं " चित्रलेखा " सिनेमाच्या निर्मात्यांपर्यंत अनेकांनी केला आहे. त्यात पूर्वीचे मुनिकुमार फसले, तशीच आजची मीनाकुमारीही फसली. पण साम्यवादी चीनमध्ये या प्रश्नांची रेडीमेड उत्तरे तयार आहेत. उदाहरणार्थ, टोकदार बूट घालणे हे एक माओविरोधी पाप आहे व ते करण्याबद्दल पेकिंगमधल्या एका मंगोलियन विद्यार्थ्याला चिनी संस्कृतीच्या लाल-भडक रक्षकांनी बुटांनी तुडवला असे मागे आले होते.--पण हाय ! याहूनही भयंकर पातक प्रत्यक्ष चिनी माणूस करू शकतो असे उघडकीला आले आहे. पेकिंग-मधल्या एका चिनी पत्रकात अशी सन्सनाटी बातमी प्रसिद्ध झाली आहे की, चिनी साम्यवादी पक्षाचा माओविरोधी सरचिटणीस तेन सियो-पिंग याला ब्रिज खेळ-ण्याचा नाद आहे. बापरे ! " गंजिफा " खेळणे वाईट असे मी मराठी दुसरी की तिसरीच्या क्रमिक पुस्तकांत वाचले होते खरे, पण एकदा रमी खेळताना सबंध दोन रुपये हरल्यापासून हे कृष्णकृत्य माझ्या हातून घडले नव्हते; त्यामुळे पत्ते खेळणे हे पंचमहापातकांपैकी एक आहे याची माझ्यासारख्या पुण्यश्लोक इसमालाही कल्पना नव्हती. बरे, हा पातकी पत्ते खेळला तर खेळला पण ब्रिज ? हर हर ! निदान पाच-तीन-दोन तरी खेळायचे ! फार तर सत्ती डाव ! ब्रिज खेळणे जेवढे संस्कृति-विरोधी आहे तेवढे पाच-तीन-दोन खेळणे नाही हे प्रत्यक्ष " माओच्या विचारां "तही लिहून ठेवले असेल. पण हा पापी चक्क ब्रिज खेळला. शांतं पापम् ! अन् त्यातूनही तो जर कॉंट्रॅक्ट ब्रिज खेळला असेल तर मग कहर आहे ! एक वेळ टोकदार बुटांमुळे चिनी संस्कृतीला बसलेली लाथ विसरता येईल, पण कॉंट्रॅक्ट ब्रिजचा सुरुंग लावून चिनी संस्कृतीला जमीनदोस्त करण्याचे घोर पातक करू पाहणाऱ्याला दयामाया दाखविणे शक्य नाही.

## तीस इंच शिक्षण

एका जुन्या विनोदी मराठी चित्रपटात मुलीला पाहायला आलेला मुलगा विचारतो— " शिक्षण किती झाले आहे ? " वेडाचे सोंग घेतलेली मुलगी उत्तर

देते : " तीस इंच. " आतापर्यंत हा एक अफलातून विनोद होता.— पण आता खरोखरीच ज्ञानाचे मोजमाप इंचांनी होणार असे दिसते ! कालच वर्तमानपत्रांत वाचले की दोन अमेरिकन शास्त्रज्ञांनी एका मांजराला काही तरी साधे काम करायला शिकवले व मग त्याच्या मेंदूतून बाहेर पडणाऱ्या विद्युत् लहरींत किती फरक पडला हे मोजले. जेवढा फरक पडला तेवढे शिक्षणाचे मोजमाप. घ्या ! म्हणजे या मनीचे ज्ञान इतक्या व्होल्टनी वाढले असे म्हणायचे. " डोक्यात प्रकाश पडतो " तो कसा याचा आता उलगडा झाला. कारण एखाद्या गोष्टीचे ज्ञान झाल्यावर खरोखरीच डोक्यातल्या बल्बचा स्विच दाबला जात असला पाहिजे हे आता सिद्ध झाले. " दिवे लावणे " या उक्तीतही किती शब्दार्थ भरला आहे हे आता स्पष्ट झाले. फरक एवढाच की, ' काय दिवे लावणार आहेत चिरंजीव ' अशी काळजी करणाऱ्या बापाने " किती पॉवरचे दिवे लावणार आहे " अशी काळजी करणे अधिक शास्त्रशुद्ध ठरेल.

ज्ञान मोजण्याची ही पद्धत अभिनव आहे यात शंका नाही. पण मला वाटते ती जरा सोपी करायला हवी. विद्युत्लहरी मोजण्यापेक्षा इंच मोजले तर काय हरकत आहे ? तसाच एखादा " जाडा विद्वान् " असेल तर त्याचे पांडित्य किती किलो भरते हे पाहावे. पण माझ्या मते सर्वांत सोपा मार्ग म्हणजे ज्ञानाचे थर्मामीटर असावे. एखाद्याचे शिक्षण पाहण्यासाठी त्याला युनिव्हर्सिटीने दिलेली डिग्री पाहण्यापेक्षा तो किती डिग्री सेंटिग्रेड शिकला आहे हे पाहणे कितीतरी सोईचे नाही का ?

## परमेश्वराचा कलर सेन्स

" परमेश्वराला कलर सेन्स जरा कमीच. नाही तर सिनेमावाल्यांना टेक्निकलर शोधून काढावा लागला नसता. फॅशनवाल्यांना चपलेच्या पट्टीपासून कानांतल्या टॉप्सपर्यंत अन् हातातल्या पर्सपर्यंत रंगसंगती लावीत बसावे लागले नसते, इतकेच काय पण पाककुशल गृहिणींना दिवाळीत तिरंगी करंज्यादेखील कराव्या लागल्या नसत्या ! या सर्व गोष्टी निसर्गतःच मिळाल्या असत्या. सुदैवाने देवाचा अडाणीपणा माणूस दुरुस्त करीत आहे. उदाहरणार्थ, एक माणूस काळा गुलाब उगविण्याचा प्रयत्न करीत आहे असे नुकतेच वाचले. आता काळा गुलाब हवा तर निळा आंबा का नको, पांढरे संत्रे का नको, तांबडा कावळा का नको ? जाऊ द्या, देवाच्या चुका सुधारायला जोपर्यंत माणूस आहे तोपर्यंत काळजी कशाला करायची ? देवाने गुलाबी ओठ तयार केले—पण माणसाने निळी लिपस्टिकही तयार केली आहे तेव्हा प्रेमा तुझा रंग कसा या प्रश्नाचे आधुनिक उत्तर मॅक्स फॅक्टर देईल तसा असे द्यायला हरकत नाही.

●



# दक्षिणायन

## ६

**वि. ग. कानिटकर**

### एप्रिल, १७

रात्री मनस्वी उकडत होते. रात्रभर डोक्यावर पंख्याचा घरघराट चालू होता. पहाटे पहाटे मात्र गारवा पसरला व सकाळी मोठे प्रसन्न वाटत होते. निवासात सर्व सोयी उत्तम दिसल्या. आपण आपल्या घरी असतो तेव्हा सकाळची आह्निके एकीकडे उरकली जात असतात व आपण ती उरकीत आहोत याची जाणीवही नसते. आपण एकीकडे विचार करीत असतो. बडबड करीत असतो. परक्या ठिकाणी मात्र या क्षुल्लक गोष्टीचा आपोआप बाऊ तयार होतो. परंतु या निवासात पाणी मुबलक खेळवलेले होते. तापत्या हवेत शॉवरची सोय मोठीच आल्हादकारक होती.

बाहेर निवासाभोवतीच्या गर्द आम्रवृक्षावर कोकिळा गात होती. आत पुंडलिक गात होते. दोघांचा आवाज गोड असल्याने मोठी पंचाईत होत होती. अखेर कोकिळा थांबली. जुन्या कविता पुंडलिक उत्तम सुरावटीत म्हणतात.

बाहेर पडायला आठ झाले. निवासाच्या तोंडावर जोशी–पुंडलिक या दुकलीची मी छायाचित्रे घेतली. फोटो निघत असताना बिचाऱ्या माणसांना असा कधी संशयही येत नाही की कदाचित हे फोटो येणारही नाहीत! गंभीरपणे माणसे पोझ देतात. एखाद्या शिल्पासारखी स्तब्ध होतात. मग फोटो आलेच नाहीत, की या गोष्टी हास्यास्पद वाटू लागतात. जोशी–पुंडलिकांनी त्या वेळी केलेले चेहऱ्यांचे चाळे असेच आज मला आठवतात.

'दिनठंठी' या द्रविड मुन्नेत्र कळघमच्या दैनिकाचे मोठे चार मजली चौकोनी कार्यालय आमच्या निवासानजीकच होते. तेथे आम्ही घुसलो. गुरखा धावत आला. त्यामुळे निराशा झाली. परंतु गुरखा असल्याने "संपादकको मिलना है। संपादक कौन है?" वगैरे पुंडलिकांचे वळणदार आवाजातील प्रश्न त्याला समजले. त्याने आम्हांला वर सोडले.

जिना चढून वर गेल्यावर एका मोठ्या दालनात पाच-दहा टेबले जोडून मांडलेली दिसली. तिथे एक काळाकुळकुळीत माणूस प्रुफे तपाशीत होता. तो अर्थात् नेमके काय करीत होता हे सांगणे कठीण होते. सर्व टेबलांवर वृत्तपत्रे पसरलेली होती. प्रुफांचे जाळे पसरलेले होते.

आमचे इंग्रजीतील परिचयपत्र त्याने वाचले. ते त्याला समजले, असे आम्ही समजत होतो. परंतु त्याच्या चेहऱ्यावर तीन मराठी लेखकांना भेटण्याचा आनंद वा दुःख काहीच दृग्गोचर होईना. तेव्हा मला तरी शंका आली. पुढे इंग्रजी एकीकडे वाचीत असताना खाणाखुणाही करू लागला. तेव्हा त्याने आमचे परिचयपत्र वाचण्याचे फक्त नाटक केले, उपपदे फक्त वाचली अशी माझी खात्री झाली. तो म्हणाला,

"एडिटर कमिंग फाइव्ह ओ क्लॉक. नाऊ नॉट कमिंग!"

"दुसरे कुणी आहे का? असिस्टंट एडिटर वगैरे?" यावर तो म्हणाला. "नो."

दैनिकाच्या कचेरीत सकाळी १०–१०॥ ला कुणी नसावे याचे आश्चर्य वाटल्याने हे दैनिक छापते तरी काय हे पाहण्यासाठी मी तिथल्या दैनिकाचा त्या दिवसाचा अंक चाळू लागलो. पहिल्या पानावर अर्धे पान सिनेमा नट-नटींसंबंधी काहीतरी भानगड छापलेली दिसत होती. तामीळ नटनटींचे फोटो देऊन मोठीच बातमी छापली होती. आतल्या पानावर अग्रलेखाशेजारी मोठमोठ्या चौकटी घालून पुन: सिनेमाच्याच बातम्या होत्या. तिसऱ्या पानावर सणसणीत खुनाचा फोटो दिसत होता. ही रविवारची साप्ताहिक आवृत्ती आहे काय असे विचारता तो माणूस म्हणाला,

"नो टुडे! टुडे!"

पुढे असे कळले की 'दिनठंठी' हे दैनिक मुख्यत: सिनेमाक्षेत्रातील भानगडी, हाणामाऱ्यांच्या हकीकती यांसंबंधी रोजची नोंद ठेवते. सलूनवाले, टॅक्सीवाले, हमाल,

बस कंडक्टर या सर्वांसाठी आम्हांला एकच दैनिक आढळत होते- ' दिनठंठी. ' यांपैकी काहींना जोशी विचारीत,

" ये पेपर अच्छा है क्या ? "

प्रश्न समजला तर ' दिनठंठी 'चा तो आग्रही वाचक लाजून हसत असे.

या दैनिकाचे स्वरूप असे भानगडी विश्वातल्या नारदासारखे आहे ही गोष्ट आम्हांला कळली हे पाहून त्यालाही गंमत वाटे.

भक्तवत्सलम् या पदच्युत काँग्रेस मुख्यमंत्र्यांच्या भेटीत जेव्हा ' दिनठंठी ' चा विषय मी काढला तेव्हा हनुमंतासारख्या फाजील रुंद ओठांवर व जिवणीवर काही क्षण अन्याय करून त्यांनी एकदम तोंड उघडून म्हटले,

" ट्वाईस इट्स् एडिटर प्रोस्ट्रेटेड बिफोर मी. हिअर-हिअर. " (त्या दैनिकाच्या संपादकाने दोनदा माझ्यापुढे लोटांगण घातले. इथे, इथे या खोलीत.)

लोकांच्या भानगडी छापून पोट जाळणारे हे दैनिक आहे व त्याच्या संपादकांनी निवडणुकीत तिकिट मिळावे म्हणून द्रविड मुन्नेत्र कळघमचा प्रचार अंगिकारला अशी माहिती भक्तवत्सलम् यांनी दिली. अधिकारावर असताना त्याला दोनदा त्यांनी जीवदान दिले होते. माफी मागून संपादक निसटले होते.

सिनेमासृष्टी द्रविड मुन्नेत्र कळघम यांचे संधान लक्षात घेता ' दिनठंठी ' पत्राने मते फिरवण्यात महत्त्वाची कामगिरी केली असावी व याचा सात्त्विक संताप भक्तवत्सलम् व्यक्त करत होते.

' दिनठंठी ' कचेरीत फार वेळ थांबण्यात अर्थ नव्हता. आमच्या समोरचा तो दाक्षिणात्य आमच्या उपयोगी पडण्याचा प्रयत्न करीत होता. परंतु भाषेच्या अडचणीमुळे ते त्याला जमत नव्हते. त्याने आम्हांला ' दिनमणि ' या दुसऱ्या दैनिकाचा पत्ता मात्र दिला. सायंकाळी येतो अशी थाप मारून आम्ही पुनः टॅक्सी पकडली.

' दिनमणि ' पत्राचे कार्यालय ' एक्स्प्रेस एराटे ' मध्ये आहे. ' इंडियन एक्स्प्रेस ' पत्राच्या मद्रास आवृत्तीची कचेरी जिथे आहे तेच हे ' एक्स्प्रेस एराटे. ' ' इंडियन एक्स्प्रेस 'चे ऑफिस दुसऱ्या मजल्यावर आहे व ' दिनमणि ' चे तिसऱ्या मजल्यावर.

या कार्यालयाचे स्वरूप पुष्कळच बरे होते. ट्रेडल्स चालू होती. चपराशी होते. या पत्राचे संपादक श्री. शिवरामन यांचेशी आमची बातचीत लगेच सुरू झाली.

शिवरामन मोठे उलाढाली होते. साठीच्या पुढचे असून दहा वर्षे तरी लपवत होते. टिनोपॉल शुभ्र खादी, उभी तांबडी एकबोटी गंधाची रेघ. या रेघेच्या दोन्ही बाजूंस साध्या गंधाच्या उभ्या रेषा. चष्मा चांगला जाड भिंगांचा !

द्रविड मुन्नेत्र कळघमचे यश, लोकांची प्रतिक्रिया, त्यांचा स्वातंत्र्ययुद्धातील भाग, ' दिनमणी 'चा दोन लाखांचा खप अशी विविध माहिती ते पुंडलिकांना सांगत होते. लहान सहा बाय सहाच्या खोलीत. एका छोट्या टेबलाभोवती आम्ही चौघे दाटीवाटीने बसलो होतो. शिवरामन यांच्यासमोर जोशी-पुंडलिक व त्यांच्या डाव्या

हाताला मी होतो. त्यामुळे मला माझ्या नाकासमोरच्या भिंतीला असलेला झुलता दरवाजा दिसत होता. पलीकडच्या खोलीत–जी प्रशस्त असावी–काही हालचाल दिसतच नव्हती.

इतक्यात माझे लक्ष त्यांच्या लुंगीवरील A. G. V. या इंग्रजी धोबी आद्याक्षरांकडे गेले. ही अक्षरे पाहताच आम्ही ज्यांच्याशी बोलत होतो ते शिवरामन नसावेत अशी मला शंका आली. परंतु एकमेकांची लुंगी वापरणे शक्य असते या विश्वासाने मीदेखील प्रश्नोत्तरे चालू ठेवली. पुढे काही वेळाने हाताने चाळवाचाळव करताना त्यांनी टेबलावरचा एक फोडलेला लिफाफा माझ्या बाजूला हाताने सरकवला. त्यावर नाव व पत्ता होता, 'ए. जी. व्यंकटाचारी, दिनमणि कार्यालय.'

म्हणजे लुंगी बदलणे शक्य असले तरी शिवरामन हे व्यंकटाचारी यांची पत्रेही फोडीत असतील हे पटेना. माझी अस्वस्थता वाढत चालली. मराठीत चक्क पुंडलिकांना सांगावे की, 'हे शिवरामन नाहीत'–असा धाडसी विचार मनात आला. तितक्यात जोशींनीच सुरुवात केली,

"हिअर नाऊ आय् वॉंट टू आस्क यू ए सिंगल क्वेश्चन."

जोशी एक एक इंग्रजी शब्द आत्मविश्वासाने व हळूहळू सोडत होते. शिकाऊ लहान मुलाला दोरी बांधून पाण्यात सोडावे तसे! जोशी गंभीर झाले की त्यांच्या चेहऱ्याला तो ताण फार काळ पेलत नसावा. ते चेष्टा करीत आहेत असे वाटते.

जोशींचा सिंपल क्वेश्चन तेवढाच राहिला. आतल्या खोलीतून झुलता दरवाजा लोटून एक कृश, संपूर्ण खादीधारी असूनही अत्यंत साधी व निगर्वी वाटणारी एक व्यक्ती बाहेर आली. ए. जी. व्यंकटाचारी ही धोबी आद्याक्षरे असलेली, लुंगी परिधान केलेले, आमच्याशी बोलत असलेले गृहस्थ उभे राहिले व त्यांनी ओळख करून दिली–"हे शिवरामन–आमचे प्रमुख संपादक."

म्हणजे आम्ही इतका वेळ बोलत होतो ते खरोखरीच व्यंकटाचारी होते तर! या नव्या प्रवेशामुळे पुंडलिकांचा विरस झाला.

अर्थात व्यंकटाचारी हे स्वत: दोनदा इंग्लंड-जर्मनीला जाऊन आलेले बहुश्रुत गृहस्थ होते. त्यांचा जावई इंग्लंडमध्ये गणिताचा प्राध्यापक होता. लंडनमध्ये ते 'कानिटकर' यांच्या हॉटेलमध्ये राहत होते. एवढी माहिती त्यांनी सांगताच 'व्यंकटाचारी' हे सामान्य नाहीत अशी निदान माझी तरी खात्री झाली. आमचे एक नामबंधू लंडनला हॉटेलचा व्यवसाय करतात हे कळून कानिटकर कुलवृत्तान्तातील या सुरस हकीकतीवरचा विश्वास दृढ झाला.

आमच्यासाठी व्यंकटाचारींनी थंड पाणी मागवले. आम्ही निघण्यापूर्वी त्यांनी फोन करून तामीळ भाषेतील एक बालसाहित्यविषयक चळवळीचे आधार व नामवंत लेखक वलिअप्पा यांना, आम्ही त्यांना भेटायला येत असल्याचे कळवून आमचा पुढचा कार्यक्रम मुक्रर केला.

वलिअप्पा हे एका बँकेत एजंट होते. आम्ही त्यांच्याकडे पोहोचलो तेव्हा दुपारचे १२॥ वाजले होते. बँकेची वेळ सकाळ-सायंकाळी असल्यामुळे दुपारची सुटी झाली होती. वलिअप्पा मात्र आमची वाट पाहत थांबले होते. मोठे आर्जवी असे हे तरुण लेखक होते. त्यांची प्रकृती तोळामासा होती व बालसाहित्यात मोलाची भर घालायला ही पार्श्वभूमी योग्य होती. त्यांच्या पुस्तकांना दिल्ली सरकारची बक्षिसे लाभलेली होती. वसंत बापट, विंदा करंदीकर यांची नावेही त्यांना माहीत होती. मद्रासमधील तामीळ लेखक-संघाचे अध्यक्ष अखिलन यांचेशी फोनवरून बोलून त्यांनी सायंकाळी सहा वाजता आमची त्यांच्याशी भेट ठरवून टाकली. वलिअप्पांची नम्रता व गोड बोलणे मला फार आवडले. त्यांनी विशेष गोष्ट केली म्हणजे आमच्याकरता आग्रहाने थंड पेय मागविले. वलिअप्पांना पुन्हा भेटायचे होते म्हणून आम्ही त्यांचा फार वेळ घेतला नाही. परंतु पुढे तामीळ लेखकांची भेट झाली तेव्हा प्रकृती बरी नसल्यामुळे ते येऊ शकले नाहीत. त्यामुळे त्यांची हीच भेट पहिली व या मुक्कामातली अखेरची ठरली.

## चंपकलक्ष्मी आणि मुदलियारबाई

दुपारी आम्ही युनिव्हर्सिटीत गेलो. तिथे आर्कियॉलॉजीच्या प्राध्यापिका चंपकलक्ष्मी यांनी आमचे चांगले स्वागत केले. काळी, तरतरीत नाकाची, मोठ्या डोळ्यांची ही दक्षिण भारतीय सुविद्य महिला इतकी चटपटीत होती, की बोलता बोलता तिच्या ज्ञानोपासनेची योग्य ती जाणीव आम्हांला देऊनही तिने आमच्या प्रश्नांना अधिक जिज्ञासा जागृत करणारी उत्तरे पटापट दिली. तामीळ इतिहास फार पुरातन आहे, संस्कृतपेक्षा तामीळ भाषा फार जुनी आहे, समृद्ध आहे या गोष्टी तिने चांगल्या रीतीने मांडल्या. मध्येच त्यांनी पॉलिटिक्स विभागात चंद्रा मुदलियार आहेत की नाहीत हे शिपायाकरवी विचारून घेतले. त्या आहेत असे कळताच त्या स्वतः आम्हांला त्यांच्याकडे घेऊन गेल्या.

चंद्रा मुदलियार या रंगाने उजळ, भव्य कपाळ, विशाल डोळे अशा मोठ्या आकर्षक व्यक्तिमत्त्वाच्या होत्या. त्यांचे बोलणे अतिशय मृदू व सावकाश होते. फार विचारपूर्वक त्या बोलत आहेत असे वाटत होते. चंपकलक्ष्मी यांचा स्वभाव भडाभडा बोलण्याचा असल्यामुळे चंद्रा मुदलियार यांची शांती विशेष खुलून दिसत होती. व्रात्य मुलाने दुसऱ्या गबाळ मुलाच्या पुढचे खाद्यपदार्थ लांबवावेत तसे चंद्रा मुदलियार यांच्या बोलण्याचा धागा पकडून चंपकलक्ष्मी आपल्या मतांची मेंडोळी उलगडू लागत. तरीही या भडभडेपणाचा किंचित त्रासिक भाव चेहऱ्यावर उमटण्यापलीकडे मुदलियार काही करू शकत नव्हत्या. शिवाय चंपकलक्ष्मी यांच्या बोलण्यात एक नादमधुरता होती. उत्साह होता. चातुर्याने प्रमेय रुचीस आणण्याची कला होती.

मुदलियारबाईंचे टेबल वर्तमानपत्रांच्या कात्रणांनी भरलेले होते. सर्व कात्रणे विषयवार लावलेली होती. कानामागे उजवा हात नेऊन आपला विपुल केशसंभार

चाचपीत, उजव्या खांद्याकडे मान कलवून त्या बोलू लागल्या. दुसऱ्याचे मत त्यांना पटले तर उद्गारचिन्हाच्या आकाराने त्या मान हलवीत. खालचे टिंब देऊन पुनः मान कलती करीत.

द्रविड मुन्नेत्र कळघमच्या निवडणूक यशावर त्या मोठा प्रबंध तयार करीत होत्या. आपले निष्कर्ष अजून पक्के झाले नाहीत असे त्यांनी नम्रपणे सांगितले. त्यांनी या विषयावर अनेक लोकांच्या मुलाखती घेतल्या होत्या. या मुलाखती घेताना कळघम मतदार आपल्याकडे संशयाने पाहत असा अनुभव त्यांनी सांगितला.

स्वातंत्र्ययुद्धात वर उत्तर भारत जसा वारंवार ढवळून निघाला तसे दक्षिणेत होत नव्हते. वरवर काहीजण गांधीजींच्या चळवळीत भाग घेत. शहरात सभा, निवडणुका, सत्याग्रह, लाठीहल्ले होत. परंतु तामिळनाडचा गाभा हा सुस्तच होता, असे चंपकलक्ष्मी यांनी विधान करताच मुदलियार यांनी नकारार्थी जोराने मान हलवून चुळबूळ केली. पण चंपकलक्ष्मी यांनी चढत्या आवाजात आपलेच म्हणणे खरे असल्याचे सांगितले. आम्हांलाही ते पटले.

युनिव्हर्सिटीत काही विद्यार्थ्यांना भेटण्याची व्यवस्था करण्याचे चंपकलक्ष्मी यांनी मान्य केले. वार व वेळ ठरवून आम्ही दोघींचा निरोप घेतला. प्रा. अहमद जमील व रामनाथन यांना भेटून आम्ही युनिव्हर्सिटी सोडली. चार वाजायला आले होते. पाच वाजता आम्हांला एका मोठ्या तामीळ गांधीवादी नेत्याच्या भेटीसाठी जायचे होते. त्यांचे नाव होते शिवज्ञान ग्रामणी. 'द्रविड आरञ्जु कळघम'चे ते वयोवृद्ध नेते. त्यांचे सर्वज्ञात नाव होते—मापुसी.'

१९२० ते १९५४ हा काळ त्यांनी काँग्रेसमध्ये काढला. ३१ साली दोन वर्षांचा सश्रय कारावास, नंतर ४१ साली वैयक्तिक सत्याग्रहात गांधीजींनी त्यांची निवड केल्यावर झालेली जेलयात्रा व ४२ साली पुनः तुरुंगवास त्यांनी भोगलेला होता. तामीळनाड काँग्रेसचे ते बरीच वर्षे सेक्रेटरी होते. राजाजी व कामराज यांचे सहकारी म्हणून त्यांनी काँग्रेसमध्ये काम केले होते. ते स्वतःला राजाजींचे व्रात्य शिष्य म्हणवतात.

तामिळनाडचे सर्व व्यवहार तामिळमधून व्हावे यासाठी राजाजी मंत्रिमंडळाच्या काळांत त्यांनी स्वातंत्र्यानंतरही वारंवार आंदोलने उभारली व कारावास भोगला. 'द्रविड आरञ्जु कळघम' हा त्यांचा पक्ष राजकारणापासून अलिप्त ठेवून या अशा सांस्कृतिक चळवळी ते करीत असत. वाघ, मासा व धनुष्य ही तामिळ राजांची प्रतिके आपल्या पक्षाच्या दुरंगी ध्वजावर व तो ध्वज आपल्या निवासावर सतत फडकत ठेवणारा हा वयोवृद्ध नेता, थकल्या शक्तीनिशी १९६७ निवडणुकीत द्रविड मुन्नेत्र कळघमशी घरोबा करून सध्या विधान सभेचा सदस्य झालेला आहे. त्यांच्या पक्षाने दोन जागा जिंकल्या. त्यांतली मद्रासमधील जागा मापुसींनी लढवली व ते विजयी झाले.

श्री. लिमये यांनी आमचा परिचय करून दिलेले लेखक शिवरामन व लक्ष्मीकांत हे आमच्याबरोबर मापुसींकडे आलेले होते. मद्रास शहरातल्या एका मध्यमवर्गीय वस्तीत त्यांचा हा निवास अगदी साधा होता. चिचोळ्या दरवाजातून आत शिरल्याबरोबर डाव्या हाताला पडवी होती. पडवीसमोरच उघडा चौक होता. चौकांत नळ होता व तिथेच मापुसींच्या कुटुंबीय मंडळीचे वाटाणेकुटणे चालू होते.

ठेंगणे, काळसर असे मापुसी पडवीला लागून असलेल्या खोलीतून पडवीत आले. त्यांनी हात जोडले. पहिल्या दर्शनात देशासाठी टपालमय जीवन जगलेला हा मोठा मनुष्य आहे असे भासले. सेनापती बापटांप्रमाणे ओठ झाकून टाकणाऱ्या भरघोस पांढऱ्या मिशा, दाढी मात्र स्वच्छ केलेली होती. गांधीवादी असूनही ती चार दिवस वाढलेली नव्हती. डोक्यावर करडे झालेले परंतु भरपूर केस, पाणीदार डोळे असा हा माणूस खादीच्या जाडच्याभरड्या कुडत्यात एखाद्या महर्षिसारखा वाटला.

टेबलावर अब्राहम लिंकनचा ब्रॉन्झचा पुतळा व पडवीतल्या भिंतीवर महात्माजींची मोठी तसबीर होती. षष्ठ्यब्दीपूर्तीनंतर पक्षाने दिलेले मानपत्र भिंतीवर लटकवलेले होते व मद्रास कॉर्पोरेशनने दिलेला मानपत्राचा रौप्यकरंडक एका काचेच्या घरात मांडलेला होता.

वेताच्या परंतु काहीशा असामान्य मोठ्या अशा आरामखुर्चीवर ते टेकले. प्रथम पाय खाली सोडून, हाताची बोटे एकमेकांत गुंतवून ते दुभाष्यामार्फत आमच्याशी बोलू लागले.

## चर्चा सुरू झाली

आमचा प्रश्न लहान असला तरी आत्मविश्वासपूर्वक आणि विस्तृत अशी उत्तरे ते तामिळमधून देत. त्यात मध्येच एखादा इंग्रजी शब्द ते उच्चारीत. पुष्कळ वेळा लक्ष्मीकांत यांनी आमचा प्रश्न तामिळ भाषेत भाषांतरित करण्यापूर्वीच ते प्रश्न लक्षात घेऊन उत्तर सुरू करीत. त्यानी ' माणूस ' साप्ताहिकाचे अंक चाळले. ताज्या अंकावरचे राजकीय चित्र समजावून घेतले. अर्थ समजताच ते मोकळेपणाने हसू लागले. हसता हसता ते मागे रेलले व उंची फारशी नसल्याने त्यांनी पायाची जुडी करून ते वर घेतले. पिंपळपानावरच्या बाळकृष्णासारखी ती आकृती मला भासली. इतकी ती वेताची खुर्ची मोठी प्रशस्त होती.

धर्म, जात यापेक्षा अंतःकरण महत्त्वाचे आहे. धर्माचे पालन लोक नीट करीत नाहीत...असे त्यांचे विचार त्यांनी स्पष्ट केले. राजकारणावर, भाषेच्या प्रश्नावर बोलताना गांधीवाद्यांत नेहमी आढळणारा गोंधळ आहे, असा संशय मला आला. खात्री करून घेण्यासाठी, पुंडलिक–जोशी यांच्या प्रश्नांना उत्तर पडताच मी गुगली चेंडू टाकला–

" भारताने अणुबॉम्ब करावा काय ?"

प्रश्न समजताच ते हसले. अंगाची जुडी करून मागे रेलले व किंचित विचार

करून म्हणाले —

" देशभक्त म्हणून मला बॉम्ब तयार करावा असे वाटते. परंतु गांधीवादी म्हणून करू नये असे वाटते. "

मग गंमत म्हणून विचारले —

" तुम्ही देशभक्त राहू इच्छिता की गांधीवादी ?"

प्रतिप्रश्न येताच त्यांनी कबुली दिली —" आय ॲम अन-डिसायडेड. माझे नक्की ठरत नाही !"

मी म्हटले —" यू आर इन गुड कंपनी; आपल्या सरकारचेही अजून काही ठरलेले नाही !"

ते आता खळखळून हसू लागले. मला त्यांचा प्रामाणिकपणा फार आवडला. कुठलाही शब्दच्छलाचा गोंधळ न घालता त्यांनी निर्णय होत नाही ही दोलायमान अवस्था कबूल करून टाकली होती.

मी पुढचा प्रश्न विचारला —

" राजाजींनी द्रविड मुन्नेत्र कळघम या पक्षाला मार्गदर्शन केले, यशस्वी केले व राजाजी हे थोर मुत्सद्दी आहेत असे आपण मानता. याच राजाजींनी पाकिस्तान-निर्मितीला प्रथम मान्यता दिली व भारताची फाळणी झाली हे आपल्याला आवडले का ?"

मापुसी म्हणाले —" मी याबद्दल राजाजींशी खूप भांडलो. फाळणी ही फार वाईट गोष्ट झाली. ते पाप झाले. "

आता मापुसींनी प्रश्न विचारण्यास सुरुवात केली. त्यांनी विचारले,—

" काश्मीर भारताने सोडावा काय ?"

पुंडलिकांनी यावर ध्वनिमुद्रिका वाजवली, " काश्मीर हा भारताचा अविभाज्य घटक आहे !" वगैरे. जोशी म्हणाले—" पाकिस्तानने गडबड केली तर त्यांना आता ठोकले पाहिजे. " मापुसींनी जोशींकडे प्रेमाने पाहत म्हटले —

" पाकिस्तानला काश्मीर हवाच असेल तर आता त्यांनी तो लढून मिळवावा. सुखासुखी भारताने वाटाघाटी करून एक तसूभर जमीन यापुढे पाकिस्तानला देता कामा नये !"

स्वामित्वाची ही परंपरागत कल्पना मापुसींनी आवेशाने मांडलेली पाहून आम्ही चकित झालो.

संभाषणात एक मजेशीर गोष्ट मापुसींनी सांगितली. ते म्हणाले —

" भारताचे राजकारण म्हणजे गुजराथी व बंगाली यांचे भांडण ! गांधी-दास, गांधी-सुभाष आणि आता इंदिरा-अजय. बंगालचे पुन: एकीकरण झाले तर काँग्रेसला राज्य करणे कठीण जाईल !"

मापुसींना नेमके काय म्हणायचे होते ते पुनः पुन्हा उपप्रश्न विचारूनही आम्हांला

कळले नाही.

भाषेच्या प्रश्नावर त्यांनी अतिशय तर्कशुद्ध व आतापर्यंत न ऐकलेले मत मांडले.

" हिंदी–इंग्रजीचा वाद आत्ताच नको. कुणी कुणाला उपदेश करू नये. प्रत्येक राज्यांतून इंग्रजीची हकालपट्टी करावी. त्याची जागा त्या त्या प्रांताच्या मातृभाषेने घ्यावी. इंग्रजी गेली की लोकांना प्रश्न पडेल की आता एकमेकांशी बोलायचे कसे ? आपोआप लोक हिंदीसारख्या भाषेकडे वळतील ! प्रथम इंग्रजी हटाव !!"

पुढे ते म्हणाले –

" अण्णा दुराई यांनी काल-परवा मद्रासचे नाव बदलले. पाट्या बदलल्या. नावे बदलली. मी गेली २५ वर्षे यासाठी झगडतोय. तुरुंगवास भोगतोय. आज श्रेय अण्णांनी उपटले. मला आनंदच आहे —"

यातून एक विचार पुढे आला, की गांधीवादी उपवास, सत्याग्रह आदी मार्गांनी राजकीय बदल घडवून आणता येतील की नाही ?

मापुसींनी निक्षून सांगितले –" सत्ता जी गोष्ट चुटकीसरशी करू शकते ती सत्ताच हस्तगत का करू नये ? माझेच उदाहरण घ्या. मी गांधीवादी मार्गांनी वर्षानुवर्षे कंठशोष केला, द्रविड मुन्नेत्र कळघमने याच स्लोगनवर निवडणुका लढवल्या, सत्ता हिसकली आणि एक दिवशी मद्रास पुसून तामिळनाड पाटी लावली ! झक्क काम झाले. "

दुभाष्याने सांगितले की अशी वदंता आहे की मापुसी लवकरच अण्णांच्या मंत्रिमंडळात देवस्थान खात्याचे मंत्री म्हणून जाणार आहेत. आम्ही याबद्दल त्यांचे अभिनंदन करू लागताच ते म्हणाले —

" मला यातले काही माहीत नाही. ही मंडळी सांगतात. काय होईल ते काय सांगावे ?"

राष्ट्राध्यक्ष निवडणुकांचा प्रश्न निघाला. यावर मापुसींचे म्हणणे विचार करण्यासारखे होते. ते म्हणाले –" काँग्रेस पक्षापैकी काही लोक बेईमान होतील या भरंवशावर सुब्बाराव निवडणूक लढवीत आहेत, याचे मला दुःख आहे. काही लोकांची बेइमानी गृहीत धरण्यात यावी व या आधारावर जो राष्ट्राध्यक्ष होऊ पाहतो त्याला काय म्हणावे !"

हा मुद्दा पटण्यासारखा नसला तरी असे सर्वांच्या मनात आले, की असे जर असेल तर जो पक्ष मताने अधिक असेल, त्याच पक्षाने राष्ट्राध्यक्ष निवडावा, अशी प्रथा पाडण्यास मग काय हरकत आहे ?

मापुसींनी कॉफी मागवली. कॉफीपान झाल्यावर त्यांच्या पक्षातली बरीच मंडळी त्यांना भेटायला आली. पडवी एकदम भरून गेली व आम्ही लगेचच त्यांचा निरोप घेतला.

अखिलन यांचे घर मापुसींच्या निवासापासून काही मिनिटांच्या अंतरावर होते.

मापुसी यांच्या घरातून बाहेर पडताच ते अगदी सामान्य गरीब वस्तीत राहत होते याचा प्रत्यय आला. चालताना रस्त्याच्या दोन्ही अंगाला जी घरे लागत होती ती जुनीपानी व कनिष्ठ मध्यमवर्गीयांची दिसत होती. काळोखी, कुबट घरे, ओटीवर भरपूर मुले, शेळ्या, कोंबड्या अशी ती वस्ती होती. पुढे लगेच बाजारपेठ लागली.

भिंतीवरची निवडणुकीतील द्रविड मुन्नेत्र कळघम ची भित्तीपत्रके पाहत, थांबून, निरखून अभ्यासत पुंडलीक व शिवरामन चालत होते. मी व जोशी आता कधी कुठेतरी हॉटेलात जायचे की अखिलनकडून निघाल्यावर एकदम जेवायचे याची चर्चा करीत चाललो होतो. भाजीबाजार बेताचा होता. तांब्याच्या परडीतून मासे नेणारा तामिळी पाहिला आणि अशा परडीत फक्त फुले पाहण्याची सवय असलेल्या मनावर एक कायम दृश्य कोरले गेले.

गडगडणारा रहाट एकदम थांबावा तशी ती लडबडणारी उघडी वाघडी वस्ती एकदम संपली, आणि हाउसिंग बोर्डाच्या इमारतींची सुबक रांग लागली. या इमारती आपल्याकडील बोर्डाच्या इमारतीपेक्षा खूपच प्रशस्त व मोठ्या खोल्या असलेल्या दिसल्या. बाहेरून पाहताना तरी आतील सर्व दालने मोठी दिसत होती. नवीन खाजगी बांधकामाचे मजले दुकानांसाठी होते व त्यावर 'To Let' (भाड्याने देणे आहे) ही पाटी किती तरी वर्षांनी भेटली. शिवरामन यांनी सांगितले, की इथे अजून पागडी नाही, अ‍ॅडव्हान्स नावाचा व्याजाची पागडी देणारा प्रकारही नाही. या दुतर्फा सुबक वस्ती असलेल्या मुलखात जरा वेगळे वातावरण होते.

## अखिलन यांच्या घरी

आम्ही कंपाउंडात शिरताच अखिलन घराबाहेर आले. लुंगीवरचा डावा हात मोकळा करून त्यांनी नमस्कार केला. काळसर, ठेंगणे, सोन्याच्या काड्यांचा चष्मा घातलेले गोल चेहऱ्याचे अखिलन हे पन्नाशीजवळचे गृहस्थ दिसत होते. टेबलावर खादीचा टेबल क्लॉथ होता. टेबलासमोरच तीन खिडक्यांत पुस्तकांच्या राशी नीट रचलेल्या होत्या. निवास लेखकाचा वाटत होता.

अखिलन हे मद्रास आकाशवाणीवरील वरिष्ठ अधिकारी आहेत हे त्यांच्या वागणुकीवरून वाटत नव्हते. ते उर्मट नव्हते किंवा खुशालचेंडू आहोत याचे प्रदर्शन करीत नव्हते. त्यांची मुलगी आजारी होती. डॉक्टरांना बोलवण्यासाठी त्यांनी मध्येच डॉक्टरांना फोन केला तेव्हा ते अत्यंत नम्रतेने हसत बोलले व इतके आर्जवी बोलले की रेडिओवरच्या अधिकाऱ्याला ते मुळीच शोभणारे नव्हते.

'कलकी' या सुप्रसिद्ध तामिळ मासिकातून त्यांनी अनेक ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या होत्या. मुख्य म्हणजे 'कलकी' मासिकाने यासाठी त्यांना हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यात आपल्या खर्चाने धाडले. तामिळ इतिहासावर बेतलेल्या या त्यांच्या कादंबऱ्या अतिशय लोकप्रिय झाल्या होत्या. त्याशिवाय त्यांचे १० कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. १९६३ साली त्यांच्या एका ऐतिहासिक कादंबरीला 'अ‍ॅकादमी'

मिळाली. श्री. ना. पेंडसे व इतर पारितोषिक–विजेते यांचेबरोबर दिल्लीत काढलेले छायाचित्र त्यांचेपाशी होते. ते त्यांनी दाखवले. त्या छायाचित्रातले पेंडसे कोण हे आम्ही त्यांना दाखवले ! पेंडसे यांचे संपूर्ण नाव व त्यांच्या कादंबऱ्यांची नावे आम्ही त्यांना सांगितली. ती त्यांनी फोटोप्रतीमागे लिहून घेतली.

अखिलन म्हणाले की तामिळ, मराठी, गुजराथी, कानडी, हिंदी या भाषांतील लेखक पाश्चात्त्य लेखकांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाशी चांगले परिचित होतात. परंतु शेजारपाजारच्या प्रांतांतील लेखकांचे लेखन त्यांना अपरिचित राहते. मद्रास शहरातील, ' रायटर्स असोसिएशन ' या संस्थेचे अखिलन अध्यक्ष आहेत.

त्यांनी आपल्या सामाजिक कादंबऱ्यांचे जे कथास्वरूप आम्हांला ओळीने सांगितले. त्यावरून त्यांची कथानके फडके-खांडेकर यांच्या कादंबऱ्यांहून फारशी वेगळी नाहीत हे ध्यानात आले. त्यांनी यावर म्हटले– " मी परंपरागत पद्धतीने लिहिणारा लेखक आहे. ट्रॅडिशनल आहे. हरिजन उद्धार, आझाद हिंद फौज अशा पार्श्वभूमीवर मी माझे कथानक रंगवतो."

द्रविड मुन्नेत्र कळघमचे नेते साहित्यिक आहेत. अण्णा दुराई चांगले लेखक आहेत. करुणानिधी हे नट–नाटककार आहेत. आदित्यन हे संपादक आहेत. अण्णा दुराई यांनी पटकथा लिहिल्या आहेत, या संबंधी विचारता अखिलन यांनी सांगितले,

" हे सर्वजण उत्तम वक्ते आहेत. समुदायाचे मानसशास्त्र त्यांना माहीत आहे. परंतु निवडणुकीत त्यांनी जी साहित्यिक कामगिरी केली–नाटककार म्हणून–तिला दर्जेदार साहित्य समजणे बरोबर होणार नाही !"

मद्रास प्रांतातील ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादासंबंधी अखिलन म्हणाले,–" मी स्वतः ब्राह्मण नाही. द्रविड मुन्नेत्र कळघमच्या राज्यात ब्राह्मणांना असुरक्षितता वाटावी असे काही नाही. पूर्वी ब्राह्मणांना लोकसंख्येच्या मानाने विपुल प्रमाणात नोकऱ्या मिळत असत. ही संधी विपुल प्रमाणात आता नाही कारण समाजाच्या सर्व थरांतून माणसे आता स्पर्धा करीत आहेत. अण्णा दुराई, करुणानिधी या पुढाऱ्यांना राजगोपालाचारी यांनी संयमी केले, विचारशील केले आहे."

तामिळ लेखकांना भेटण्यासाठी अखिलन यांनी आम्हांस निमंत्रण दिले व पुनः लवकरच भेटावयाचे असल्याने आम्ही कॉफीपानानंतर त्यांचा निरोप घेतला.

बाहेर तोवर काळोख पडला होता. रस्ते परके वाटू लागले होते. हॉटेलात यथेच्छ भोजन करून आम्ही निवासावर परतलो, तेव्हा रात्रीचे १० वाजून गेले असावेत. निवासाबाहेर अंगणात एका मोठ्या वृक्षाभोवती प्रशस्त पार होता. त्या पारावर दिवसभर झालेल्या बोलण्यातून काय हाती लागते याचा आढावा घेत आम्ही बराच वेळ मजेत अडवारलेले होतो. दिवसभर इंग्रजी संभाषणांचा ताण आमच्यावर फार पडला होता. पुंडलिकांचा चौकस प्राध्यापकी सूर आता बदलला होता. पुण्यातल्या टवाळ गप्पा पुनः सुरू झाल्या होत्या. [ अपूर्ण ]

# तुमचे भविष्य आमचा अंदाज



**श्री. गो. जोशी**
सायनाचार्य, नासिक

८ ते १४ जुलै १९६७

**मेष** : नेहमीची चाकोरी बदलून नव्या वाटेने वाटचाल करायला लावणारी ग्रहस्थिती तुम्हांला लाभलेली आहे. आणि त्या नव्या वाटेमुळेच तुम्हांला तुमच्या अपेक्षित स्थली लवकर जाता येईल.

रवि-हर्षल योगामुळे नावीन्यपूर्ण, अघटित, अलौकिक असे कार्य आपल्या हातून घडेल आणि त्यामुळेच जगाच्या नजरा तुमच्यावर खिळून राहतील.

शिक्षणात विक्रमी यश लाभेल, स्थानांतर-बदल घडून येईल. यांत्रिक विद्युत क्षेत्रांत तर कधी न लाभलेले यश या वेळी मिळेल. पहिल्याच पंधरवडयात या घटना भराभर घडून याव्यात.

दि. ११ ते १४ याच कालात उत्क्रांती घडवून आणणाऱ्या घटना घडून येतील.

**वृषभ** : या महिन्यात तुमच्या पराक्रमस्थानी अनेक समर्थ ग्रहांचे आगमन घडणार आहे. आणि म्हणूनच त्यांच्या हार्दिक सहकार्यामुळेच तुमच्या जीवन–इतिहासात एक नवा अध्याय लिहिला जाणार आहे. या आठवड्यातील सूर्य–हर्षल योगांचीही आपल्या नव्या कार्यास साथ लाभणार आहे.

नोकरीधंद्यात स्थानांतर घडेल आणि त्या स्थानांतरामुळे तुमच्या जीवनाला एक वळण लाभेल.

साहित्याच्या क्षेत्रात संशोधन, विभागात तुमचे महत्त्व निरपवादपणे सिद्ध होईल. पराक्रमस्थ सूर्य-गुरू सारी शक्ती पणास लावून तुमचे सामाजिक महत्त्व अधिकाधिक वाढवण्याचा प्रयत्न करतील. नाटयकला क्षेत्रांतील लोकांना तर हा एक महान पर्वकालच ठरेल.

दि. १० ते १४ या कालावर सारे लक्ष केंद्रित करा. यश तिथेच गवसेल.

चौथ्या मंगळापुढे मी मी म्हणणारे हात टेकतात. ती अवस्था आता इतिहासजमा झालेली आहे. कोणत्याही क्षेत्रात निर्धाराने पाऊल टाका. तुमच्या यशाची हमी मी घेतो.

घनस्थानच्या गुरुला तुमच्यासाठी आता काही भरीव व आकर्षक कार्य करण्याची संधी मिळेल. नोकरीधंद्याची विवंचना मिटेल. पैशाअडक्याचा प्रश्न सुटेल, स्थगित कार्यांना दि. १४ च्या रवि–हर्षल योगापासूनच गती मिळू लागेल. आता कोणताही ग्रह तुमच्यावर नाराज असणार नाही. की कधी कोणते काम नडून राहिले आहे असे घडणार नाही. ग्रंथप्रकाशन, वृत्तपत्रीय कार्य यशस्वीपणे पार पडेल. दि. १२ ते १४ घवघवीत यशाचा काल.

**कर्क :** सध्या तुमच्या राशीच्या आसपास अनेक विशाल तेजोगोल जमा झालेले असल्यामुळे तुमचे महत्त्व खूपच वाढेल. व्यक्तिमत्त्व विकसेल. मंगळ चतुर्थात येत असला तरी इतक्यातच त्याची दखल घ्यायची गरज भासणार नाही.

सामाजिक क्षेत्रात तुमच्या उपस्थितीची नितांत गरज भासेल. आणि राजकीय क्षेत्रातील बरीचशी कार्ये तुमच्याविना अडून राहतील.

हा आठवडा खूपच धावपळीचा, घाईगर्दीचा जाणवेल. अनेक कार्यांचा डोंगर उपसावा लागेल. सारी कामे अपेक्षेप्रमाणे यशस्वी ठरू लागतील.

सौंदर्यप्रसाधने, सुंदर वस्तू, रासायनिक द्रव्ये, प्रवाही पदार्थ यांच्या व्यावसायिकांना दिवस अत्युत्तम प्रगतीचे ठरावेत.

दि. १०–१२–१४ या काली आपले अनेक प्रश्न सुटतील.

**सिंह :** अजूनही काही दिवस एकादशातील सूर्य-बुधांनी तुम्हांला संधी दिलेली आहे. जे काही करायचे असेल तर प्रयत्नाला लागा. तुम्हांला घवघवीत यश द्यायला मी कटिबद्ध आहे, असे सूर्याचे तुम्हांला अभिवचन आहे. शिवाय कर्तृत्वसंपन्न मंगळही तुमच्या पराक्रमस्थानी उतरलेला आहे. अशा वेळी आपण कुणाचेही आव्हान स्वीकारू शकता. गेल्या कित्येक दिवसांनंतर इतका चांगला काल आताच तुमच्या वाट्यास आलेला आहे.

सामाजिक-राजकीय क्षेत्रांत आघाडीवर राहण्याचा मान मिळेल, विरोधकांना ठोकरून काढण्यात निश्चित यश लाभेल, सारा समाज तुमच्या पाठीशी उभा आहे याचा साक्षात्कार पदोपदी व्हायला लागेल. या कालापासून वाङमयीन क्षेत्रातही तुमचे महत्त्व खूपच वाढीस लागेल.

दि. ११ ते १४ हाच तो यशस्वी काल.

कन्या : कित्येक दिवसांपासून गुरू एकादशात आहेच. आतां लवकरच सूर्यही त्या स्थानी प्रकटणार आहे. अलीकडच्या कालातील ही अधिकाधिक चांगली ग्रहस्थिती तुम्ही अनुभवणार आहात.

भागीदारीच्या व्यवहारातील साऱ्या व्यथा–विवंचना मिटून जातील, नवे उत्साही कार्यकर्ते तुम्हांला लाभतील, आणि त्या क्षेत्रात प्रतिज्ञेने यश मिळवाल. व्यवहार-धंद्याचे बदललेले तंत्रमंत्र संपूर्ण यशस्वी ठरल्याचा प्रत्यय येऊ लागेल.

शेती, स्थावर व्यवहार, यांत्रिक उत्पादन इत्यादी व्यवसायांत अपेक्षेबाहेर यश उठवू शकाल. या आगामी १५-२० दिवसांत प्राप्तीचा उच्चांक साधू शकाल.

दि. ९–१२–१४ या काली आनंददायक घटना घडतील.

तूळ : मंगळाचे राश्यंतर आणि भाग्यस्थानी सूर्याची उपस्थिती एवढ्या भांडवलावर आपण हवं ते करू शकाल. वाटेल तितकं मिळवू शकाल. या आठवड्यात वरचेवर प्रवास करावा लागेल. आपल्या यांत्रिक उत्पादन क्षेत्रात या वेळी उत्क्रांती घडून यावी. तुमची पैशाची विवंचना मिटू शकेल, व्यवसायक्षेत्र अधिक विस्तारेल. अनेक समर्थ व्यक्तींचे सहकार्य मिळू शकेल.

आता सहसा तुमचे कुठे नडू शकणार नाही, की तुमची प्रगतीची घोडदौड कुणी रोखूही शकणार नाही. साहित्य-कला-काव्य-नाट्य ही तुमची खास क्षेत्रे. त्यात अमाप कीर्ती–प्रसिद्धी मिळवाल. दीर्घ मुदतीचे करारमदारही करू शकाल.

दि. ११ ते १४ या काली आपल्या अनेक अपेक्षा सफल व्हाव्यात.

वृश्चिक : बाराव्या मंगळामुळे काही काल थोडे खटकल्यासारखे वाटेलही, पण तेवढ्या कारणानें गोंधळून जाण्याचे काही कारण नाही. भाग्यस्थानी गुरू तुमची सदैव पाठराखण करील आणि अडचणींच्या वेळी सहानुभूती देईल.

सूर्य भाग्यस्थानी येताच (दि. १६) आजच्या तुमच्या साऱ्या विवंचना मिटून जातील आणि निर्मळ यश लाभू लागेल.

दूरच्या प्रवासासाठी प्रस्थान ठेवलें जाईल, नव्या व्यवसायात पदार्पण करण्याचे ठरेल, सांसारिक जीवनात काही विशेष आनंददायक घटना घडू लागतील.

काही काल नवे तंत्र-मंत्र अवलंबिलें, थोडेसे जुळतेमिळते घेतलेत तर कोणत्याही कामात अपयश येऊ शकणार नाही असा मला भरंवसा वाटतो.

दि. १२ ते १४ या कालाचे महत्त्व प्रकर्षाने जाणवेल.

धनू : एकट्या मंगळाशिवाय सारे ग्रह तुमच्या विरुद्ध बाजूला उभे आहेत. या विचित्र ग्रहस्थितीमुळे, कोणत्याही कामात यश मिळवण्यासाठी तुम्हांला जिवाचे रान करावे लागेल. पण खात्री अशी वाटते की, तुमच्या या धावपळ–धडपडीचे श्रेय तुमच्या पदरी पुरेपूर पडू शकेल.

या वेळच्या रवि-हर्षल योगामुळेही अनपेक्षितपणे तुमच्या कार्यक्षेत्राला कलाटणी

मिळेल. ज्या गोष्टीबद्दल यत्किंचितही आशा वाटत नव्हती ती या वेळी एकाएकी घडून आल्याने तुमचा उत्साह ओसंडून येईल. प्रकृतीकडे मात्र दुर्लक्ष करून चालणार नाही. तुमच्या आणि तुमच्या कुटुंबियांच्याही.

दि. ११ ते १४ या वेळी दूरचा प्रवास किंवा महत्त्वपूर्ण बदल घडून यावा.

**मकर** : जीवनाबद्दल कृतज्ञता वाटणे, सुख आणि प्राप्त परिस्थितीतून समाधान निर्माण करणे, मत्सर आणि अवास्तव महत्त्वाकांक्षा यांनी जीवन रखरखीत आणि असह्य होऊ न देणे हे पुष्कळांना साधत नाही. तुम्हांला मात्र साधले आहे. कर्केच्या गुरूची ही सारी किमया !

मंगळ दशमस्थानी आल्याने प्रगतीची नवी क्षितिजे दिसू लागतील, कर्तृत्व धारदार बनू लागेल. " परमेश्वर कुठे असेल तर तो माझ्या मनगटात आहे, " असे आपण जगाला आवर्जून सांगू लागाल.

शिक्षण, अर्थशास्त्र, आयात-निर्यात व्यवहार या क्षेत्रांतील व्यक्तींना या वेळच्या अनुकूल ग्रहस्थितीचा अधिकाधिक लाभ उठवता येईल.

दि. १२ ते १४ या कालावरच सारे लक्ष केंद्रित करा.

**कुंभ** : कुंभराशी व्यक्तींनी आता निर्धास्त राहायला हरकत नाही. प्रकृतीबद्दल आणि स्वास्थ्याबद्दल. साडेसातीबद्दल ना खेद ना खंत.

या आगामी ८-१५ दिवसांत तुम्हांला प्रवास करावा लागेल. राष्ट्रीय कार्यक्रमात महत्त्वाचा भाग उचलावा लागेल. शैक्षणिक, वैज्ञानिक क्षेत्रातही तुमचे महत्त्व वाढीस लागेल.

दि. १४ चा सूर्य-हर्षल योग तर तुमच्या ध्यानीमनी नाहीत अशा गोष्टी घडवून आणील.

बढती-बदलीचे योग येतील, सभा–संमेलने गाजवावी लागतील, यांत्रिक-विद्युत क्षेत्रांत नवे भांडवल ओतावे लागेल. एकंदरीत नव्या उत्साहाने, नव्या जोमाने भविष्यकालाची वाटचाल करू लागाल.

दि. ११ ते १४ चा काल खूपच उत्साहाचा व प्रगतीचा जाणवायला लागेल.

**मीन** : या वेळी एकटच्या गुरूशिवाय तुम्हांला कोणी त्राता नाही. अशा वेळीच निर्धार-निष्ठेची गरज असते. साडेसाती म्हटली म्हणजे थोडेफार हे असे व्हायचेच. पण काळजी करण्यासारखे, निराश होण्यासारखे काही घडणार नाही ! मंगळ आठवा आल्याने, प्रकृतीकडे थोडेफार लक्ष द्यायला हवेच.

अशा निराशाजनक अंधारातही आशेचा किरण चमकून जाईल. सूर्य-हर्षल शुभ योगाची ही किमया.

अनपेक्षितपणे नव्या व्यवसायधंद्याचे जमेल. अगदी ऐन आणीबाणीच्या काली मदतीचे हात पुढे येतील. प्रतिष्ठेला धक्का न लागता वेळ निभावून जाईल. दूरच्या प्रवासाचे शक्यतो टाळा. दि. १२ ते १४ या काळी अपेक्षेप्रमाणे काही घडावे. ●

## साप्ताहिक ' माणूस '

वार्षिक वर्गणी रुपये वीस

• •

१०० रुपये पाठवून
पाच वर्षांसाठी वर्गणीदार होणाऱ्यास

## नाझी भस्मासुराचा उदयास्त

• •

२०० रुपये पाठवून
दहा वर्षांसाठी वर्गणीदार होणाऱ्यास

## राजा शिवछत्रपति

सप्रेम भेट.

• •

सप्रेम भेट योजना : १ जून ते १५ ऑगस्ट १९६७

राजहंस प्रकाशन, ७१९ नारायण, पुणे २

MANOOS ( Weekly ) : 40 Paise : Regd. No. M H-649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर.